

# काँग्रेसकडून दहशतवादी 'हमास'चे समर्थन !

रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १५ ऑक्टोबर २०२३

दहशदवादी 'हमास'ने संघटनेने दि.७ ऑक्टोबर २३ रोजी इस्त्रायलवर अचानकपणे राँकेटने हल्ला सुरु केला. तेव्हा लोक सैरावैरा पळत सुटले! काय झाले, हे कळेना! जगात इस्त्रायल गुप्तचर यंत्रणा मोठी आहे. पण ही यंत्रणा फेल ठरली. नंतर 'मात्र हमास' गाझातून रॉकेटने हल्ले करत असल्याने समजले. या हल्यात बाराशेवर इस्त्राईल नागरिक मारले गेले, तर हजारो लोक जखमी झाले. अनेक शहरे उध्वस्त झाली. याला प्रतिकार म्हणून इस्त्रायलने "हमास' च्या अतिरेकी ठिकाणावर हल्ले सुरू केले. इस्त्रायलचा लढा दहवाद्याच्या  विरोधात आहे. यातून इस्त्रायल व हमास यांचेत हल्ले' प्रतिहल्ले सुरू झाले. त्यांच्या या संघर्षाला दि.१५ रोजी ९  दिवस होत आहेत. या संघर्षाला इतिहास आहे. इस्त्रायल व पॅलेस्टाईन राष्ट्रातील वाद हा धार्मिक यहुदी व सुन्नी मुसलमान असा आहे. पूर्वी मध्यसागर किनारपट्टीचा 'गाझापट्टीचे क्षेत्र पॅलेस्टाईन मानले जात असे. या गाझापट्टीची लांबी ४१ कि.मी. व रूंद १० कि.मी. आहे.याची भागाची लोकसंख्या एकूण २२ लाख असावी. यात २००७ मध्ये हिंसक हल्ले झाले. हमास"ची स्थापना १९८७ मध्ये झाली. हमास म्हणजे ( हरकतूल मुकावतूल इस्लामिया) ती पॅलेस्टाईनची सशस्त्र( लडाकू )संघटना मानली जाते.त्या राष्ट्राचे सैन्य नाही. हमासचे इस्त्रायल प्रशासनात इस्लामिक शासन स्थापन करणे. हा त्यांचा उद्देश आहे. हमासचे नेते व सदस्य गाझापट्टीच्या उत्तर भाग दाटवस्तीत राहतातत्यामुळे इस्त्रायल हल्ला करू शकत नाही, हमास ला इरान व पॅलेस्टाईनची राष्ट्राची मदत आहे.यात येरूशलचा धार्मिक वाद अनेक वर्षापासून चालू आहे.हा भाग पूर्वी  ख्रिश्चनाचा होता. त्यावर मुसलमानांनी ११८७ ला कब्जा केला, तो १९४८ पर्यंत होता. येरूशलम शहराच्या या भूखंडात "अक्सा मस्जिद' आहे. यहूदी याला हर -हवाईत अथवा 'टेंपल माउंट' म्हणतात. तर मुस्लिम याला 'हरम-अल शरीफ' म्हणून मानतो. कुराणच्या धर्मग्रंथानुसार तर पैगंबर मोहम्मद हे मक्का येथून घोड्यावर स्वार होत उडत "अल शरीफ' येथे पोहचले. तेथून ते स्वर्गाला (जन्नत) गेले. त्याजागी येरूशलम हरम -अल- मस्जिद बांधली गेली आहे. मुस्लिम समाज या जागेला तिसरे पवित्रस्थान मानतो. तेव्हा 'अक्सा मस्जिद' या मस्जिदीवरून सुन्नी व यहूदी मुस्लिम, ख्रिश्चनयांचेत वाद आहे. तेव्हा हरम- हल -शरीफच्या व्यवस्थापनाची जबाबदारी १९४८ पर्यंत वक्फ म्हणजे इस्लामिक ट्रस्टकडे होती. या ठिकाणी गैरमुस्लिमांना प्रवेश नव्हता. हा भाग १९४८ पूर्वी फिलिस्तान होता, पण तो इंग्रजाचा ताब्यात होता.
इंग्रजाने १९४८ ला भारताचे जसे



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी


पॅलेस्टाईन राष्ट्र व हमास दहशदवादी संघटना दोन भिन्न आहेत! या 'हमास'ने इस्लायलवर अचानकपणे हल्ला केला. नरसंहार केला! महिला व मुलांची क्रूरपणे हत्या केली. त्यांचे हे कृत्य मानवतेला कलंक लावणारे होते. त्यामुळे इस्त्रायलने 'हमास'च्या ठिकाणावर हल्ले सुरु केले. पण हा हल्ला पॅलिस्टाईनच्या मुस्लिमावर समज जगभर पसविला गेला. आश्चर्य म्हणजे! जगातील मुस्लिम शुक्रवारी नमाजानंतर रस्त्यावर उतरला! त्यांनी इस्त्रायलचा विरोध केला!अतिरेकी हमास'चा नाही. भारतातील मुस्लिम यात मागे राहिलेला नाहीत. त्यांनी तेच केले. यांची मानसिकता लक्षात घेतली पाहिजे. धार्मिक दहशदवादाचे उदात्तीकरण आणि समर्थन उघडपणे केले जात आहे, हे जगासाठी धोकादायक आहे.

विभाजन केले.त्याप्रमाणे पॅलेस्टाईनचे दोन तुकडे केले. त्यांचेकडे ५५ टक्के भाग आला आणि ४५ टक्के भाग हा इस्त्रायलकडे गेला. त्यानंतर १४ मे १९४८ रोजी इजरायलने स्वतंत्र राष्ट्र म्हणून घोषित केले. जगात यहुदींचे पहिले राष्ट्र जन्माला आले. स्त्रायल व पॅलेस्टाईन हे येरूशलम शहराला राजधानी करण्याच्या प्रयत्नात आहेत. हे शहर मुस्लिमांबरोबर यहुदी व खिश्चनासाठी महत्वपूर्ण आहे. त्यांच्या वादातून संयुक्त राष्ट्राने फिलिस्तानचे आठ तुकडे केले. आता शहराचा ८ टक्के भाग संयुक्त राष्ट्राकडे नियंत्रणाखाली आहे. या प्रार्थनास्थळावरून कट्टरपंथी मुस्लिम व यहुदी यांच्यात संघर्ष होवू लागला. तेव्हा यहुदींना बाहेरून दर्शन करण्याची परवानगी देण्यात आली. पण यहुदी मुस्लिम दर्शनासाठी आले की, प्रार्थनास्थळातून दगडफेक केली जायची. पॅलेस्टाईन आणि इस्त्रायल यांच्या अनेक करार झाले. तरीही १९५६, १९६७, १९८२ पर्यंत जागेवर दोघेही आपलाच कब्जा असल्याचा दावा करत आहेत. पॅलेस्टाईनकडे केवळ १२ टक्के भूभाग राहिलेला आहे. तर ८० टक्के भाग इस्त्रायलच्या ताब्यात गेला आहे.पॅलेस्टाईन हे राष्ट्र नव्हते. त्यांच्याकडे लष्कराची स्वतंत्र तुकडी कधीच नव्हती. पॅलेस्टाईन नेता यासर अराफत यांनी १९८८ मध्ये पँलेस्टाईनला स्वतंत्र देश म्हणून मान्यता दिली.इस्त्रायलने १९९३ मध्ये पॅलेस्टाईनवर लष्कराची स्थापन करण्यास बंदी घातली होती. इस्त्रायल व पॅलेस्टाईन यांच्यात अधून-मधून हल्ले होत असत. यात २०१४ मध्ये दोघात पन्नास दिवस संघर्ष चालला. तेव्हा २५०० पॅलेस्टाईन मारले गेले.इस्त्रायलचे ५० लोक मृत्यू पावले. इस्त्रायल सुरक्षा पथक २०२१ मध्ये 'अक्का मस्जिद'पर्यंत पोंहचले, तेव्हा झालेल्या हल्ल्यात शेकडो पॅलेस्टाईनी लोक मारले गेले. तेव्हा "हमास' ने इस्त्रायलवर रॉकेटने हल्ला केला होता. इस्त्रायलने गाझापट्टीवर हल्ले केले. त्यावेळी दोन्ही बाजूने अकरा दिवस युध्द झाले. यावेळी बॉम्बस्फोट, रॉकेट हल्ले, आत्मघातकी हल्ले झाले. यात हजारो जणांचे प्राण गेले. हमास सशस्त्र बळ इस्त्रायलवर हल्ले करण्यासाठी सूरूंग चा वापर करत आहे. अमेरिका, युरोपीयन युनियन,ब्रिटनसह इतर देशांनी 'हमास'ला दहशतवादी म्हणून पूर्वीच घोषित केले आहे. पॅलेस्टाईन 'हमास'या दहशदवादी संघटनेला "लडाकू' वापर करत आहे. या हमास' ने चाळीस मुलांचे गळे कापून हत्या केली व महिलांना नग्न करून त्यांची हत्या केली, नंतर मृतदेहावर नाचले. त्यांचे क्रूरतेचे समर्थन होऊ शकत नाही. यावेळी जगातील अनेक बडे राष्ट्र इस्त्रायलचे बाजूने उभे राहिले. तेव्हा भारताने इस्त्रायल समर्थन केले, यात चूक काय? हमास'च्या कमांडर महमूद -अल- जहर याचे स्वप्न पहा! 'इस्त्रालय हे केवळ निमित्त आहे, आम्ही जगावर राज्य करून इस्लामचा कायदा लागू करावयाचा आहे. जगात येहूदी व ख्रिश्चन हे कोणी वाचणार नाहीत'असे तो म्हणतो आहे. तेव्हा हेतू लक्षात घेतला पाहिजे. भारत कधी हिंसा, अत्याचाराचे समर्थन करत नाही. श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९७५ व २००३ ला वाजपेयी यांनी पॅलेस्टाईल समर्थन केल्याची आठवण करुन दिल्या गेली. पण १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तानात माजी राष्ट्रपती याहयाखानने तर लोकांवर अत्याचार केले. तेव्हा श्रीमती इंदिरा गांधींनी तेथे भारतीय सैन्य पाठवून लोकांना मदत केली. त्यामुळेच बांगला देश स्वतंत्र झाला. तसेच श्रीलंकेत लिट्टे संपविण्यासाठी राजीव गांधी यांनी १९८७ मध्ये भारतीय शांती सेना म्हणून पाठविली होती. तेव्हा भारताने मानवतेच्या- दृष्टीने सैन्य कारवाई होती, ती योग्य होती. भारताने पॅलेस्टाईन राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे समर्थन केले. भारताचे पॅलेस्टाईनशी आजही चांगले संबंध आहेत.इस्त्रायल राष्ट्र महाराष्ट्र राज्यापेक्षा छोटा आहे. या देशाने जगात तांत्रिक क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. त्यांचा विकास दर ४८.०८ आहे. भारताचे १९९० पासून मैत्रत्वाचे संबंध आहेत. पण या घटनेत मुस्लिम राष्ट्र 'हमास'चे धार्मिक आधारावर समर्थन करत आहेत. हमामच्या हिंसक कृतीचे समर्थन करत आहेत. ईरान, तुर्की व सिरीया व ५७ मुस्लिम राष्ट्रांनी इस्त्रायलच्या हल्लाचा विरोध केला आहे. मुस्लिम राष्ट्र संघटनेने (ओ. आय .सी.) यांनी मुस्लिम राष्ट्रांनी एकत्र आले पाहिजे, असे आवाहन केले आहे.जगातील अनेक राष्ट्रातील मुस्लिम नमाजच्यानंतर रूस्त्यावर उतरले व त्यांनी इस्त्रायलचा विरोध केला! त्यांनी या निमित्ताने हमाम या दहशवादी संघटनेचे समर्थनच केले आहे! याला कारण आय. एस. आय. एस. आणि अलकायदा, तालिबान, मुस्लिम ब्रदरहुड सारख्या कट्टर धार्मिक संघटनांचा रक्तपात करुन इस्लाम राष्ट्रे निर्माण करणे त्यांचा मनसुबा आहे. यातून पाक तर तीस दहशदवादी संघटनाना आश्रय देत आहे. यात लष्कर तोयबा, जैसे -ए- मोहम्मद हिजबुल मुजाहिद्दीन हरकत -उल जिहाद या कट्टर इस्लामी संघटना आहेत.त्यांची विचारधारा एकच! 'अल्ला एकच आहे, त्यांच्या शिवाय दुसरा इश्वर नाही' जो दुसऱ्या इश्वराला मानतो तो काफीर, त्याचा खात्मा केला पाहिजे या मानसिकतेतून कट्टर इस्लाम संघटना इतर धार्मियांवर अत्याचार करत आला आहे. हैद्राबाद संस्थानात निजामाच्या 'रझाकार'ने तेच केले. यातून जम्मू काश्मिरमध्ये काश्मिरी पंडितावर आणि महिलांवर अत्याचार केले गेले.त्या कुंटुंबाना हाकलून लावले. पाक अतिरेक्यांची भारतात आजही घुसखोरी चालू आहे. भारतीय लष्कर त्यांचा रोज खात्मा करत आहे.

याच अतिरेकी संघटनांनी मुंबई, संसदेवर व भारतीय लष्कराच्या छावणीवर अनेकवेळा हल्ले, बाँम्ब स्फोट करून हजारो निष्पाप लोकांचे व भारतीय सैनिकांचे बळी घेतले. पठाणकोट येथे २०१६ मध्ये जैसच्या अतिरेकी संघटनेने लष्काराच्या वाहनावर हल्ला केला होता. त्यानंतर भारताने सर्जिकल स्ट्राईक व एअर स्ट्राईक करुन पाकमधील अतिरेक्यांचे अड्डे उध्वस्त केले. तेव्हा भारताने कारवाई योग्य होती. पण पाक आणि काँग्रेसने लष्कराच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. केंद्रात काँग्रेसची सत्ता असताना अतिरेक्यांची मज्जल की,ते भारतात अनेक शहरात घुसून बाँम्बस्फोट करत होते.पण केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर ते बंद  झाले. काँग्रेस सरकारची अतिरेकी संघटनेशी सहानुभूती होती, म्हणून त्या घटना घडत होत्या! राहुल गांधींनी लंडन मध्ये मुस्लिम ब्रदरहूड व दहशदवादी संघटनेची देशातील राष्ट्रवादी व हिंदू संघटनेची आर.एस एस.शी तुलना केली. मुस्लिम ब्रदरहूडने रक्तापात करून मिस्त्र राष्ट्राच्या सत्तेत आला. तेव्हा आर. एस. एस.ने धर्माच्या नावावर किती जणांचे गळे कापले? जगात भारतात एकच हिंदू संघटन आहे. त्या संघटनेला गांधी खानदान व काँग्रेस बदनाम करत आहे. हे गांधी म्हणजे 'उचलली जीभ लावली टाळला! त्यांना वाचळवीर' म्हंटल पाहिजे खरं तर! या आधुनिक गांधीना, हिंदू धर्म व भाजपा समजलेला नाही. काँग्रेसने केंद्राच्या व भारताच्या विरोधात भूमिका घेतली आहे. पक्षाने यावेळेस पॅलेस्टाईन राष्ट्राचे नव्हे, 'हमास' दहशदवादी समर्थन केले आहे. यात भारतातील कट्टर मुस्लिमांना' हमास चा पुळका का यावा? यात ए.आय एम.आय. एम. औवेसींनी लगेच इस्त्रायल हल्याचा विरोध केला. अलीगढ मुस्लिम कॉलेजच्या मुस्लिम तरुणांनी 'अल्लाहू अकबर' अश्या घोषणा देत रॅली काढली. तसेच मुस्लिम पर्सनल बोर्डने 'हमास' क्रूरतेला स्वाभाविक प्रतिक्रिया म्हटले. सर्व मुस्लिम कट्टर नेते एकाच सूरात बोलतात! तेव्हा यामागील मानसिकता लक्षात घेतली पाहिजे. अलीगढ तरुणाविरोधात दाखल होताच काँग्रेस नेता आगा युनुस मदतीला धावला. देशाचे तुकडे करु पाहणाऱ्या टोळीचा म्होरक्या काँग्रेसमध्ये आहे. जगात आणि भारतात धार्मिक व्देषाचे दुकान कोण चालवित आहे? त्यांची प्रेमाचे दुकाने आहेत काय? या व्देष करणाऱ्या संघटनेबाबत गांधीनी कधी तोंड उघडले काय? पूर्वी सीमीचा आता पी.एफ आय.चा २०४७ पर्यंत भारताला इस्लाम राष्ट्र करण्याचा इरादा होता. तो मोदी सरकारने उधळून लावला!.काँग्रेसला राष्ट्रापेक्षा पक्ष मोठा वाटतो. यात 'हमास'चे समर्थन करणे,तर अतिरेकपणा आहे.जगात भारतील लोकशाही आदर्श मानली जाते. घटनेने सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. देशात बहुसंख्य हिंदू असल्याने  मुस्लिम बांधव सुरक्षित आहे. तेव्हा भारतीय मुस्लिमांनी दहशदवादी संघटनेचे गोडवे गाणे बंद करावेत. या देशात इस्लाम धर्मावर व शरियत आधारिवर कायदे कधीच होणार नाहीत.ते घटनेवर आधारित आहेत, पुढे होतील, ते स्विकारले पाहिजे! यातच त्यांचे भले आहे. देशातील राष्ट्रवादी मुस्लिमांनी अश्या प्रवृत्तींचा विरोध करण्यासाठी पुढे आले पाहिजे. देशाच्या परराष्ट्रनीतीला साथ दिली पाहिजे. राष्ट्रीय काँग्रेस पक्ष सत्तालोलूप बनला आहे. पक्षाने स्वातंत्र्यापूर्वी जे केले, तेच आजही करत आहे. तो 'मुस्लिम व्होटबँक'साठी तुष्टीकरणाचे राजकारण करत आहे. आज भारतात धार्मिक कट्टरता व समाजात व्देष वाढत चालला आहे. याला काँग्रेसची तुष्टीकरण नीती कारणीभूत आहे. जगात मुस्लिम समाज दहशदवादी संघटनेच्या हिंसाचाराचे उघडपणे समर्थन करत आहेत. हे लोकशाहीवादी भारतासह इतर राष्ट्रांसाठी धोक्याचा इशारा आहे.



मांडणी व सजावट
अतुल खंडगावकर





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ऐसी अक्षरे रसिके

आधुनिक केसरी

पण कशी झाली असेल ही सुरुवात ? माणूस बोलायला तर शिकलाच होता. ध्वनीचा अर्थपूर्ण वापर आपल्या विचार आणि भावना दुसऱ्यांना कळवण्यासाठी त्याला करता यायला लागला होता. ही सुद्धा एक मोठी क्रांतीच होती ! मग तो बोलू लागला, गाऊ लागला. त्याचं बोलणं, गाणं इतरांसाठी आनंदाचं झालं. 'नादब्रह्माची' निर्मिती झाली. पण पुढे पुढे त्याला वाटलं असेल की आपण काय बोलतो, विचार करतो ते लिहून सांगता आलं तर ! हा विचार त्याच्या डोक्यात आला आणि 'नादब्रह्मानंतर'' अक्षरब्रह्माची' सुरुवात झाली. त्याचं बोलणं आता 'अक्षर' झालं. सुरुवातीला त्याच्या मदतीला असेल धुळीची पाटी आणि बोटांची किंवा झाडाच्या काडीची लेखणी. त्या धुळीत, चिखलात किंवा वाळूवर त्यानं काहीतरी गिरवलं असेल. अक्षर नसेल लिहिलं आणि लिपीचा शोध नंतरचा. पण त्याच्या मनात असणारी कुठली तरी आकृती त्यानं रेघांच्या मदतीनं काढली असेल. एखादा बैल काढला असेल, चाक किंवा बैलगाडी काढली असेल. काहीही असेल पण जे काही त्यानं काढलं ते क्रांतिकारी होतं, त्याला आनंद देणारं होतं. महत्वाचं होतं ते हातात लेखणी धरता येणं. मानवाच्या हाताच्या लवचिक बोटांमुळे त्याला हे सहज शक्य झालं. हातांना लेखणी धरण्याची सवय झाली आणि मग मानवाच्या मनातील भावनांना, डोक्यातील अमूर्त विचारांना मूर्त रूप प्राप्त झालं. 'ये हृदयीचे ते हृदयी घातले' अशी अवस्था प्राप्त झाली. प्रगतीच्या दिशेने ही मोठीच झेप होती. लिहिण्याची कला हीच मुळात किती सुंदर गोष्ट ! बघा ना, लिहिताना आपले मन, मेंदू, बुद्धी, डोळे, हात, बोटं, शरीर अशा सगळ्या गोष्टी एकत्र येतात आणि त्यांच्या सहाय्याने ही सुंदर क्रिया घडते. शरीर आणि मन एकत्र येऊन ही सुंदर क्रिया घडवून आणतात. सहकार्याचे, एकतेचे यापेक्षा आणखी सुंदर उदाहरण दुसरे कोणते असू शकेल ?आपल्या मनातील अमूर्त विचार आणि भावनांचे प्रतिबिंब अक्षर रूपात समोरच्या कागदावर किंवा स्क्रीनवर उमटते. मानवाची जसजशी प्रगती होत गेली तसतशी त्याने आपलं बोलणं व्यक्त करणारी प्रतिकात्मक अक्षरं शोधून काढली असावीत. त्यातूनच लिपी तयार झाली. मानवाच्या लेखनकलेचा 'श्रीगणेशा' झाला. श्रीगणेश ही विद्येची आणि बुद्धीची देवता ! लेखनाची सुरुवातच श्रीगणेशापासून झाली.






# आनंदी पहाट

## वैचारिक प्रगल्भता प्राप्तीसाठी प्रयोगशील असावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. संस्कार म्हणजे नेमके काय असते ? खरे तर, संस्कार संस्कृतीनेच प्राप्त होत असतात. त्याचप्रमाणे, संस्कृती सुद्धा, संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते.

अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. विचारवंत व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा.

# गाव..

आधुनिक केसरी

गावाकडे चल माझ्या दोस्ता पर काट्याकुट्याचा हाय रस्ता या ओळी खूप काही सांगून जातात. शहराकडे जाणारा रस्ता हा मृगजळासारखा असतो. पण गावाकडे, खेड्यात जाणारा रस्ता हा काट्याकुट्यांचा, चिखलांचा असतो अवघड वाट असते पण माणसं सरळ असतात. प्रेम, जिव्हाळा, आपुलकी इथे आणि इथेच अनुभवायला मिळते. गावात सगळे सणवार अगदी उत्साहात साजरे होतात. नागपंचमी, पोळा, मकर संक्रांत ,दिवाळी, दसरा, गुढीपाडवा ,होळी या सणांची खरी मजा तर गावाकडेच असते. नागपंचमीसाठी दोन दिवस आधीच झोके बांधले जातात. दसरा व संक्रांतीला थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेतात. अगदी घरी जाऊन.. सायंकाळी गावभर लहान मुले फिरत असतात. दसरा आणि संक्रांतीला गावाकडे सायंकाळी खूप लगबग असते. प्रत्येक जण प्रत्येकाच्या घरी जात येत असतो. एकमेकांकडे जान्याणे सारे रुसवे- फुगवे या सणाला पळून जातात. नव्याने सारे भेटतात. गावात काही जत्रा असतात. त्या खूप मोठ्या संख्येने व उत्साहात साजऱ्या होतात. वर्षातून एक किंवा दोन अशा मोठ्या जत्रा असतात. दोन-तीन दिवस किंवा पाच-सहा दिवस या जत्रा चालतात. देवीची किंवा म्हसोबाची ही जत्रा असते. लेकीबाळींना खास आमंत्रण असते या जत्रेसाठी. तिलाही थोडासा विसावा मिळावा म्हणून माहेर पणासाठी तीन-चार दिवस मुलाबाळांसह लेकीला आणतात. ती सुद्धा माहेरी येण्यासाठी या जत्रेची वाट पाहत असते. खरंतर फार पूर्वीपासूनच ही जत्रा लेकीबाळींसाठीच असते. त्या निमित्ताने त्या माहेरी येतात, चार दिवस राहतात. गावाकडची खूप आनंदाची गोष्ट म्हणजे पारावरच्या गप्पा! अगदी तरुण मुलं, वृद्ध सगळेच या पारावर जमा होतात .गावच्या सगळ्या गप्पा इथे होतात .रोज प्रत्येकाची पारावर एक तरी चक्कर असतेच. अभिमानाने म्हणावेसे वाटते गड्या आपुला गावच बरा.....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.18

# मित्र

आधुनिक केसरी

विनोद आणि अजय यांची खूप चांगली मैत्री होती. ते एकाच वर्गात शिकत होते. विनोद मन लावून शिकायचा पण अजयचे मन मात्र सदैव इकडे तिकडे नेहमीच भरकटलेले असायचे. वर्गात शिक्षक शिकवत असताना अजयला नेहमी बोलणी खावी लागायची ती ह्याच लक्ष न देण्याच्या कारणावरून पण विनोद मात्र नेहमीच अभ्यासात पुढे राहायचा व शाबासकी मिळवायचा. एके दिवशी विज्ञानाचे शिक्षक वर्गात शिकवीत होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वहीमध्ये गृहपाठ करण्याची एक पद्धत सांगितली होती. त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांनी गृहपाठ पूर्ण केला होता.पण अजयने मात्र आपल्या सवयीनुसार गृहपाठ व्यवस्थित पूर्ण केला नव्हता. त्याची वही पाहून शिक्षक रागाने त्याला म्हणाले,"हे तू काय केले आहेस? मी तर पानाच्या एका बाजूनेच लिहायला सांगितले होते पण तू दोन्ही बाजूने लिहीले आहेस." आता अजय घाबरला. कारण शिक्षकांनी त्या दिवशी सुट्टी होण्याच्या आत वही पूर्ण करायला सांगितले होते आणि सुट्टी होण्यास फक्त दोनच तास राहिले होते. अजयला घाबरलेल्या अवस्थेत पाहून विनोदने त्याला त्याच्या लक्ष न देण्याच्या सवयीबद्दल उपदेश केला व शिक्षकांकडून परवानगी घेवून बाजारात जावून नवीन वही आणली. इतकेच नाही तर अजयसोबत बसून त्याचा गृहपाठ पूर्ण केला आणि त्याची वही शिक्षकांकडे जमा केली. त्या दिवसापासून अजयने आपल्या स्वभावात बदल केला आणि तो कोणतेही ठिकाणी लक्षपूर्वक काम करू लागला. तात्पर्य- लक्षपूर्वक काम करणे आणि विवेकबुद्धी जागृत ठेवून काम करणे या दोन गोष्टी पाळल्यास अनेक संकटावर मात करता येते. तसेच होणारे नुकसान टाळता येते.



# निरुपण

आधुनिक केसरी


जन्म जिवासी बंधन ।जन्म मृत्यासी कारण ।
जन्म हेंचि अकारण ।गथागोवी ॥४॥
जन्म सुखाचा विसर ।जन्म चिंतेचा आगर ।
जन्म वासनाविस्तार ।विस्तारला ॥५॥
जन्म जीवाची आवदसा ।जन्म कल्पनेचा ठसा
।जन्म लांवेचा वळसा ।ममतारूप ॥६॥



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

श्रुत ज्ञान धारा चली, जगत गुरु जन सोय ।
साधन शुन्य वे गुरु नहीं, जिवन्मुक्त गुरु होय ।।४१।।(स्ववेंद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/४१
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जेव्हा जीवन्मुक्त आत्म्यात ईश्वरीय ज्ञानधारा प्रवाहीत होते, तेव्हा सद्गुरूपद प्राप्त होते. साधनशून्य, गुरूविहीन आणि वाचकज्ञानी गुरू असत नाही.



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# शारदीय नवरात्र (पहिली माळ)

आधुनिक केसरी

महासरस्वती, महालक्ष्मी, महाकाली या त्रिगुणातीत देवतांचं अखंड ध्यान म्हणजे नवरात्र होय. अश्विन शुध्द एक या पक्षात तिची स्थापना केली जाते. सृष्टीच्या उत्पत्ती काळापासून जर सखोल विचार केला तर सप्रमाण असे सिध्द करता येईल की शक्ति उपासने व्यतिरिक्त दुसरी उपासनाचं अस्तित्वात नव्हती. युगायुगे या उपासनेची नावे बदलत गेली. सत्य युगात धर्माचे चारही पाद अस्तित्वात होते असे मानले जाते. त्यावेळी उपासना परविद्या अथवा परोपासना म्हणजेच निर्गुणाची उपासना होती.निर्गुण उपासना ही आजच्या काळात ही श्रेष्ठ मानली जाते. द्वापार युगात धर्माचा एक पाद कमी झाला.आणि काल परत्वे याच विद्येला ब्रम्हविद्या*हे नाव पडले. त्या नंतरच्या त्रेता युगात श्रीविद्या म्हणून ओळखली जाते. आणि आजच्या कलीयुगात ही श्रीविद्या, शारदीय नवरात्रौत्सवया व्यापक स्वरूपात मांडली जाते. वेद, शास्त्रे, पुराणे, श्रृति हे सर्व शारदेचीच स्तुति करतात,स्तवन करतात. घटस्थापना माता किंवा जगत् जननी घरात येणार म्हणाल्यावर तिच्या स्वागतासाठी संपूर्ण घर स्वच्छ केले जाते. फुलांच्या पायघड्या घातल्या जातात. रांगोळ्यांनी सर्वत्र सुशोभित केले जाते, आंब्याच्या पानांचे तोरण लावले जाते. निर्गुणातून मूर्तिपूजा कडे येते वेळी नुसतीच पूजा करावयास सांगितले नाही तर देवघरात तिला बसवून प्राण आणण्याची खरीखुरी जागृत अवस्था स्थल,काल नाम,गोत्र,आवाहन करून प्राणायाम करून पत्रावळ किंवा दुरडीत माती पसरून सप्तधान्य त्यावर पेरून फुलांच्या माळांनी सुशोभित करून स्वाहाकार करून प्राण आणले जातात. नवरात्रात तेलाचा किंवा तुपाचा अखंड नंदादीप लावला जातो. सकाळ संध्याकाळ आरती केली जाते. नानाविध अलंकारांनी तिला सालंकृत करतात.हा लोकोत्सव आहे त्यामुळे सार्वजनिकरित्या नवरात्र उपासनी केली जाते. आप, तेज, वायु, आकाश या सर्व तत्वांचा वापर करून घटस्थापना केली जाते. गोडाचा नैवेद्य दाखवून आरती केली जाते. या विधीला आपण घटोस्थापना म्हणतो. वेदांची आई ब्रम्हदेवाची कन्या,आनंदाचे जन्मस्थान,वाणीची स्वामिनी आणि महामाया की जिच्या जवळ फक्त आणि फक्त भक्तांच्या कल्याणासाठी अनंत मायाचं असते अशा या श्री शारदा मातेला माझा सतत नमस्कार असो. वेदोदित कर्म कुर्वन् उपासीत च देवताः| शुद्धान्तः करणेस्तन लाभते ज्ञानमुत्तमम् || अशी ही शब्द सुमनांची पहिली माळ श्रीमाता देवी शारदेला अर्पण






सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# भगवंत जोडणे हाच एक धर्म

आधुनिक केसरी

भगवंत जोडत असेल तर अधर्मही करावा; भगवंत जोडणे हाच एक धर्म. अभिमानाने कोणतेही कृत्य केले तर ते नाही भगवंताला पोहोचत. दानधर्म केला, धर्मशाळा बांधल्या, हे सर्व नाव होण्याकरिता जर केले, तर त्याचा तुमच्या कल्याणाला काय उपयोग झाला ? भगवंत जवळ न येता त्यामुळे अभिमान मात्र वाढतो. बाभळीची झाडे लावली तर त्यांना आंबे कसे येतील ? मीपणाने केलेले काम नाही उपयोगी पडत. शरणबुद्धीने केलेले काम हाच खरा धर्म. मी भगवंताच्या हातचे बाहुले आहे असे समजावे. 'राम कर्ता' असे म्हणावे. म्हणजे, देवाजवळ शरणबुद्धी धरावी. भगवंताची निष्ठा कोणत्याही वयात आणि कोणत्याही अवस्थेत वाढवता येते. ही निष्ठा कधी कुणाला हार जाणार नाही, किंवा कधी कुणापुढे मान लवविणार नाही. एकदा भगवंतावर पूर्ण निष्ठा ठेवल्यावर मग काळजीचे कारणच काय ? काळजीने कार्याचा नाश होतो आणि कर्तव्याचा विसर पडतो. भगवंतावर श्रद्धा ठेवून प्रयत्न करावा, आणि जे फळ मिळेल त्यात समाधान मानावे.



व्यवहारात सौख्य कर्तव्याने मिळते, तसे परमार्थात सौख्य निष्ठेने मिळते. परमार्थ करणार्‍या माणसाने कोणाचेही अंतःकरण दुखवू नये. परमार्थ हा लबाड आणि भोंदू माणसाचा नाही, तसा तो बावळ्या माणसाचाही नाही. व्यवहारात कुणाला फसवू नये, आणि कशाला भुलू नये. आपले डावपेच किंवा लबाडी लोकांना फसविण्यासाठी नसावी. लोकांकडून न फसण्याइतकेच आपण व्यवहारी असावे. आपल्या हातामध्ये जितका पैसा असेल, त्या मानानेच देवघेव करावी. व्यवहाराच्या दृष्टीने देणे न राहील असे वागावे. कोणत्याही परिस्थितीत मी राहीन' असे जो म्हणेल त्याला कधीच अडचण पडत नाही. आपण श्रीमंतांचा द्वेष करू नये आणि गरीबांना कमी लेखू नये. अशी वृत्ती बनायला भगवंताची निष्ठा पाहिजे. प्रत्येकाला खायला प्यायला भरपूर मिळाले पाहिजे ही संपत्तीची समान वाटणी होय. मोबदला न देता आपण पैसा घेतला, तर, तो ज्याचा घेतला त्याची वासना त्याला चिकटून बरोबर येते. काय गंमत आहे बघा, इतर बाबतीत मनुष्य वचन पाळण्याची पराकाष्ठा करतो, पण तो पैशाचे वचन देतो ते सहज, आणि ते मोडतोही सहज. तेवढेच वचन पाळण्यात तो कुचराई करतो. पैसा नसून अडते आणि तो असून नडते, अशी आपली परिस्थिती आहे. संन्याशाने एक दिवसाचा संग्रह करावा, गृहस्थाने तीन दिवसांचा संग्रह करावा. आपल्याजवळ तीन दिवस खायला आहे असे पाहिल्यावर आपण मुळीच काळजी करू नये.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १५ ऑक्टोबर २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ७२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 15 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-72 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5




# आरक्षणाची अंतिम तारीख 24 ऑक्टोबर

## लाखोंच्या साक्षीने आंतरवाली सराटीत मनोज जरांगेंचा निर्वाणीचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : अंतरवली सराटी येथे भगव वादळ आले होते. शनिवारी हजारो मराठा बांधव अंतरवली सराटीत एकत्र जमले होते. सरकारने आरक्षणासाठी दिलेली मुदत आज संपली. तर मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला आणखी दहा दिवस आरक्षणाचा निर्णय घेण्यासाठी दिले आहेत. त्यापूर्वीच शनिवारी मनोज जरांगे पाटील यांनी सभा घेऊन सरकारला सज्जड इशारा दिला आहे. तुम्ही आरक्षणाचा निर्णय घेतला नाही तर 40 व्या दिवशी काय करणार हे सांगू, असा सूचक इशाराच मनोज जरांगे पाटील यांनी दिला. यावेळी त्यांनी भरसभेत सरकारकडे सहा महत्त्वाच्या मागण्या मांडल्या.**

मनोज जरांगे पाटील यांनी भर सभेतून सरकारसमोर डरकाळी फोडली.
मराठा समाजाला सरसकट कुणबी असल्याचे प्रमाणपत्र द्या आणि मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करा, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. आम्हाला महाराष्ट्रातील मराठा समाजाला 50 टक्क्याच्या आत मराठा म्हणून वेगळा प्रवर्ग करून आरक्षण दिले तरी चालेल. पण एनटी व्हिजेएनटीचा प्रवर्ग टिकला तरच आरक्षण घेणार. नाही तर 50 टक्क्याच्यावर घेणार नाही, असेही जरांगे पाटील यांनी सांगितले.
मराठा आरक्षणासाठीची स्थापन करण्यात आलेल्या समितीचे काम बंद करा. चार दिवसांत कायदा पारित होणार नाही. एक महिन्याचा काळ द्या असे तुमचे आमचे ठरले होते. आता 5 हजार पानांचा पुरावा मिळाला आहे. त्याचा आधार घेऊन कुणबी समाजात समावेश करून मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करा, अशी मागणीही त्यांनी केली. केंद्र आणि राज्य सरकारने मराठ्यांचे हाल करू नये. तुम्ही आमचा ओबीसीत समावेश करा. दहा दिवसापेक्षा अधिक काळ वाट पाहण्याची आमची तयारी नाही, असा इशाराच त्यांनी दिला आहे.

**मुस्काटात मारली**

मराठा समाज एकत्र येत नाही असे म्हणणाऱ्यांच्या मुस्कटात या गर्दीने जोरदार मारली. तुम्ही इथे कशाला आला हे सांगा त्यांना. आरक्षणासाठी की आरडाओरडा करण्यासाठी आलाय का हे सांगा, असेही ते म्हणाले.
मुलाच्या हितासाठी आणि नातवाच्या हितासाठी मी या सभेचा साक्षीदार झाल्याची भावना तुमच्या मनात निर्माण झाली असेल. घराघरातून मराठा पेटून उठलाय. मराठा समाजाच्या वतीने विनंती आहे, तुमच्या हातात आता दहा दिवस आहे. आज लाखाचा जनसमुदाय अंतरवलीत उसळलाय. त्याचे एकच म्हणणे आहे. राहिलेल्या दहा दिवसात आरक्षण जाहीर करा. आरक्षण नाही दिल तर 40व्या दिवशी सांगू, असा इशाराच त्यांनी दिला.



**खाली कमेंटमधील शिव्या वाचूच वाटत नाहीत :** ते दोन येडपट आमच्या मागे लावले आहेत, पण आमच्या मराठ्यांची दोनच पोरं त्यांना बेजार करतील. खाली कमेंटमधील शिव्या वाचूच वाटत नाहीत. त्या शिव्या वाचल्या तर दोन दिवस भाकर खाल्ली जात नाही. ते कसे भाकर खात असतील त्यांचं त्यांना माहिती. त्यांना त्याची सवय आहे की काय त्यांचं त्यांना माहिती, असे म्हणत मनोज जरांगेंनी टोला लगावला.

**मराठा पायाखाली मुंगीही मरू देत नाही :** मनोज जरांगे पुढे म्हणाले, मराठ्यांनी त्यांना मोठे केले, त्यांची शान वाढवली. आपलं ठरलं आहे की, ४० दिवस काहीच बोलायचे नाही. आपण शांततेत कार्यक्रम करायचं ठरलं आहे. मराठ्यांनी शब्द दिला. मराठ्यांनी देशाला आणि जगाला भयानक संदेश दिला आहे. कोट्यावधीच्या संख्येने जमलेला मराठा पायाखाली मुंगीही मरू देत नाही.

**मराठ्यांनी मला दिलेला शब्द पाळला :** लोक म्हणत होते की, जमलेली गर्दी माघारी पाठवणं खूप अवघड आहे. मात्र, मराठ्यांनी मला दिलेला शब्द पाळला. मी त्यांच्या चरणी नतमस्तक आहे, असेही जरांगेंनी नमूद केले.

**ज्या गोरगरिब मराठ्याने तुला मोठे केले :** आपला मराठा आरक्षणाला विरोध नाही. मलाच टार्गेट करत असल्याचे छगन भुजबळ म्हणाले. मग आपण त्यांच्यावर बोलायचे बंद केले पण काल पुन्हा फडफड करायला लागले. काल भुजबळ म्हणाले जालन्यातील सभेसाठी सात कोटी खर्च आला, इतका पैसे कुठून आला? असा सवाल छगन भुजबळ यांनी जरांगे पाटील यांना विचारला. यावर जरांगे पाटलांनी सडकून प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, आम्ही १०० एकर जमीन विकत घेतली नाही. सभेसाठी फक्त मैदान भाड्याने घेतले आहे. इथल्या शेतकऱ्याने ते फुकटे दिले. लोक १० रूपयेपण देत नाही म्हणताय, तुला देत नसतील. ज्या गोरगरिब मराठ्याने तुला मोठे केले, त्यांचेच रक्त पिऊन तू पैसा कमावला, म्हणून तुझ्यावर धाड पडली. गरिबांचे पैसे खाल्ले आणि २ वर्ष जेलमधून बेसन खाऊन आला आणि आम्हाला शिकवतो पैसे कुठून आले? असा सवाल करत मनोज जरांगे पाटील यांनी भुजबळांचा एकेरी उल्लेख केलाय.

**तर आमचा विरोध असेल :** वकील गुणरत्न सदावर्ते हे देवेंद्र फडणवीस यांचे पिल्लू असल्याची टीका मराठा समाजातून होत आहे. यावर वकील गुणरत्न सदावर्ते यांनी भाष्य केले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. नंतर ते आरक्षण गेले. जरांगे यांच्यासारखी माणसे काय बोलू शकतात, पॉलिटिकल बॉसेससाठी जगणारी ही माणसं असल्याचे म्हणत गुणरत्न सदावर्ते यांनी जरांगे यांच्यावर टीका केली आहे. माझा कुणाला, कोणत्याही जातीला विरोध नाही पण चार आयोगाने नाकारले आहे. त्यामुळे मराठा आरक्षण मिळू शकत नाही. शरद पवार हे मनोज जरांगे पाटील यांचे पॉलिटिकल बॉस आहेत. शरद पवार जसे बोलतात तसे ते करतात. शरद पवारांच्या भूमिकेवर जरांगे बोलतात. सरकारने मराठा आरक्षण दिले तर आमचा विरोध असेल असे वकील गुणरत्न सदावर्ते यांनी म्हणत टीका केली आहे तर खुल्या गुणवतांच्या आरक्षणाला धक्का लागला तर उपोषण करणार असल्याचा इशाराही गुणरत्न सदावर्ते यांनी दिलाय.

# भारताने पाकला 191 धावात गुंडाळले

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारताच्या भेदक माऱ्यापुढे पाकिस्तानची फलंदाजी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. सेनापती बाबर आझम तंबूत परतल्यानंतर इतर सैनिकांनी भारताच्या गोलंदाजीपुढे शरणागती पत्कारली. पाकिस्तानचा संपूर्ण संघ 42.4 षटकात 191 धावांपर्यंत मजल मारु शकला. पाकिस्तानकडून कर्णधार बाबर आझम याने सर्वाधिक 50 धावांची खेळी केली. त्याशिवाय मोहम्मद रिजवान याने 49 धावांचे योगदान दिले. भारताकडून बुमराह, सिराज, हार्दिक अन् कुलदीप यांनी भेदक मारा केला. भारताला विजयासाठी 192 धावांचे आव्हान आहे.
भारताचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाहुण्या पाकिस्तान संघाने प्रथम फलंदाजी करताना अश्वासक सुरुवात केली. अब्दुलाह शफीक आणि इमाम यांनी भारतीय गोलंदाजाची छातीठोक सामना केला. 41 धावांची भागिदारी झाल्यानंतर सिराजने अब्दुलाह शफीक याला तंबूत धाडले. शफीक याला 20 धावांची खेळी करता आली. त्याने आपल्या या खेळीत 3 चौकार लगावले. त्यानंतर बाबर आझम आणि इमाम यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण हार्दिक पांड्याने इमामला तंबूचा रस्ता दाखवला. हार्दिक पांड्याने चेंडू टाकण्याआधी चेंडूवर काहीतरी केल्याचे दिसले.. हा फोटो व्हायरल होतोय. त्याने मंत्र फुकल्याचे अनेकजण म्हणत आहे. इमाम 36 धावांवर बाद झाला. यामध्ये त्याने सहा चौकार ठोकले.

# उपजिल्हा रुग्णालय हदगाव येथे जिल्हाधिकाऱ्यांची भेट

## महा हिंद लॅबची मनमानी तक्रारीवर चर्चा...

आधुनिक केसरी न्यूज

**सिद्धार्थ वाठोरे**

**हदगाव :** महाराष्ट्र राज्यात नांदेड जिल्हा हा आरोग्य विभागाच्या दोन गोष्टीमुळे आज रोजी चर्चेचा विषय बनला आहे. तो म्हणजे पहिला डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे मागील काही दिवसांपासुन सतत रुग्णाचे मृत्युचे तांडव सुरू असल्याने व तसेच दुसरा हदगांव येथील उपजिल्हा रुग्णालय मधिल एच एल एल लाईफ केअर लिमीटेड महा हिंद लॅबच्या रक्त तपासणी अहवाल देण्यासाठी तिन ते चार दिवस विना कारण विलंब लावत असल्यामुळे नांदेड जिल्हातील आरोग्य विभाग सध्या संपुर्ण राज्य भरात चर्चेचा विषय बनला आहे.
हदगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात शुक्रवारी संध्याकाळी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी प्रत्येक भेट दिली. त्यावेळी उप जिल्हा रुग्णालय येथील महा हिंद लॅबच्या मनमानी कारभारा विषयी दि. 03 ऑक्टोबर रोजी दिव्यांग विकास संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष समीर पटेल यांनी स्थानिक व जिल्हा आणि राज्य पातळीवर संबंधित सर्व आरोग्य विभाग व महसुल विभागात लेखी तक्रार दाखल केली होती. व तसेच या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व दैनिक वृत्त पत्रात या विषयी बातम्या प्रकाशित झाल्यामुळे नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत हे हदगाव येथील उप जिल्हा रुग्णालय येथील एच एल एल लाईफ केअर महा हिंद लॅबवरील तक्रारीवर प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी संबंधित हदगाव येथील उप जिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष भेट दिली. त्यावेळी महा हिंद लॅबचे तक्रारकर्ते व दिव्यांग विकास संघर्ष समितीचे अध्यक्ष समीर पटेल यांनी उप जिल्हा रुग्णालयातील महा हिंद लॅबच्या मनमानी कारभारा बाबत व तसेच गंभिर आजारी रुग्णांची व नवजात बालके, गरोदर माता, दिव्यांग व वयोवृद्ध व्यक्ती आणि लहान मोठे शस्त्रक्रियेसाठी रक्त तपासणी अहवाल देण्यास संबंधित महा हिंद लॅब हे गैर सोय व नाहक विलंब आणि असुविधे बाबतची तक्रार समीर पटेल यांनी जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्याकडे केली. सदरील रक्ताचे नमुने दुसऱ्या तालुक्याच्या प्रयोग शाळेत नेऊन रक्त तपासणी करुन सुध्दा रक्त तपासणी चाचणी अहवाल किमान 4 ते 5 दिवसानंतर हि रुग्णाला ठराविक वेळेत मिळत नाही. त्याच बरोबर महा हिंद लॅब मध्ये



कधी ई टि डी ट्यूब नसते. तर कधी रक्त घेण्यासाठी सिरीईन व ईतर साहित्य उपलब्ध नसतात. व तसेच गंभिर आजारी रुग्णाला तात्काळ रक्त तपासणी अहवाल वेळेवर मिळत नाही. या करिता दिव्यांग विकास संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष समीर पटेल यांनी जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्याकडे तक्रार केली होती. याबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधित महा हिंद लॅब हे उप जिल्हा रुग्णालय हदगाव येथे कायमस्वरुपी कार्यरत करण्यासाठी संबंधित महा हिंद लॅबला तात्काळ रक्त तपासणी अहवाल देण्यासाठी आदेश देऊ असे आश्वासन जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी दिव्यांग विकास संघर्ष समितीचे अध्यक्ष समीर पटेल यांना दिले.
त्यावेळी उपस्थित उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रदीप स्वामी, सेवा निवृत्त वैद्यकीय अधीक्षक डॉ. व्हि.जी. ढगे, सर्व उप जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, नायब तहसिलदार दामोदर जाधव, पोलिस निरीक्षक जगन्नाथ पवार, तलाठी जनार्दन मंगल, पत्रकार शेख जुनेद, विलास महाजन ईतर कर्मचारी अधिकारी व सफाई कामगार उपस्थित होते.


# दोन प्रवाह



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**बदलत्या कालमानानुसार व्यक्तीच्या जीवन जाणिवांमध्ये काही मूलभूत स्वरूपाचे बदल होत असतात आणि हे असे बदल होणे अत्यंत नैसर्गिक आहे. आदिम अवस्थेपासून ते आजच्या सभ्यतेपर्यंत पोहोचायला माणसाला जाणीवपूर्वक स्वतःत बदल करून घेऊन नैसर्गिक शक्तींशी कधी समायोजन साधून तर कधी संघर्ष करून स्वतःस सिद्ध करावे लागले. रानटी अवस्थेत असलेला प्राणी आज मंगळावर जाऊन पोहोचला, हे काही सहजासहजी झाले नाही. मिळेल त्या साधनांचा वापर करून इतर प्राणिमात्रांपासून स्वतःला वेगळे करणे आणि मानव्य संस्कृती उभारणे यासाठी त्याला खूप संघर्ष करावा लागला आहे.**



## क्षितिजापल्याड

मानवास या उत्क्रांतीच्या अनेक टप्प्यांमधून पुढे जाताना असे आढळून आले की, आपण ज्या अनेक गोष्टींची निर्मिती करत आहोत त्यापैकी काही विशिष्ट टप्पा पार केल्यानंतर टाकाऊ बनलेल्या आहेत. त्यांची इतिकर्तव्यता संपली, त्या टाकून देणे श्रेयस्कर अथवा सोयीचे होईल. उदाहरणार्थ कच्चे मांस खाता खाता तो अग्नीच्या साह्याने शिजवून खाण्याची कला शिकला तेव्हा त्याने हिंस्त्र श्वापदासारखे भक्षण करणे सोडून दिले. पुढे शेतीचा शोध लागल्यानंतर आणि शाकाहाराने त्याच्या जीवनात प्रवेश केल्यानंतर मांस खाणे त्याला गैर वाटू लागले. मानवी उत्क्रांतीच्या या अवस्थेतच खऱ्या अर्थाने नैतिक - अनैतिक, शिष्ट-अशिष्ट अशा गोष्टींचा शिरकाव झाला. पोटापाण्यासाठी होणारी भटकंती शेतीच्या शोधाने पूर्णपणे थांबली. स्थैर्यतेतून मग नवनवीन विचार येण्यास प्रारंभ झाला. तत्पूर्वी माणूस नावाचा प्राणी विचार करत नव्हता असे नव्हे, परंतु त्याचा हा विचार अत्यंत प्राथमिक अवस्थेतील उदरनिर्वाहापुरताच सीमित असल्यामुळे त्यात नाविन्यपूर्णता नव्हती. काही अंशी स्थैर्य प्राप्त झाल्याशिवाय धावपळीचे चित्रनही माणूस करू शकत नाही.



शेतीच्या शोधाने केवळ एकच बाब पुढे आली असे नव्हे; तर स्थैर्य आले, विधी संकेत आले, अमूक जागेपासून तमूक जागेपर्यंत माझी जमीन अशी मालकी हक्काची भावना आली, आहारात बदल झाला, शारीरिक स्थिरतेमुळे मानसिक स्वातंत्र्याचा विचार करणे शक्य झाले, प्राथमिक अवस्थेत त्याला जसा विचार सुचला त्याप्रमाणे वागणे सुरू झाले, चुकांच्या दुरुस्तीमधून सभ्यता आणि संस्कृती उदयास आली. स्वामीत्व हक्काची भावना ही केवळ आजच वाढली आणि आपले पूर्वज फारच सामाजिक औदार्याचे मेरूमणी होते असे समजण्याचे काहीच कारण नाही. माणसाच्या आकलनाच्या कक्षा रुंदावल्यानंतर तो काही बाबतीत व्यापक झाला तर काही बाबतीत अधिकाधिक संकुचित होत गेला. निसर्गाशी असलेले त्याचे नाते, ऋतुचक्र, जीवनाची इतिकर्तव्यता काय? इत्यादी बाबतीत तो साकल्याने विचार करू लागला. तसेच स्वामीत्व हक्क, सामाजिक विधी संकेत याबाबतीत कमालीचे आग्रही धोरण स्वीकारून तो अधिकाधिक संकुचित होत गेला. आपल्याच टोळी अंतर्गत विवाह करणे ही त्याच्या संकुचित अवस्थेची पुढची पायरी होती तर अमका अमका प्रदेश म्हणजे स्वदेश ही त्याच्या संकुचितपणाची परमोच्च अवस्था होय, असे म्हणावे लागेल. एका निश्चित जीवन प्रणालीच्या उभारणीसाठी व्यवहार आणि विचार यातील सुसंगती अनिवार्य असते. सामान्य माणूस या कोणत्याच गोष्टीचा विचार करणार नाही. त्याची दिनचर्या कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडत असेल तर त्यास याच्याशी काही कर्तव्य नसते; परंतु एक व्यवस्था निर्माण होत असताना आणि ती मोठ्या समूह घटकाला नियंत्रित करत असताना त्यातील विसंगतीवर प्रहार करणे सुज्ञ, विचारी माणसाचे कर्तव्य असते. आपण एकीकडे वसुधैव कुटुंबकम म्हणतो आणि हे विश्वचि माझे घर असे कंठरवाने उद्घोष करतो आणि दुसरीकडे समूहाच्या बाहेरील व्यवहारावर बंदी घालतो, ही व्यवस्था अंतर्गत विसंगती नव्हे काय? शोषणासाठी उपयुक्त व्यवहार प्रत्यक्षात अमलात आणायचा आणि जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत याचाही पुरस्कार करायचा, या विसंगतीची सोडवणूक कशी करायची? असे एक ना अनेक प्रश्न आहेत. ज्यांचा विचार होणे गरजेचे आहे. या अशा आणि इतर प्रश्नांची सुयोग्यरीत्या सोडवणूक करण्याचे एक शास्त्र आहे. ज्यास आपण तत्त्वज्ञान या नावाने ओळखतो. तत्त्वज्ञानातील संकल्पना निरपेक्ष असतात. त्यांचा उपयोग आपण कोणत्या पद्धतीने करतो त्यावर सर्व अवलंबून असते. जगात शोषकांचे आणि शोषितांचे आपापल्या पद्धतीने तत्त्वज्ञान विकसित झाले. अनेक ठिकाणी संघर्ष होऊन जय - पराजय होत राहिला. जोपर्यंत जग अस्तित्वात असेल तोपर्यंत हा संघर्ष असाच अविरतपणे चालू राहील. कारण स्वामीत्व हक्काची आदिम प्रेरणा या संघर्षास खतपाणी घालून संघर्ष जिवंत ठेवेल. यातूनच उत्तरोत्तर मानवी सभ्यता विकसित होणार. या संघर्षाच्या मुळाशी जे तत्त्वज्ञान आहे ते महत्त्वाचे आहे. ते प्रत्येकाने समजून घेऊन विसंगतीचे मर्म शोधले पाहिजे. आपण मानवी अस्तित्वाकडे कशाप्रकारे पाहतो यावरून तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात दोन प्रवाह निर्माण झालेले आहेत. या विश्वाच्या मुळाशी कोणतीतरी एक चैतन्यशक्ती अस्तित्वात आहे, जी या सृष्टीचे चलनवलन करते ही एक विचारधारा. ज्यास आपण चैतन्यवादी म्हणतो तर दुसऱ्या बाजूला हे जग म्हणजे जड वस्तूच्या विशिष्ट नियमाने संचलित होते असा मानणारा पक्ष. ज्यास ढोबळमानाने आपण जडवादी संबोधतो. चैतन्यवाद्यांच्या मते हे जग अज्ञेय आहे. कारण सृष्टीतील कित्येक बाबींपासून आपण अनभिज्ञ असतो. ज्याप्रमाणे घड्याळाला चावी दिल्याशिवाय ते चालणे शक्य नाही, तसा जगतनियंता कळ देऊन सृष्टीचक्राचे परिचलन करतो, ही या पक्षाची धारणा. जगातील सर्वच धर्माच्या पृष्ठस्तराखाली हाच चैतन्यवादाचा प्रवाह अखंडित प्रवाहित आहे. तर जडवादी तत्त्वज्ञान विकसनातील सानुक्रमता अधोरेखित करते. अलौकिक, पारलौकिक काही नसते असे आग्रहाने प्रतिपादन करते. कारण अगदी अनूपासून ब्रम्हांडापर्यंतचे विश्व वस्तुमय आहे. जे अज्ञात आहे ते ज्ञात होऊ शकते. अगदी मानवी उत्पत्तीपासून विकसनाची एक गत्यात्मक प्रक्रिया आपणास दाखवता येते. जडवाद कोणत्याच अज्ञात शक्तीच्या आहारी जात नाही. अत्यंत तर्कशुद्ध विचारप्रणालीमुळे जगातल्या कोणत्याही टोकावर त्यात एकवाक्यता आढळेल. जडवादी तत्त्वज्ञानाचा एक टप्पा म्हणून आपणास विज्ञानाकडे पाहता येईल. चैतन्यवादी आणि जडवादी यांच्यामध्ये एक मूलभूत स्वरूपाचा फरक आहे. चैतन्यवादामध्ये अंतिम सत्यावर शिक्कामोर्तब होऊ शकतो; परंतु जडवादी तत्त्वज्ञान हेच अंतिम सत्य आहे, असे कधी म्हणणार नाही. त्याचे कारण असे की, जीवन प्रवाही आहे, कारण काळ प्रवाही आहे. काळाच्या या प्रवाहात ज्यास आपण अंतिम सत्य समजतो ते पुढे गेल्यानंतर सत्य असेलच असे नाही. विश्व बदलाच्या नियमांना अनुसरून जडवादी तत्त्वज्ञानाचे उपयोजन होत असल्यामुळे ते गत्यात्मक आहे. प्राप्त परिस्थितीतून पोषक द्रव्याचे घटक उचलून विकसित होत जाणारे शास्त्र आहे.

# दलित मित्र नामदेवराव व्हटकर



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**६ डिसेंबर १९५६... महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिवस... अन्यायाविरुद्ध, विषमतेविरुद्ध धगधगणारा लावा, कडाडणारी तोफ शांत झाली होती... नऊ कोटींची जनता क्षणात पोरकी झाली होती... प्रत्येकाच्या पायातील युगांयुगाचा गुलामगिरीचा साखळदंड आपल्या विध्वतेंन तोडणारा तो करोडांचा कैवारी आता निघून गेला होता... त्यांचं दिल्लीत निधन झाल्याची बातमी वाऱ्यासारखी देशभर पसरली... आपल्या लाडक्या नेत्याच्या अंत्ययात्रेला अवघा देश लोटला... जस कळेल तसं शहरातून, खेडोपाड्यातून पाऊल मुंबईच्या दिशेने पडू लागली होती... या अंत्ययात्रेसाठी उसळलेल्या जनसागराच्या असवाने मुंबईचा रस्ता ओलाचिंब झाला होता... या सगळ्यात एक समांतर गोष्ट घडत होती...**

या गोष्टी पुढं यायच्या सोडून काळाच्या ओघात गडप झाल्या... त्या शेवटच्या क्षणांना कायमच कैद करणारे, त्यासाठी आपलं राहत घर आणि आपला छापखाना विकणारे आजही सर्वांसाठी अनभिज्ञच आहेत, ही माहिती पुढं आली नाही ही खुप मोठी शोकांतिका आहे...

माजी आमदार, दलित मित्र नामदेवराव व्हटकर यांच्या विषयी बऱ्याच जणांना माहिती नसावी... कोल्हापूर जिल्ह्यातील मसूदमाले गावात २४ ऑगस्ट १९२१ मध्ये त्यांचा जन्म झाला... तर ४ ऑक्टोबर १९८२ साली मृत्यू... एकाचवेळी त्यांनी साहित्यिक, संपादक, नाट्यरंग, चित्रपट, नभोवाणी, स्वातंत्र्य सैनिक, प्रगतिशील शेतकरी अशा पंधराहून अधिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलं आहे... जन्मापासून बसलेल्या जातीयतेच्या चटक्यामुळे संपूर्ण आयुष्य त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी काम केलं... एकदा दाढी करत असताना नाव्ह्याने विचारलं तुम्ही कोणत्या जातीचे... यावेळी दलित म्हणून दिलेल्या उत्तराने नाव्ह्याचा वास्तरा गाल कापून गेला... तो चेहऱ्यावरचा डाग घालवता येणार नाही, पण या देशावरचा अस्पृश्यतेचा डाग मला पुसून काढावा लागेल असा प्रण करून त्यांनी अख्ख आयुष्य यासाठी खर्ची घातलं... वर सांगितलेल्या सर्व क्षेत्रातून त्यांनी या विरोधात आवाज उठवला... त्याच्या या कामाची महाराष्ट्र सरकारने दखल घेऊन त्यांना पहिला 'दलित मित्र' पुरस्कार देऊन सन्मानित केलं...

६ डिसेंबर रोजी ते मुंबईतच होते...त्यांना बाबासाहेब गेल्याचं कळल्यानंतर अतीव दुःख झालं... त्यांची अंत्ययात्रा चित्रित करून ठेवावी असं त्यांच्या मनात आलं...चित्रपट, नाटक यामुळे त्यांच्या अनेकांशी ओळखी होत्या... त्यांनी अनेकांना विचारलं पण कुणी तयार होत नव्हतं, काहींनी तर "त्याच आम्हाला काय, तो तुमचा नेता आहे, अस्पृश्यांचा नेता आहे आम्ही करणार नाही" असं स्पष्ट शब्दात उत्तर दिलं... कुणीतरी हे करेल अशी त्यांची भाबडी अशा फोल ठरली होती... येणाऱ्या काळासाठी या चित्रीकरणाच महत्व त्यांनी ओळखलं होत... कुणी मदत करो न करो, मी स्वतः करतो असं त्यांनी ठरवलं... पण ही इतकी सहजसोपी गोष्ट नव्हती... त्याकाळी व्हिडीओ रेकॉर्डिंग साठी कॅमेरा आणि त्यासाठी रील या इतक्या खर्चिक गोष्टी होत्या की त्याचा आज अंदाज देखील लावता येत नाही... अंदाजे तीन हजार फूट निगेटिव्हची रील, कॅमेरा आणि कॅमेरामन यासाठी जवळपास तेराशे ते चौदाशे रुपये खर्च येईल असा अंदाज त्यांनी बांधला... आता पैसा कुठून उभा करायचा हा मोठा प्रश्न होता... काही किरकोळ कारणांसाठी काहीतरी तारण ठेऊन ते एका मारवाड्याकडून पैसे घेत असत... पण यावेळी रक्कम मोठी होती, त्यासाठी त्यांनी



आपला एकमेव छापखाना गहाण ठेवावा लागला... त्यांना याच्या बदल्यात एकूण दीड हजार रुपये मिळाले... धावत - पळत ते शंकरराव सावेकर या कॅमेरामनकडे गेले... त्यांनी दीडशे रुपये प्रतिदिवस भाड्याने एक कॅमेरा आणला... आणि रात्री १०-११ च्या सुमारास राजगृह गाठले....



बाबसाहेबांचं पार्थिव पहाटे आले... एका ट्रकवरून अंत्ययात्रेला सुरुवात झाली.. याच ट्रकवर कसाबसा कॅमेरालावून उभा राहण्याची जागा मिळाली... पहिला शॉट खोदादाद सर्कल वर घेण्यात आला... यानंतर अंत्यदर्शनासाठी लोटलेल्या अलोट गर्दीचं दिवसभर चित्रीकरण सुरूच होत... सायंकाळी पार्थिव दादर चौपाटीवर पोहचलं... याठिकाणी शाही मानवंदना देण्यात आली... चंदनाच्या लाकडावर पार्थिव ठेवण्यात आलं... त्यांच्या मुखाजवळ शेवटचं लाकूड ठेवण्यापर्यंत चित्रीकरण सुरूच होतं... बाबासाहेबांचा शेवटचा चेहरा याठिकाणी चित्रित झाला... चितेला अग्नी दिल्यानंतर ही चित्रीकरण करण्यात आले...

या सगळ्या चित्रीकरणासाठी एकूण २ हजार ८०० फूट रील संपली होती... दुसऱ्या दिवशी बॉंबे फिल्म लॅबोरेटरीत ही फिल्म प्रोसेसला देण्यात आली... आता ही फिल्म धुणे, दुसऱ्या पॉझिटिव्हवर रशप्रिंट काढणे आणि एडिटिंग करणे यासाठी अडीच ते तीन हजार खर्च येणार होता... त्यासाठी पुन्हा त्याच मारवाड्याकडे जाऊन त्यांनी राहत घर गहाण ठेऊन तीन हजार रुपये आणले... पुढं या तारण ठेवलेल्या मिळकती सोडवत्या आल्या नाहीत... त्यामुळे त्या कायमच्या गेल्या...मुंबई सोडावी लागली... मालमत्ता गेली तर गेली... पण बाबासाहेबांच्या शेवटच्या स्मृती जपता आल्या, त्यांच्या उघड्या चेहऱ्याचा या जगातील शेवटचा क्षण युगांयुगासाठी कैद करता आलं, याच समाधान त्यांना होतं... आज आपण पाहतोय त्या शेवटच्या क्षणांची नामदेवराव यांनी केलेलं हे जगातील एकमेव चित्रफीत आहे... या गोष्टींचं कधीही श्रेय घेतलं नाही किंवा याच भांडवल केलं नाही...

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# समन्यायी पाण्याचं वादळ नाशिक, नगरच्या दाराशी..!

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** गेली चार वर्षे समन्यायी पाणी वाटपाच्या आघाडीवर शांतता होती. आता यावर्षी पुन्हा रणशिंग फुंकले जात आहे. मराठवाड्यातुन पाणी सोडण्याची मागणी होत आहे. त्यासाठी आंदोलने होत आहेत, उपोषणे होत आहेत, सर्व पक्षीय परिषदा होत आहेत, शासनदरबारी कैफियत मांडली जात आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक व नगरमधील आवाज काहीसा कमी दिसतो आहे.

वास्तविक या वर्षी नगर नाशिकमधील धरणे शंभर टक्के भरली असली तरी लाभक्षेत्रातील परिस्थिती भीषण आहे. भर पावसाळ्यात विहीरी कोरड्या पडलेल्या आहेत. पावसाची सरासरी ४५० मिमी असली तरी सरासरीच्या ५० % पेक्षा कमी पाऊस झालेला आहे. यावर्षी पडलेला पाऊस हा थोड्या प्रमाणात आणि विखुरलेल्या स्वरुपात तसेच दीर्घकालीन खंडीत स्वरुपात झालेला आहे. त्यामुळे खरीप पिक हातातून गेले आहे. ओढेनाले न वाहिल्याने भुजलपातळी खालावली गेली आहे. त्यामुळे रब्बी हंगामाची शाश्वती वाटत नाही. चाराटंचाई तसेच पाणी टंचाई रौद्ररूप घेईल अशी परिस्थिती आहे. पशुधन वाचवणे महामुष्कील होईल अशी चिन्हे आहेत . चारापिके तसेच पिण्यासाठी दरवर्षीपेक्षा जादा पाणी वर्ग करावे लागेल अशा परिस्थितीत जायकवाडीला पाणी सोडले गेले तर दुष्काळाची तीव्रता आणखी वाढेल . यावर्षी जायकवाडीत मागील शिल्लक १९ टिएमसी व यावर्षी नव्याने आलेले २४ टिएमसी असे ४३ टिएमसी उपयुक्त पाणी साठा उपलब्ध झालेला आहे. त्यापैकी ६.५ टिएमसी पाणी वापर झाल्याने आजमितीला जायकवाडीत ३६.५ टिएमसी पाणी साठा उपलब्ध आहे. मेंढेगिरी अहवालाप्रमाणे जायकवाडीत ६५% म्हणजे ५० टिएमसी पाणी असणे अपेक्षित असते. त्या तुलनेत ४३ टिएमसी पाणी उपलब्ध झालेले आहे. मागील काळात आपत्कालीन परिस्थितीत खास बाब म्हणून मृत साठ्यातून ८ टिएमसी पाणी वापरले गेलेले आहे. त्यामुळे कायदा आहे म्हणून पाणी सोडण्याचा आग्रह करणे चुकीचे आहे. विशेषतः यावर्षीची पावसाचे आत्यंतिक टोकाचे वितरण पहाता नगर नाशिकची परिस्थिती सुध्दा प्रत्यक्षात फार बिकट आहे. पाण्याचा काटकसरीने तसेच गरजेनुरूप वापर करण्याशिवाय पर्याय नाही. पाण्याची उधळपट्टी परवडणारी नाही. जायकवाडीच्या बाबतीत सन २०१२- १३ मध्ये झालेल्या एका सुनावणीत जायकवाडी फुगवट्यातून उन्हाळ्यात केवळ दोन महिन्यात २.५ टिएमसी पाण्याची चोरी झाल्याचे मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी रेकॉर्डवर घेतलेले आहे .विशेष म्हणजे ते जलसंपदा विभागाला त्याचा प्रतिवाद करता आलेला नाही . सन २०१९-२० मधील शासनाने प्रसिद्ध केलेल्या जललेख्यानुसार जायकवाडी प्रकल्पात एक टिएमसी पाण्यात १८५५ हेक्टर क्षेत्र भिजले तर मुळा प्रकल्पात एक टिएमसी पाण्यात ४५७१ हेक्टर क्षेत्र भिजले आहे. जलसंपदा मापदंडा प्रमाणे एका टिएमसी पाण्यात ४००० हेक्टर क्षेत्र भिजणे अपेक्षित असते. यावरुन हे सिध्द होते की फक्त पाणी साठ्याची टक्केवारी पाहुन समन्यायीची अंमलबजावणी करण्याऐवजी ती पाण्याचा कार्यक्षम वापर आणि सिंचीत क्षेत्र यावर आधारीत पाहिजे. अन्यथा केवळ कायद्यानुसार पाणी घ्यायचे आणि पाण्याची उधळपट्टी करायची हे सर्वथा गैर आहे.

> सद्यपरिस्थितीत १० टिएमसी पाण्याची मराठवाड्यातुन मागणी होत असली तरी कायदा ,क्षेत्रीय परिस्थिती ,गरज आणि कार्यक्षम वापर याची सांगड घालुन यथायोग्य निर्णय घेणे आवश्यक आहे . मेंढेगिरी अहवाल शासनाने स्विकारलेला नाही . त्यामुळे त्याचा बाऊ करण्यात फारसे हशील नाही . समन्यायी निर्णय राबवताना तोच तो साचेबंदपणा येऊ न देता लवचिकता आणि वास्तवतेचे भान ठेवणे महत्वाचे आहे . परिस्थिती खरोखर पाणी सोडण्यासाठी असेल तर जनतेतून फारसा विरोध होत नाही .परंतु तशी परिस्थिती नसताना पाणी सोडण्याचा कुणी आग्रह करत असेल तर जनतेत तिव्र असंतोष होणे साहजिक आहे .एकंदरीत या सर्व परिस्थितीजन्य घटकांचा साकल्याने विचार करुन पाणी सोडण्याची भुमिका घेऊ नये अशी नाशिक व नगर भागातील लाभधारकांची भावना आहे .

# दानपेटीवर चोरट्यांचा डल्ला; रोख लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**येवला :** शहरांमध्ये भुरट्या चोराने पुन्हा आपले डोके वर काढले असून यावेळी चोरट्यांनी चक्क देवाच्या घरी चोरी केली आहे अधिक माहिती अशी की, येवला शहरातील नवीन वसाहातीत असलेल्या पद्मकुछ वसाहत यामधील श्री वक्रतुंड मंदिर या ठिकाणी गणपती बाप्पाचे मंदिर आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या ठिकाणी अनेक भाविक मोठ्या संख्येने पूजा करत असतात दिनांक 13 ऑक्टोबरच्या रात्री सर्व तरुण मित्र मंडळ रात्री मंदिरातील पूजा आटपावून मंदिर लॉक करून घरी परतल्यानंतर रात्रीच्या सुमारास हा प्रकार झालेला आहे आणि सकाळी पूजा पुजारी महिला मंदिर साफ करण्यासाठी आली असता त्यांना हा सर्व प्रकार लक्षात आला.

यावेळी मंदिरातील दानपेटी, रोख रक्कम तसेच पितळी घंटा मंदिराची साऊंड सिस्टम यातील ऍम्प्लिफायर इतर असे एकूण 60 ते 70 हजार रुपयांचा ऐवज चोरी झाल्याची शक्यता तरुण कार्यकर्त्यांनी वर्तवली आहे. दरम्यान पुढील तपास येवला शहर पोलीस करीत आहे. या घटनेमुळे येवला शहरात खळबळ उडाली आहे.



# श्री रेणुका देवी ज्योती यात्रेचे लोहा, पोलीसवाडीत आज आगमन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** श्रीक्षेत्र माहूरगड ते श्री रेणुका देवी संस्थान पोलीसवाडी, ता.लोहा, जि.नांदेड. येथील पायी ज्योत यात्रा मागील 23 वर्षांपासून निघत असते. सदरील ज्योत यात्रेत. दरवर्षी 40 ते 45 भाविक असतात. या ज्योत यात्रेमध्ये. सर्व गावकरी सहभागी होत असतात. दि.14-10.2023. रोजी.दुपारी.12.वाजता निघून दि.15-10-2023 रोजी सकाळी.10:30.वाजता.ज्योत यात्रा पोलीसवाडी येथील रेणुका देवी संस्थान येथे पोहोचेल माहूर येथून गेलेल्या ज्योतीने. सकाळी साडेदहा वाजता घटस्थापना होत असते. श्री रेणुका ज्योत. यात्रेचे नांदेड शहरविष्णुपुरी सोनखेड लोहा शहर पोलीस वाडी येथे जंगी स्वागत करण्यात येते. आरती झाल्यानंतर रेणुका देवी संस्थांनच्या वतीने सर्वांचा सत्कार केला जातो.




# कळंबच्या 19 वर्षे मुले व मुलींच्या दोन्ही संघांना बॅडमिंटन स्पर्धेत तृतीय क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** धाराशिव येथे पार पडलेल्या 19 वर्षे मुलांच्या गटात टोणगे शिवराज दिलीप, मेंढापूरकर प्रथमेश प्रशांत व वाघमारे पार्थ सुरेश यांनी तर मुलींच्या 19 वर्षे गटात टारपे अर्पिता दत्ता, घुले वैष्णवी हरिदास, देवकर अनुजा लक्ष्मण, नलावडे शिवांजली शक्ती यांनी उत्कृष्ट खेळ करत तृतीय क्रमांक मिळवला. तर 14 वर्षे मुलीच्या गटात पवार वैभवी संदीप, 17 वर्षे गटात नम्रता नलावडे, सावित्री पाळवदे, 19 वर्षे मुलींच्या गटातून टारपे आर्पिता, घुले वैष्णवी, नलावडे शिवांजली या खेळाडूंची विभाग स्तरासाठी निवड चाचणी व्दारे निवड झाली. सर्व विजयी खेळाडूचे विद्यालयाचे मुख्याध्यापक जे. डी. कुपकर, उप मुख्याध्यापकजे.एन.पठाण, उपप्राचार्या डॉ. मीनाक्षीताई शिंदे क्रीडा विभाग प्रमुख यु. आर. गायकवाड व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यांनी अभिनंदन केले.




महाराष्ट्र Business Katta












# चला काही तरी शिकूया

आधुनिक केसरी

**परवाच एक अत्यंत साध जीवन जगणारा, अनेकांत असणारा, असा पंचाहत्तरीतला एक भला माणूस आपल्यातून गेला. अनेकांत असणारा म्हणजे अनेकांना अनेक कामात मदत करणारा, निस्वार्थीपणे अनेकांना हवी ती मदत करणारा असा हा सदाचारी माणूस गेला तो अनेकांना दुखः देऊन!! या वयाचे असणाऱ्या अनेक व्यक्ती आता आपला निरोप घेत आहेत. आपल्या अगदी मना विरुद्धच!! काही माणसं हवीहवीशी वाटणारी असतात. साधारण पंचाहत्तरीत असलेले लोकांना अनेक संस्कार त्यांच्या आईवडिलांकडून त्यांना मिळालेले होते. तो जमाना ही सत्शील, समाधानी, सदाचारी, संस्कारमय,परोपकारी, स्वाभिमान जपणारी, प्रामाणिक,साधे जीवन जगणारे,इतरांना प्रेरणा घेता येईल असे चारित्र्यसंपन्न अशी माणसं मागच्या पिढीत होती किंवा ही माणसं पाहिली, किंबहुना अनुभवली असं म्हणतो. माझच उदाहरण घ्या ना.मी आता साठी पार केली आहे.मी माझ्या आजीआजोबांना पाहिले, अनुभवले आहे. किती ती पिढी संस्कारक्षम होती.**

ह्या पिढीने कितीतरी गोष्टी सांगितल्या शिकविल्या. त्यांच्या आचरणातून अनेक गोष्टी जवळून पाहता आल्या अनुभवता आल्या. या पिढीने आपल्याच घरातील मुलांना संस्कार दिले असे नाही जवळपास राहणाऱ्या असंख्य लहानग्यांना ही दिले. कर्तृत्व,नेतृत्व, दातृत्व, मातृत्व, या गोष्टी त्यांनी आपल्या आचरणातून सहज शिकविल्या. आल्या अतिथ्या मुठभर देण्या। मागे पुढती पाहू नको ।। ही पंक्ती त्यांनी आपल्या अनुसरणातून इतरांना ही शिकविली. कर्ज न काढता ही सण उत्सव समारंभ, विवाह साजरे करता येतात हे या पिढीने शिकविले. पैसा नसला तरी घरची त्यावेळची अन्नपूर्णा, आहे त्यात सर्व काही व्यवस्थित करत होती. त्या पिढीच्या पुढल्या पिढीत म्हणजे आपल्या आईवडिलांना हे सहज शिकता आले. अंथरूण पाहून पाय पसरावेत ही म्हण यांच्यामुळे आपल्या पिढीला समजली. कष्टाची भाकरी कशी चांगली असते हे या पुढच्या पिढीकडून शिकायला मिळाले. आता सारखी विभक्त कुटुंबे तेव्हा नव्हती. जवळजवळ सर्व कुटुंबे ही एकत्र कुटुंब होती. घरातील वयस्क यांच्या मार्गदर्शनाखाली घर चालायचं. विविध कामांची वाटणी भावंडात होत असे. सुनांना ही घरची कामे वाटून दिली जायची. ही कामे घरातील सर्व बायका मिळून मिसळून करत असल्याने, पाणवठ्यावर पाण्याला जाता येता,तिथं धुणे धुता धुता त्यांच आऊटलेट आपोआपच होत असे.त्यामुळे त्यांच्या मनात काही साचत नसल्याने त्या आतून बाहेरून मोकळ्या असायच्या. दुपारच्या वेळी धान्य पाखडता पाखडता सगळ्या गोष्टींचा निपटारा व्हायचा. तसेच घरातील मुलींना सुध्दा कपडे धुणे,पाणी भरणे, झाडणं लोटणं करणे,सडा रांगोळी कळणे, ही कामे दिली जायची. आई काकूंच्या चार दिवस जेव्हा सुट्टी असायची तेव्हा सर्व स्वयंपाक चार दिवस मुलींनाच करावा लागे.तेव्हा काही पोळीवाली मावशी किंवा झाडणं पुसण्यासाठी मावशी कामाला ठेवण्याची पध्दत नव्हती. त्यामुळे अशा एकत्र कुटुंबात तरबेज झालेल्या मुली सासरी कुठल्याही कामात कमी पडत नव्हत्या. हल्लीच्या मुली कामे घरात पहिल्या पासून कमी करतात. अशा घरात सर्वजणी एकत्र मिळून मिसळून त्या घरची कामे करायच्या. म्हातार्या बाईचा शब्द कुणी मोडत नसायचे. प्रसंगी आजोबाही म्हणत ती म्हणतेय तसं करा. पुरुषसत्ताक पध्दती असली तरी मोठ्याआईचा मान राखला जात होता. आपण निर्मिलेले काहीही वाया घालवायचं नाही यावर कटाक्ष असायचा.अहो उन्हाळ्यात पापड कुरडई करताना पातेल्याला उरलेले/चिकटलेले पिठ सुध्दा वाया न घालवता त्याचे सांडगे तोडले जायचे. अहो, कपडे धुतलेले पाणी, भांडी धुतलेले पाणी सुध्दा वाया न जावू देता एखाद्या शोषखड्यात सोडले जायचे. तिथे आळू, भोपळा, घोसावळी यांचे वेल फोफावत असत. शिळंपाकं ही दुसऱ्या दिवशी खाल्लं जायचं (आवडीने). त्यावेळी चुलीवर बहुतांश स्वयंपाक होत असायचा गॅसची भानगड नव्हती. घरोघरी जर्मन भांड्यात खळखळ उखळणार्या दाळी आणि आमटीचा खमंग वास यायचा. शक्यतो ज्वारीच्या भाकरीच असायच्या. एखादी तोंडी लावायला भाजी असली की झाले. घरचं दुध दुभतं भरपूर असायचे.आता सारखे भेसळ दुध दुधाचे पदार्थ नसायचे. घरात कडवलेल्या घरच्या तुपाचा खमंग वास गल्लीभर घुमायचा. आताचे लोणी आणून घरी कडवलं तर घरात ही वास घुमत नाही.पण कुणी भिक्षेला आला तर मात्र नाही म्हटलं जात नव्हते. घरी सर्वच पाळीव प्राणी असल्याने मुक्या प्राण्यांवर दया करावी हे आपसूकच शिकायला मिळायचे.हे प्राणी आजीआजोबांचे फार लाडके असायचे.अशा कित्येक गोष्टी या पिढी कडून शिकायला मिळाल्या. ही माणसं बोलकी होती.त्यामुळे त्यांच्या उतारवयात त्यांना कुणीतरी आपल्याशी बोलावं ही त्यांची माफक अपेक्षा असायची.एखाद्या वृध्दाश्रमात गेलात तर तिथल्या मंडळींना तुमच्याशी तुम्ही अनोळखी असलात तरी,किती बोलू अन् किती नको अस होतं.आताच्या शिकणार्या किंवा तरुण तुर्कांना त्यांच्या जवळ बसायला वेळच मिळत नाही. मग बोलण तर लांबच.अशा मुलांना किंवा आताच्या नातवंडांना सांगू ईच्छितो त्यांच्या जवळ असणाऱ्या शिदोरीवर यथेच्छ ताव मारा. ती तुम्हाला कैक दिवसांची आयुष्यभर पुरणारी ठरेल.तुम्ही समाधानाची ढेकर द्याल.नुसतेच जाँब,मोबाईल, टिव्ही या जमान्यातील अबोल करणाऱ्या आणि साचून ठेवणार्या,गोष्टी मर्यादीत वापरून, खरे समाधानी आयुष्य मागच्या पिढी प्रमाणे जगा.ते शिकण्यासाठी त्यांच्या जवळ जरा बसा.हल्ली माणसाचं आऊट लेटच (मनाचे) होत नाही म्हणतात.त्यामुळे अनेकांनी नको त्या गोष्टी केल्या.त्या पिढीला आऊटलेटच्या भरपूर जागा होत्या आणि हक्काच्या होत्या. मित्र होते,गावकरी होते, पारावरची मंडळी होती,लळा लावलेले प्राणी होते. ही लोकं मनात काही साचू देत नव्हते. लगेच ही लोक मोकळी होत होती. ह्यांची मने कायम हलकीच होती. आणखीन एक होतं ते म्हणजे ही लोक ताण घेतच नव्हती. आहे ते स्विकारत होती म्हणून ती ताण विरहीत व आनंदी समाधानी होती. हेच या पिढीकडून शिकायला पाहिजे. ही पिढी संपायच्या मार्गावर आहे. कारण काळ कोणी रोखू शकत नाही. तेव्हा त्यांच्याकडून शिकण्या सारख्या कैक गोष्टी शिकून घ्याव्यात.वेळ काढा नाही तर वेळ गेलेली असेल. म्हणून म्हणतो चला या पिढी कडून काही शिकून घेऊया!!



# समाजासह संतांच्याही प्रेरक : संत आदिशक्ती मुक्ताई



डॉ. जगदीश पाटील
संपर्क क्र. 8149498020

आधुनिक केसरी

**रविवार, दि. 15 ऑक्टोंबर 2023 रोजी संत आदिशक्ती मुक्ताई यांची जयंती आहे. तेराव्या शतकाच्या आरंभी परकीय सत्तेच्या जुलूमाखाली चिरडून जात असलेल्या महाराष्ट्राच्या अंत:करणात नवचैतन्य निर्माण करण्याचे काम करून हिंदू संस्कृती अजरामर करणाऱ्या चारही भावंडांमधील सर्वात धाकटी संत आदिशक्ती मुक्ताई. प्रमाथी नाम संवत्सर शके 1201 मध्ये आश्विन शुध्द प्रतिपदा नवरात्रीच्या प्रारंभीला शुक्रवार या दिवशी संत मुक्ताई यांचा जन्म झाला. संतांनाही प्रेरणा देणाऱ्या संत आदीशक्ती मुक्ताई यांच्या जीवनपटाविषयी थोडेसे...**

संतांची भूमी म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे . जगाचा उद्धार करण्यासाठी संतांनी अवतार घेतला. याच संतांच्या मांदीयाळीत संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत सोपानदेव आणि संत आदीशक्ती मुक्ताई यांचा समावेश होतो. तेराव्या शतकाच्या आरंभी परकीय सत्तेच्या जुलूमाखाली चिरडून जात असलेल्या महाराष्ट्राच्या अंतःकरणात नवचैतन्य निर्माण करण्याचे काम या संतांनी केले व हिंदू संस्कृती अजरामर केली. तत्कालिन समाजातील भेदभाव, उच्चनीचपणा दूर करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. संपूर्ण जगाला वंदनीय असणाऱ्या श्रीमद्भगवतगीता या ग्रंथावर अपूर्व अशी टीका करून वेदांमधील गुह्यज्ञान संत ज्ञानेश्वर महाराजांनी लोकांसमोर मांडले. आत्मज्ञानाचा दरवाजा सर्वांसाठी खुला केला. चारही भावंडांनी आपल्या अल्पवयात ज्ञानाचे मोठे भांडार उघडून दिले. जगाचा उद्धार करण्यासाठी किंबहुना मानवतावाद जोपासण्यासाठी साक्षात श्रीमहादेव, श्रीविष्णू, श्रीब्रह्मा व श्रीआदीशक्ती यांनी संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत सोपानदेव आणि संत आदीशक्ती मुक्ताई यांच्या रूपाने अवतार घेतल्याचे संत जनाबाईंनी आपल्या अभंगात म्हटले आहे,

**सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ती दातार ।।**
**महाविष्णूचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ।।**
**ब्रह्मा सोपान तो झाला । भक्तां आनंद वर्तला ।।**
**आदिशक्ती मुक्ताबाई । दासी जनी लागे पायी ।।**

एवढेच नाही तर ज्या संतांनी समाजसुधारणा करण्याचे कार्य केले, अशा संतांनाही प्रेरणा देण्याचे काम वयाने लहानग्या संत मुक्ताई यांनी केले. विठ्ठलपंतांनी संन्यास घेतल्यानंतर गुरूंच्या आदेशाने रूक्मिशीची विवाह करून गृहस्थाश्रमात प्रवेश केला. त्यानंतर त्यांना चार अपत्ये झाली. निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव यांच्यानंतर संत मुक्ताई यांचा जन्म प्रमाथी नाम संवत्सर शके 1201 मध्ये आश्विन शुद्ध प्रतिपदा नवरात्रीच्या प्रारंभीला शुक्रवार या दिवशी झाला. जन्मापासून चारही भावडांचा संन्यासाची मुले म्हणून छळ होवू लागला. छळाला कंटाळून ते कुटुंबासहीत त्र्यंबकेश्वराला गेले. तेथे निवृत्तीनाथांना एका गुहेत गहिनीनाथांचा अनुग्रह प्राप्त झाला. त्यांनी ते ज्ञान ज्ञानेश्वर व त्यानंतर सोपानदेव व संत मुक्ताई यांना दिले. मातापिता निघून गेल्यानंतर ही भावंडे पोरकी झाली. काही दिवस आपेगावी राहून नंतर ती आळंदीला येवून राहू लागली. परंतु तिथेही त्यांना जननिंदा सहन करावी लागत होती. एके दिवशी संत ज्ञानेश्वरांच्या दर्शनामुळे एका ब्राह्मणाने कपड्यांसहीत अंघोळ केली. याचा राग आल्याने संत ज्ञानेश्वरांनी आपल्या झोपडीचे दार बंद करून आतमध्ये खेद करू लागले. थोड्या वेळाने संत मुक्ताई आल्यानंतर त्यांना संत ज्ञानेश्वरांच्या रागाचे कारण समजायला वेळ लागला नाही. आपल्या दादांचा राग शांत होण्यासाठी संत मुक्ताईंनी अगदी लडीवाळपणाने, प्रेमळ भावनेने, कोमल भावनेने त्यांची समजूत काढली. संत मुक्ताईंची ही समजूत अकरा अभंगांची असून त्यांना ताटीचे अभंग असे म्हणतात. या ताटीच्या अभंगांतून ज्ञानेश्वरांचा राग शांत करण्याबरोबरच अखिल विश्वाचे कल्याण करणे कसे गरजेचे आहे हे मुक्ताईंनी पटवून दिले आहे. त्यातून संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित होण्यासाठी मानवतावादाची कशी गरज आहे हे सिद्ध होते. ताटीच्या अभंगांतील एक-एक शब्द मानवतावादाला धरून आहे.

**तुम्ही तरूनी विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।**

मुक्ताईंच्या या लडिवाळ हावभावांनी आणि कानालाच नव्हे तर मनालाही आकर्षित करणाऱ्या अमृतकल्लोळ आणि संगीतमय पण मोठमोठ्या शास्त्रीपंडितांना देखील मंत्रमुग्ध करणाऱ्या ज्ञानगर्भ







अशा बोबड्या बोलांनी संपूर्ण जगात मानवता नांदावी या एकच हेतू डोळ्यासमोर ठेवून आपल्या मोठ्या भावाला समजावले. त्यामुळे ज्ञानेश्वरांचे देखील हृदय फुलून आले. अशा प्रकारच्या ताटीच्या अभंगांमधील मोजके पण अर्थपूर्ण शब्द आणि प्रत्येक अभंगाच्या शेवटी आग्रहपूर्वक केली जाणारी ताटी उघडा ज्ञानेश्वरा ही आळवणी यामुळे ज्ञानेश्वरांचा राग कमी कमी होत गेला आणि ते ताटी उघडून बाहेर आले. मुक्ताईंना जवळ घेवून त्यांनी तिचे प्रेमाने कौतुक केले. त्यानंतरच त्यांनी श्रीमद्भगवतगीतेवर टीका करणारा ज्ञानेश्वरी हा जगतमान्य ग्रंथ लिहीला. असा ज्ञानेश्वरांसारखा ज्ञानी व योगी भाऊ आणि जगाच्या उद्धाराकरीता, मानवतेकरीता 'तुम्ही तरूनी विश्व तारा' अशी प्रोत्साहन देणारी प्रेमळ बहिण यांचा संवाद अखिल विश्वात कुठेही पाहायला मिळणार नाही. चारही भावडांची किर्ती ऐकून पैठणच्या ब्राह्मणांनी त्यांना अवतारी पुरूष असल्याचे शुद्धीपत्र दिले. तेथून नेवासे येथे गेल्यानंतर संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी व अनुभवामृत हे ग्रंथ लिहीले. त्यानंतर पुणतांबे येथे ही भावंडे गेली. तेथे 1400 वर्षांचे योगी संत चांगदेव समाधी लावून बसले होते. त्यांच्या गुहेबाहेर प्रेतांचा प्रचंड ढिग पानांमध्ये गुंडाळून ठेवला होता. प्रेतांजवळ बसलेल्या माणसांना याविषयी विचारले असता, संत चांगदेव महाराज समाधीतून उठल्यानंतर प्रेतांवर जेव्हा एक नजर टाकतात तेव्हा ही सर्व प्रेते जिवंत होतात. हे ऐकल्यावर संत मुक्ताईंनी जवळच पडलेले एक हाड उचलले. त्यावर संजीवनी मंत्राचा उपयोग करून ते हाड एका मृत कुत्र्यावर फिरवून त्याला जिवंत केले. त्याबरोबरच तेथील सर्व प्राणीमात्रांची प्रेते संत मुक्ताईंनी जिवंत केली. त्यानंतर ही भावंडे आळंदीला निघून गेली. इकडे समाधीतून उठल्यानंतर संत चांगदेवांच्या शिष्यांनी त्यांना संत मुक्ताईदी भावंडांचा चमत्कार सांगितला. तेव्हा त्यांनी त्यांना भेटायचे ठरविले. काय लिहू व कसे लिहू या विवंचनेत त्यांनी कोरे पत्र पाठवून दिले. त्यावर संत मुक्ताई यांनी 1400 वर्ष जगूनसुध्दा अजून कोराचा कोराच आहे, असा संदेश पाठविला. त्यानंतर संत चांगदेव हे वाघावर बसून चारही भावंडांना भेटायला आले असता त्यांनी निर्जिव भिंत चालवून त्यांचे स्वागत केले. तेव्हा संत चांगदेवरायांचा गर्वहरण झाल्याने संत मुक्ताईंनी त्यांना गुरूपदेश दिला. गुरूपुत्र झालो मुक्ताईचा असे म्हणून संत चांगदेवांनी संत मुक्ताईंचा गौरव केला. धन्य ती दहा वर्षांची माता आणि चौदाशे वर्षांचे बालक. सर्वदूर चारही भावंडांना मानू लागले. परंतु आळंदीतीलच एक कर्मठ ब्राह्मण विसोबा खेचर मात्र त्यांचा अजुनही उपहास करीत होता. एकदा संत निवृत्तीनाथांना मांडे खाण्याची इच्छा झाल्यावर त्यांनी संत मुक्ताईंनी कुंभारणीच्या घरून मांडे भाजण्यासाठी परळ आणण्याकरीता पाठविले. परळ घेवून येत असतांना वाटेत भेटलेल्या विसोबा खेचराने ते फोडून टाकले. उदास चेहरा घेवून आलेल्या संत मुक्ताईंना बघून संत ज्ञानेश्वरांनी आपल्या तपाच्या सामर्थ्याने पाठ तापवली व त्यावर संत मुक्ताईंनी मांडे भाजले. हे सर्व विसोबा खेचर खिडकीतून पाहत होते. त्यावेळी त्यांचा अहंकार जळून भस्म झाला. त्यांनी संत मुक्ताईंच्या पायावर लोटांगण घातले. संत मुक्ताईंनी त्यांना उपदेश करून त्यांचा उद्धार केला. विसोबा खेचराला जसा अहंकार होता तसाच संत नामदेवांना होता. विठ्ठलाच्या जवळ राहत असल्याने त्यांना सर्व दुय्यम वाटत होते. ज्यावेळी संत ज्ञानेश्वरादी भावंडे संत नामदेवांच्या भेटीस आली त्यावेळी सर्वांनी त्यांचे दर्शन घेवून लोटांगण घातले. परंतु संत नामदेव कोणाच्याही पाया पडले नाही. तेव्हा मुक्ताईंनी अखंड जयाला देवाचा शेजार । का रे अहंकार गेला नाही ।। अशा शब्दांत त्यांची कानउघाडणी केली. त्यानंतर पांडुरंगाच्या सांगण्यानुसार संत नामदेवांनी विसोबा खेचरांना गुरू केले. संत मुक्ताईंनी संत नामदेवरायांचा गर्वपरिहार करून त्यांचा अहंकार नष्ट केला. आपले अवतार कार्य संपल्यानंतर संत ज्ञानेश्वरांनी शके 1218 मध्ये 21 वर्षे, 3 महिने 5 दिवसांचे असतांना आळंदी येथे समाधी घेतली. संत सोपानदेवांनी शके 1218 मध्ये 19 वर्षे, 1 महिना 13 दिवसांचे असतांना सासवड येथे समाधी घेतली. संत निवृत्तीनाथांनी शके 1219 मध्ये 23 वर्षे, 4 महिने 11 दिवसांचे असतांना त्र्यंबकेश्वर येथे समाधी घेतली. संत मुक्ताई यांनी समाधी घेतली नसून त्या तापीतीरी गुप्त झाल्या असल्याचे संत नामदेव महाराज यांनी समाधीपर प्रकरणातील अभंगात म्हटले आहे. धन महत्नागर धन्य सोमेश्वर । धन्य तापीतीर योगियांचे ।।

विधीच्या संकेतानुसार वैशाख वद्य दशमीच्या दिवशी सर्व संतमंडळी स्नानासाठी तापीतीरावर आली. यावेळी जिकडे तिकडे वीणामृदंगाचे झणत्कार होवू लागले. भगवंताच्या नामाच्या गजराने व जयजयकाराने परिसर दणाणू लागला. स्नान आटोपून तापीतीरावरच सर्व संतमंडळी भजन करू लागली. वैशाख वद्यचा शेवटचा आठवडा असल्यामुळे एकाएकी विजांचा कडकडाट सुरू होवून चारही दिशा कंपायमान होवू लागल्या. आता आकाश कोसळून पडते कि काय अशी भिती वाटू लागली. भयंकर वारा सुटून पृथ्वी थरथर कापू लागली. आकाश काळ्याकुट्ट मेघांनी भरून आले. सगळ्यांचे डोळे घट्ट झाकल्यासारखे झाले. कोणीच कोणाला दिसत नव्हते. यावेळी संत निवृत्तीनाथ, पांडुरंग, रूक्मिणी हे सर्व मुक्ताईला सांभाळा, मुक्ताईला सांभाळा असे म्हणू लागले. कोणालाच कोणाची शुद्ध राहिलेली नव्हती. अशा परिस्थितीत, **कडाडली वीज निरंजनी जेव्हा । मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली ।।** आकाशात विजांचा प्रचंड कडकडाट झाला. त्यावेळी निरंजनस्वरूप आदीशक्ती मुक्ताई एकाएकी अदृश्य झाल्या. सगळीकडे वातावरण शांत झाले. विजेचा कडकडाट शांत झाला. आकाशातील अभ्रे नाहीशी झाली. मात्र त्यानंतरही सर्वत्र त्रिभुवनात एक प्रहरपर्यंत प्रकाश होता. शके 1219 मध्ये वैशाख वद्य दशमीच्या दिवशी महत्नागर म्हणजेच श्री क्षेत्र मेहूण येथील तापीतीरावर 17 वर्षे, 7 महिने, 24 दिवसांच्या असतांना संत मुक्ताई गुप्त, तिरोभूत झाल्या. संत आदिशक्ती मुक्ताई यांना ब्रह्मचित्कला, ज्ञानदिप्तीकला, प्रत्यक्षज्योती, निरंजनी, चिद्रत्नकलिका, ब्रह्मणी, अमृतसंजीवनी असे देखील उपाख्य देण्यात आले आहेत. त्यांचे कुल माध्यंदिन शाखीय देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण असे असून गोत्र पंचप्रवरान्वित वत्स आहे. जन्मस्थळ आपेगाव आणि जन्मकाल शके 1201 प्रमाथी संवत्सर, आश्विन शुध्द प्रतिपदा, शुक्रवार, मध्यान्ह असा आहे. त्यांची गुरूपरंपरा आदिनाथ - मत्स्येंद्रनाथ - गोरक्षनाथ - गहिनीनाथ - निवृत्तीनाथ - मुक्ताई अशी आहे. योगविद्या, ज्ञानसंपत्ती व श्रीकृष्णप्रेम भक्तीचा वारसा त्यांना परंपरागत प्राप्त झालेला होता. चांगदेव महाराज, नामदेव महाराज, नामदेव महाराजांच्या कुटुंबातील मंडळी, विसोबा खेचर, जनाबाई हे त्यांचे शिष्य-प्रशिष्य होते. त्यांच्या ग्रंथरचनेविषयी सांगायचे म्हटल्यास हरिपाठ, ताटीचे अभंग, कल्याणपत्रिका, पदे, झोपाळ्यावरील ओव्या, हळदुली, पाळणे, सासुरवास, स्फुट अभंग यासह अनेक विषयांवर मुक्ताईंनी लेखन केलेले आहे. संतांनाही प्रेरणा देणाऱ्या संत आदीशक्ती मुक्ताई यांच्या चरणी जयंतीदिनी कोटी कोटी अभिवादन.

# क्षमा



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**कधीतरी आपल्या मनासारखे घडले नाही की क्रोध निर्माण होतो. त्या क्रोधातून एकमेकांशी संवाद न घडता वाद वाढत जातो आणि रागाच्या भरात कोणीतरी एकमेकांना काहीतरी बोलतात आणि त्यातलाच एखादा शब्द जिव्हारी लागून जातो. भले आपला समोरच्याला किंवा समोरच्याचा आपल्याला. पण मग त्या एका शब्दाने मनात गाठ बांधली जाते. खरं म्हणजे असंख्य चांगले क्षण त्या माणसाबरोबर आपण घालवलेले असतात आज पर्यंत. अगदी रेशीमगाठ असते त्या नात्यांमध्ये. पण एका शब्दाने मात्र ती रेशीमगाठ अगदी निरगाठ होऊन जाते आणि मग अबोला सुरू होतो पण मंडळी एखाद्या वेळेस तो शब्द सोडून देऊन बघा ना....**

जो मनुष्य आपल्याला बोललेला आहे तो कदाचित चांगल्या मनस्थितीत नसेल, काही अडचणीत असेल, त्याचा काही गैरसमज झाला असेल किंवा अन्य काहीही कारणाने जो तो असं काही बोलला असेल जे आपल्याला जिव्हारी लागलं असेल तरीपण आपण एखाद्या वेळेस सोडून द्यायला काय हरकत आहे....? हे सोडून देणे म्हणजे क्षमा करण्याची पहिली पायरी नंतर संवादाने याच्यात बदल घडवून आणता येतो. पण आपण कुणालाही माफ करायला तयार नसतो. क्षमा करायला तयार नसतो. खरं तर ही स्वाभाविक कृती असते. पण आपण ती खिन्नता मनात धरून बसतो. आणि कधी ही खिन्नता क्रोधाच्या रूपाने ही बाहेर पडते. खिन्नता काय किंवा क्रोध काय त्याचा त्रास आपण आपल्या स्वतःलाच करून घेत असतो.

तुकाराम महाराज म्हणतात ,

**योगाचे ते भाग्य क्षमा ।**
**आदी दमा इंद्रिये ॥१॥**
**अवघी मान्यें येती घरा ।**
**देव सोयरा झालिया ॥२॥**
**मिरासीचे म्हणे सेत ।**
**नाही देत पीक उगें । ॥३॥**
**तुका म्हणे उचित जाणा ।**
**उगीच सिणा कशाला ॥४॥**

योग्याचे भाग्य खरंतर क्षमा आहे. पण कोणालाही क्षमा करणे आपल्याला तितकेसे जमत नाही किंवा खूप लवकर जमत नाही. अर्थात तुकाराम महाराज म्हणतात त्यासाठी इंद्रियांचे दमन करायला लागते. म्हणजे काय तर योग्या सारखे बनायचा प्रयत्न करावा लागतो. क्षमाशील राहावे लागते. शांत रहावे लागते. सहनशील राहावे लागते. हे दमन झाले तर मात्र देव आपला सोयराच होतो आणि त्याच्या निमित्याने भाग्य घरास येते. तुकाराम महाराज उदाहरण देताना म्हणतात की मिरासीचे शेत असले तरी म्हणजे वतनदारीचे शेत असले तरी त्याच्यावरती मेहनत घ्यावीच लागते. पेरणी करावी लागते. त्याशिवाय पीक कसे येईल....? म्हणजेच आपल्याला आपल्या इंद्रियांवरती थोडे काम करावे लागते. आपल्या गुणांवरती थोडे काम करावे लागते. मग कोणाला माफ करणे इतके अवघड जात नाही. परंतु जोवर आपल्या मनामध्ये आपण गाठ बांधून ठेवतो तोवर आपण दुसऱ्याला माफ करू शकत नाही. खरंतर दुसऱ्याला माफ करणं म्हणजे स्वतःच्या मनातील कचरा काढून टाकणे होय. पण आपण मात्र इतके साधे सोपे काम करत नाही आणि मनाला एक कचऱ्याचा डब्बा जणू बनवत जातो. आपल्याला दुखावणारा माणूस चालता होतो आनंदी राहतो आणि आपण मात्र त्यांनी बोललेला शब्द मनात धरून आपले मन खराब करत राहतो. तुकाराम महाराज म्हणतात यातलं योग्य जे असेल ते आपण करायला हवे. उगाचच गाठी मनामध्ये बांधून स्वतःला शीण का करून घ्यायचा....?

हे स्वतःच्या गुणांवर काम करणे म्हणजे समर्थ रामदास स्वामी म्हणतात


**अवगुण सोडीता जाती ।**
**उत्तम गुण अभ्यासिता येती ।**
**कुविद्या सांडून सिकती ।**

शहाणे विद्या ॥स.६ चातुर्य लक्षण

अर्थात महाराज म्हणतात की जे शरीर किंवा रंग देवाने दिलेला आहे तो काही आपण बदलू शकत नाही पण आपले अवगुण मात्र आपल्याला नक्की बदलता येतात. अभ्यासाने चांगले गुण अंगी बाळगता येतात. कोणालाही माफ केले की फायदा आपल्यालाच होतो.

ओशो म्हणतात ज्या व्यक्तीत सहनशीलता नसते ती व्यक्ती लगेच कोसळते आणि ज्या व्यक्तीने सहनशीलतेचे कवच धारण केलेले आहे तिला प्रतीक्षणी होणारे आघातच बलवान करत जातात आणि त्यासाठी त्यांनी ऐरणीचे उदाहरण दिलेले आहे.

**मनाच्या श्लोकात श्री समर्थ म्हणतात**
**नसे गर्व अंगी सदा वितरागी ।**
**क्षमा शांती भोगी दया दक्ष योगी ।**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।**
**वहीं लक्षणीं जाणिजे योगीराणा ॥म.श्लो.१३४**



अर्थात ज्याच्या अंगी कसलाही अभिमान नाही तो सर्वदा वैराग्याचे पालन करतो. जो क्षमा शील आणि शांत राहतो, जो मनापासून दयावान असतो , ज्याचे ध्यान स्थिर झालेले असते त्याला कशाचाही लोभ नसतो त्याचे मन कधीही क्षुब्ध होत नाही त्यामुळे तो कधीही दिनवाणा असत नाही. ही सगळी योगीयांच्या राजाची लक्षणे समजावेत.

जसे एखाद्याला आपण माफ करतो तशी माफी पण मागता आली पाहिजे .आपली चूक असो नसो नाते जुळून राहण्यासाठी किंवा मैत्री जुळून राहण्यासाठी किंवा संबंध चांगले राहण्यासाठी आपल्याला माफी पण मागता आली पाहिजे. आपली चूक असेल तर, तर नक्कीच माफी मागता आली पाहिजे. त्या माफीने पण पडलेली दरी नक्कीच भरून निघते. माफीसाठी अजून एक माफी म्हणजे स्वतःला माफ करणे. आपल्या दैनंदिन जीवनात आपण असंख्य चुका करत असतो. त्यातील काही चुका आपल्या मनामध्ये घर करून राहतात .आपल्या चुकांना आपण स्वीकारले पाहिजे. आपल्या चुकांची जबाबदारी जर आपण घेतली तर ती चूक आपल्याला सुधरवता येते किंवा कष्टाने आपल्या चुकीवर मातही करता येते त्यामुळे आपली चूक, स्वतःची चूक मान्य करून त्यावर काम करून स्वतःला माफ पण करता आले पाहिजे. जितकं क्षमाशील मन होईल तितकी आनंदासाठी चित्तामध्ये जागा होईल अन्यथा सारे चित्त खिन्नता, क्रोध, चुका याने व्यापून राहते.

समर्थ योगी ज्ञानेश्वर महाराज देखील एकदा सगळ्या जगावर चिडले होतेच तेव्हा आदि मायेचे रूप समजली जाणारी संत मुक्ताई ज्ञानियांच्या राजाला समजावून सांगते. ज्ञानेश्वरा तुम्ही साधू आहात ना ....!

मग साधू मोठ्या मनाचे असतात. ते जगाचा अपराध सहन करतात. लोक जरी रागाने अग्नी झाले तरी साधूने सुखाने पाणी व्हावे. शब्दाचे बाण आपणास रुतले असतील तर तो उपदेशच समजावा. जगत् रुपी पटात ब्रह्मरूपी दोरा ओवलेला आहे. मग तुम्ही कोणाला रागे भरणार आहात का.. ? म्हणून ज्ञानेश्वरा ताटी उघडा.

राग येणं, खिन्नता येणं, नाराज होणं हे सारे सहज भाव आहेत आणि ते कोणाबरोबरही होऊ शकतात. प्रसंगानुरूप मनुष्य चिडतो. परंतु प्रयत्नपूर्वक आपल्याला त्यापासून दूर जाता येते. आयुष्य क्षणभंगुर असते. त्यामुळे त्या आयुष्याची किंमत करायला हवी. एकदा निघून गेलेलं मनुष्य किंवा नातं परत मिळू शकत नाही. ज्याच्याबरोबर असंख्य आनंदाचे क्षण घालवलेले असतात त्याच्याबरोबर एखाद्या शब्दासाठी रागवून बसू नये. सोडून द्यायला शिकावे. हे सोडून देता देताच माफ करणे, क्षमा करणे आणि क्षमा मागणे आणि स्वतःला क्षमा करणे हळूहळू प्रयत्नाने नक्की जमू लागते. त्यामुळे आनंदामध्ये नक्कीच भर पडते.

महान तपस्वी श्री निवृत्तीनाथ म्हणतात,
शांती क्षमा दया सर्वभावें करुणा ।
तोची नारायणा आवडे दासू ॥१॥नि.गा.२९७

अर्थात माफ करणारा, क्षमा करणारा हा नारायणाला देखील प्रिय असतो. म्हणून माफ करायला शिकायला हवे. समोरच्याला क्षमा करता आली पाहिजे. आपल्यालाही क्षमा मागता आली पाहिजे. श्री एकनाथ महाराज म्हणतात न सुटे कल्पना अभिमानाची गाठी घेता जन्म कोटी हरि कैचा खरं म्हणजे जीवाच्या ठिकाणी असलेला अहंकार जो काही केल्या सुटत नाही. तो सुटत नाही म्हणून क्षमा करता येत नाही आणि म्हणून हरी प्राप्ती होत नाही. माफ करणे म्हणजे चुकीचे समर्थनही नसते. आपण वारंवार माफ करत असल्यामुळे कोणी आपला गैरफायदा घेत असेल तर तेही आपल्याला विवेकाने समजले पाहिजे. अशा ठिकाणाहून आपण दूर राहू शकतो पण आपल्या मनामधून खिन्नता, राग हे मात्र हे मात्र नक्कीच दूर करायला हवे. मग चित्तशुद्धीचा मार्ग मोकळा होतो. आणि एकदा चित्त शुद्ध झाले की निरामय आनंद मिळतोच. एकनाथ महाराज म्हणतात, हरी फक्त भक्ताच्या शुद्ध निर्मळ अंतःकरणातच वास करतो म्हणून आधी अंतकरण शुद्ध आणि निर्मळ करा. तिथले क्रोधाचे काटेकुटे निपटून काढा. स्वच्छ झाडून घ्या आणि हे झाडायला हरिनामाचाच झाडू घ्या. राम नामाने राक्षस आणि भुते पळून जातात असे आपण लहान मुलांना पण सांगतो. काम ,क्रोध, लोभ, माया हे सगळे अंतरातले राक्षस आहेत त्यांना पळवायचे असेल तर एकच हमखास उपाय आहे तो म्हणजे हरि स्मरण..!!

चला तर मग हरिनामाचाच झाडू घेऊ या आणि क्षमा करून दयार्द बनूयात...!!

# कविवर्य राजा बढे यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**ज्यांच्या गीत रचनेला राज्य गीताचा सन्मान मिळाला. ज्यांचे "गर्जा महाराष्ट्र माझा.." हे गीत प्रत्येक पाठ्यपुस्तकात प्रकाशित झाले व प्रत्येक राष्ट्रीय सण उत्सवात शाळा, महाविद्यालयांबरोबरच शासकीय कार्यालयांमध्येही त्याचे गायनही केले जात आहे असे मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध कवी ,गीतकार, कविवर्य राजा बढे यांचे पूर्ण नाव राजा निळकंठ बढे असे होते. त्यांचा जन्म १ फेब्रुवारी १९१२ रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मध्यप्रदेशातील छिंदवाड्याला तर, माध्यमिक शिक्षण नागपूरच्या टिळक विद्यालयात झाले.**


पंजाब विद्यापीठातून मॅट्रिक पास झालेल्या राजा बढे यांच्या आईचे नाव गोदावरी बाई असे होते. महाराष्ट्राच्या प्राचीन राजा हाल सातवाहन यांच्या काव्याचे संकलन 'गाथा सप्तशतीचा' मराठी अनुवाद राजा बढे यांनी केला असून ही त्यांच्या लेखनातील अत्युच्च कार्यसिद्धी समजली जाते. 'अशी गंमत आहे', 'मंदिका', 'मखमल', 'माझिया माहेरा जा', 'वर्खाचा विडा', 'योजनगंध', अशी विपुल साहित्य संपदा लिहिणारे राजा बढे संपादक, चित्रपट अभिनेते, नाटककार , कादंबरीकार म्हणून ही प्रसिद्ध आहेत.

कविवर्य राजा बढे यांनी लिहिलेल्या कवितांमध्ये यमक, लयबद्धता, गेयता यांची सुंदर गुंफण असल्यामुळे त्यांच्या बऱ्याचशा कवितांचे गीतात रूपांतर झाले.त्यांनी अनेक चित्रपटांसाठी गीत लेखन केले. चित्रपटांमधील त्यांची बरीच गीते अजरामर झाली. विविधांगी काव्यलेखन करणाऱ्या राजा बढे यांनी आपल्या 'माझिया माहेरा जा!' या कवितेतून माहेरचे सुरेख असे वर्णन केलेले आहे. एका सासुरवाशीन स्त्रीच्या मनातील माहेराची ओढ राजा बढे यांनी या कवितेतून मांडली आहे. माहेरी जाण्याची ,तेथील सर्वांना भेटण्याची खूप इच्छा या सासुरवाशीनीला झालेली आहे. पण ती काही कारणामुळे माहेरी जाऊ शकत नाही तेंव्हा ती पाखराला माहेरी जाण्याची विनंती करते. पूर्वीच्या काळी आजच्यासारख्या सोयी -सुविधा नव्हत्या. एखाद्या गावातील ख्याली- खुशाली किंवा सुखदुःखाचे निरोप प्रत्यक्ष गेल्याशिवाय कळत नव्हते. फार -फार तर एखादे पत्र पाठवले जायचे. पण लिहिता वाचता येणाऱ्या साक्षर लोकांची संख्याही फार कमी असल्यामुळे हेही साधन तेवढे प्रभावी नव्हते. त्यामुळेच कविवर्य राजा बढे यांच्या कवितेतील सासुरवाशीन स्त्री पाखराला माहेरी जाण्याची विनंती करते. पुढील ओळींमधून कवींनी तिच्या मनातील भाव-भावना व्यक्त केल्या आहेत.

माझिया माहेरा जा! रे पाखरा,

**माझिया माहेरा जा देते तुझ्या सोबतीला,**
**आतुरले माझे मन वाट दाखवाया नीट, माझी**
**वेडी आठवणमायेची माऊली सांजची सावली**
**माझा ग भाई राजा माझिया माहेरा जा**

कवींच्या कवितेतील सासुरवाशीन स्त्री पाखराला म्हणते," हे पाखरा ! तू माझ्या माहेरी जा! तू काही एकटा जाणार नाहीस तर तुझ्या सोबतीला माझे आतुर झालेले मन आहे. माझ्या माहेराची वाट



अजूनही माझ्या आठवणीत आहे. माझी ती आठवण तुला माहेराची वाट नीट दाखवेल.पुढील ओळीत कवी सासुरवाशीनीच्या आईला मायेची माऊली म्हणतात. जशी सांजची म्हणजेच सायंकाळची सावली, शांत शितल असते तशीच त्या स्त्रीच्या आईची माया ही जणू काही सांजेची सावलीच आहे. भावाला कवी 'भाई राजा' असे म्हणतात व सर्वांच्या भेटीसाठी पाखराला माहेरी जाण्याची विनवणी करतात. प्रत्येक स्त्रीला आपले माहेर खूप प्रिय असते. तिच्या मनी सदैव माहेरचा मोठेपणा असतो. माहेरचे कौतुक सांगताना तिच्या आनंदाला पारावार राहत नाही. कवितेच्या पुढील ओळीतून कवींने सुद्धा अशाच प्रकारचे वर्णन सासुरवाशींच्या भावनांमधून केले आहे.

**माझ्या रे भावाची उंच हवेली**
**वहिनी माझी नवींनवेली**
**भोळ्या रे सांभाची भोळी गिरीजा**
**माझिया माहेरा जा**

सासुरवाशीन स्त्रीच्या माहेरी भावाची उंच हवेली (मोठे घर)असून त्याचे नवीनच लग्न झालेले आहे. नवीन आलेल्या वहिनीला कवीने, "भोळ्या सांभाची भोळी गिरीजा" असे म्हटले आहे. भोळा सांभ म्हणजेच शंभू महादेव व गिरीजा म्हणजेच देवी पार्वती... जशी शंभू महादेवाची व पार्वतीची जोडी शोभून दिसते तशीच माझ्या भाऊ व वहिनीची ही शोभून दिसते. अशीच काहीशी भावना सासुरवाशींच्या मनात कौतुकाने आलेली आहे. कवीने त्याचे वर्णनही खूप सुंदर शब्दात केले आहे. पुढील ओळीत कवी लिहितात, **अंगणात पारिजात, तिथं घ्या हो घ्या विसांवादरवळे बाई गंध चोहीकडे गावोंगावां हळूच उतराखालीं, फुल नाजूक मोलाची माझ्या माय माऊलीच्या, काळजाच्या कीं तोलाची तुझी ग साळुंकी, आहे बाई सुखी सांगा पाखरांनो तिचीये कानीं एवढा निरोप माझा माझिया माहेरा जा**

कवींने सासुरवाशीनीच्या मनातील भावना व्यक्त करतांना माहेरचे अंगण, तिथे फुललेला पारिजात, त्याचा गावोंगावांत चोहिकडे दरवळारा गंध, फुलाचे नाजूकपण, अशा सर्व गोष्टींचे सुरेख वर्णन केलेले आहे. सासरहून माहेरी उडत जाणारे पाखरू एवढे दूर उडून जेंव्हा थकून जाईल तेव्हा त्याला अंगणातल्या पारिजातकाच्या झाडावर विसावा घ्यायला सासूवाशीन सांगते .कवी म्हणतात, "अरे पाखरा! तू अंगणातल्या पारिजातकावर जरा वेळ विसावा घे. त्याच्या फुलांचा गावोंगावांत चोहीकडे दरवळ सुटलेला असेल.विसावा घेतल्यानंतर हळूच खाली उतरून मग पुढे जा. कारण, खाली पारिजातकाच्या नाजूक फुलांचा सडा असेल. ती नाजूक फुले पाखराच्या पावलांनी चुरगळली जाऊ नयेत असे सासुरवाशीनीला वाटते. कारण सासुरवाशीणीला माहिती आहे ती पारिजातकाची नाजूक फुले तिच्या आईला खूप प्रिय आहेत. माय माऊलीच्या काळजाच्या तोलाची फुले असल्याचे वर्णन कवीने केले आहे. कवितेच्या शेवटच्या ओळींमध्ये सासुरवाशीनीने पाखराला, "तुझी



साळुंकी सासरी सुखी असल्याचा निरोप माझ्या आईच्या कानात दे."असे सांगितले आहे. सासरी नांदणाऱ्या लेकीचे कुशल कानी यावे. तिचा सुखाचा झालेला संसार डोळ्यांनी पहावा हीच प्रत्येक आईची इच्छा असते. आपल्या सासरी नांदताना आई मनोमन माझी साळुंकी (लेक) कशी असेल? असाच विचार करत असते. त्यामुळे लेक सुध्दा मी सासरी सुखाने नांदते आहे हे आईला सांग असा निरोप पाखराला देते. कारण तिला माहीत असते कुशल ऐकताच आईचा जीव आनंदाने फुलून येईल. तिला खूप समाधान लाभेल.

अशाप्रकारे कविवर्य राजा बढे यांनी यांनी एक पुरुष असून सुद्धा स्त्रीच्या मनातील माहेरा विषयीची ओढ आपल्या कवितेतून शब्दबद्ध केली आहे. सासरी नांदनाऱ्या स्त्रीच्या मनातील माहेरा विषयीच्या हृदयस्पर्शी भावना प्रत्येक संसारीक स्त्रीला आत्मप्रत्ययाची अनुभूती देणाऱ्या आहेत. अशा या महान अष्टपैलू व्यक्तिमत्त्व लाभलेल्या कविवर्य राजा बढे यांनी ७ एप्रिल १९७७ रोजी दिल्ली येथे या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या अनेक अजरामर गीतांनी ते सर्व रसिकांच्या हृदयात सदैव राहतील.

# बँकांनी 350 दिवसांच्या मुदत ठेवीची योजना आखावी



अशोक राणे, अकोला
संपर्क क्र. 9423658385

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराजांनी साडे तिनशे वर्षा पूर्वी हिंदू समाजातील अठरापगड आणि बारा बलुतेदार समाजाला भगव्या ध्वजा खाली एकत्र आणुन स्वराज्याची बीज सामान्य माणसाच्या मनात पेरली होती प्रतिकूल परिस्थिति मध्ये सामान्य माणसाच्या मनगटाच्या ताकदीवर परकीय इस्लामी सिंहासने उलथा पालथ करुन हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली होती. परकीय अत्याचारी इस्लामी आक्रमणा मुळे हिंदू राजाचा राज्यभिषेकाचा विधी व परंपरा विस्मृत झाली होती.**

शेकडो वर्ष लोप पावलेली किंवा खंडित झालेली हिंदू राज्याभिषेकाची परंपरा शिवरायांनी स्वराज्याभिषेक करुन स्वराज्याभिषेक परंपरा पुर्नजीवित केली सोबतच हिंदू राजा होऊ शकतो हा विचार सुद्धा हिंदू समाजात रुजविला पुढे हिंदवीस्वराज्यचा "स्वराज्य ते साम्राज्य" रक्तरंजित प्रवास व इतिहास देशाला व सामान्य माणसाला प्रेरणादायक ठरला आहे. शिवरायांच्या स्वराज्याभिषेका पासून प्रेरणा घेऊन आसाम,उत्तर भारत,पंजाब ,तमिलनाडु येथील हिंदू समाजाने भगव्या ध्वजा खाली एकत्र येऊन परकीय इस्लामी आक्रमण तलवारीच्या जोरावर रोखली व यशस्वी होऊन इस्लामी सत्तेला उतरती कळा लावली होती सुरु असलेले वर्ष छत्रपती शिवरायांच्या शिवराज्याभिषेकाचे 350 वर्ष असून देशात काही प्रमाणात छोटे मोठे कार्यक्रम सुरु आहेत देशा मध्ये प्रभावी असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवर दर वर्षी श्री शिवराज्याभिषेक दिन अर्थात हिन्दुसाम्राज्य दिन उत्सव साजरा होत असतो पण या वर्षी 350 वर्षाचे औचित्य साधून हिन्दुसाम्राज्यदिन मोठ्या प्रमाणात साजरा करुन शिवरायांचा राष्ट्रीय विचार देशातील तरुण पीढी समोर विविध कार्यक्रमा द्वारा मांडण्यात आलेला आहे शिवरायांची भुमि असलेल्या महाराष्ट्रात राज्य सरकारने जेष्ठ कृ. त्रयोदशीला 2023 रोजी मोठ्या उत्साहाने भव्यदिव्य कार्यक्रमा द्वारा श्री शिवराज्याभिषेक रायगढ़वर साजरा केलेला असून जेष्ठ कृ. त्रयोदशी 2023 ते जेष्ठ कृ. त्रयोदशी 2024 पर्यंत वर्ष भर महाराष्ट्रात काही छोट्या मोठ्या कार्यक्रमाच्या माध्यमा मधुन श्री शिवराज्याभिषेक उत्सव लोकउत्सव व्हावा अशा कार्यक्रमाची योजना सुद्धा आखली आहे त्या लोकउत्सव मधील एक भाग म्हणून शासनाच्या शासकीय पत्रव्यवहार लेटरहेड वर श्री शिवराज्याभिषेक 350 (लोगो) मुद्रा मुद्रीत करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन कडून लवकरच प्रतापगढ़ रणसंग्राम मध्ये शिवरायांनी वापरलेली वाघनख इंग्लैंड मधुन भारतात आणले जाणार आहेत. महाराष्ट्रातील गढ किल्ल्याची स्वच्छता, विश्व हिंदू परीषद



कडून शौर्य जागरण यात्राचे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे महाराष्ट्र शासन राज्यात श्री शिव विचार यात्रा प्रयोजन करणार आहे. समाजाने सुद्धा श्री शिवराज्याभिषेक उत्सव 350 निमित्ताने गांवागांवा मध्ये शिवकालीन इतिहासातील दिन विशेष शिवप्रताप दिन( प्रतापगढ़ रणसंग्राम) शिवतेज दिन (लाल महाल मध्ये शाहिस्ताखानाची फजीती) शिव चातुर्य दिन (बादशाहच्या हातावर तुरी देऊन आग्र्याची सुटका) साजरे करुन श्री शिवराज्याभिषेक उत्सव लोक उत्सव करण्या साठी प्रयत्न करावा छत्रपती शिवराय यांनी साड़े तीनशे वर्षा पूर्वी परकीय इस्लामी सत्तेला पराभूत करून त्यांचा बिमोड करण्यासाठी व सामाजिक सुरक्षा साठी वापरलेल तंत्र आजही लागू होते तसेच शिवरायांनी वापरलेल्या तंत्रा मध्ये युद्धनिति पासून व्यापार नीति मध्ये अर्थ निति महत्वाची होती त्यामुळे शिवरायांच्या 350 व्या शिवराज्याभिषेक वर्षाचे औचित्य साधून वित्तीय संस्थानी अर्थात बैंक, सोयायटी,पतसंस्था इत्यादीनी आप आपल्या संस्थे मध्ये 350 दिवसाच्या मुदत ठेवी ची योजना आखावी त्यासाठी प्रचलित व्याज दरा पेक्षा एक टक्का अतिरिक्त व्याज दर देण्याची तरदूत करावी तसेच महाराष्ट्र शासना कडून प्रसिद्ध केलेला लोगो मुदत ठेविच्या पावती मुद्रीत करावा आता सणासुदीचा काळ असून आगामी काळात शेतमाल तयार होऊन शेतकारी वर्गाच्या घरी येणार बाजारा मध्ये पैसाची आवक जावक सुद्धा वाढणार आहे त्यामुळेच आगामी सुगीच्या काळात बैंकांनी 350 दिवसाच्या मुदती ठेवि ची योजना केल्यास छत्रपती शिवरायांच्या इतिहासाचे स्मरण होऊन शिवराज्याभिषेक उत्सव लोकउत्सव होईल.

# अर्धसत्य मोहक असल्यामुळे लोक भुलतात



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**असत्य महिती जितकी जास्त आपण जाणत असु तितकेच जास्त आपण अज्ञानी असतो. मुळात सत्य कमी प्रमाणात माहित असलं तरी पुरेसं आहे पण असत्य अथवा अर्धसत्य हे बिलकुल माहित नसलं पाहिजे कारण अर्धसत्य आणि असत्य हे आपलं ज्ञान नाही तर अज्ञान वाढवतात. अक्षरशः असत्याला लोक प्रचंड मोठ्या प्रमाणात भुलतात फसतात अपटातात पुन्हा उभा राहतात पुन्हा असत्यावर विश्वास ठेवून फसतात ही नित्य प्रकिया झाली असल्याने सत्य हे दुर्लभ झाले आहे.**

म्हणून लोकांना सत्यापेक्षा असत्य जास्त अंगवळणी पडायला लागलं आहे. असत्य हे दिसण्यासाठी मोहक असलं तरी देखील अंतिमतः ते निरपयोगी ठरत .सत्य पेरण हे सर्व उत्कृष्ट कार्य आहे.पण सध्या रातोरात प्रसिद्धीच्या झोतात येण्यासाठी व कामी वेळात नावलौकिक होईल प्रसिद्ध मिळेल हया भोळ्या अशेतुन जास्तीत जास्त प्रमाणात अर्ध सत्य पेरल जात आहे आणि याचे दुष्परिणाम आज आपल्याला काही प्रमाणात दिसत असुन येणार्या कालखंडात याचे विदारक आणि गंभीर परिणाम नक्कीच उग्र रूप धारण केल्या शिवाय राहणार नाहीत.महणुन अर्ध सत्य हे नेहमी घातक अहितकारक असल्याने अर्ध सत्य पेरण हे कमी झालं पाहिजे. पुर्ण सत्य हे लाभकारी असतं. पण ते पचण्यासाठी जड कठिण जात आणि अर्धसत्य तात्काळ प्रसिद्धी देत प्रभाव दाखवत.हे जरी वास्तव असल तरी सुद्धा अर्धसत्य हे आपल्या स्वतःसाठी व भविष्यातील पिढी साठी योग्य चांगले परिणाम निर्माण करणार नसतं. म्हणून विचारांची पेरणी करणा-यांनी स्वतः च्या प्रसिद्धी साठी अर्धसत्य पेरणी करून नये. संपुर्ण सखोल महित असेल तर त्यावर भाष्य कराव नाही. तर मौन सर्वतम असतं.पण शक्यतो असं होतं नाही अर्ध्या ज्ञानावरून मत भूमिका व्यक्त करून संवग प्रसिद्ध हाच एकमेव अजेंडा असेल तर समाजाला योग्य दिशा मिळणार नाही. कारण योग्य दिशा हि पुर्ण सत्या मध्ये असते.आणि पुर्ण सत्य हे मांडण्यासाठी निस्वार्थ भावना अपेक्षित असते. महर्षी तुलसीदास यांनी रामायण हे महाकाव्य लिहिले महाबली हनुमान यांच्या विषयी महती विशाद करणारी हनुमान चालीसा लिहली एवढं महान लेखन किंवा विचार आज कोणीही निर्माण करू शकत नाही.हे वास्तव आहे. तरी सुद्धा रामायणातील सुरवातीच्या किमान सतर ओव्या ह्या मी किती अल्प ज्ञानी आहे.हेच दाखविण्यासाठी महर्षी तुलसीदास यांनी लिहल्या आहेत हे विशेष आहे. त्याच बरोबर त्या मध्ये त्यांनी असं म्हटलंय मी अल्प ज्ञानी असुन आपल्या समोर तोकडं ज्ञान ठेवण्याचं धाडस करतोय कृपया मला समजुन घ्या अशी विनंती ते शेवटी करतात. ही किती मोठी महानता उदारता आहे जी महर्षी तुलसीदास यांनी स्वतः विषयी व्यक्त केली आणि आपण आपल्याला दोन तीन ओळी समजल्या कि आपण स्वतः महाज्ञानी समजतो ज्ञान सम्राट समाजभूषण, रातोरात अजुन कोणतं कोणतं भुषण म्हणजे भुषण आणि सम्राट यांचं सध्या खूप मोठ्या प्रमाणात पिक येऊन साम्राज्य निर्माण होत आहे.पण वास्तविक पाहिलं तर सगळे अर्धसत्य सम्राट म्हटलं तरी चालेल अशी काहीशी परिस्थिती सध्या तरी चालेलेली आहे. त्या मध्ये अणाखी भर म्हणजे आपल्या पेक्षा दुसर कोणीच हुशार नाही. ही मानसिकता तर चरणसिमेवर आहे. आपल्याला इतका ज्ञान महित आहे त्याच बरोबर आपल्या एवढा गाढा अभ्यास इतर कोणाकडही नाही असं समजत आपण वावरत असतो. नेमकं याच दरम्यान कळत न कळत आपल्या कडुन अनेक संदर्भात अर्ध सत्य प्रसारीत होत हे अगदी वास्तव आहे. त्याचे दुष्परिणाम हे अनेकांवर होतात. समाज ही प्रयोगशाळा नसते. की आपण आपले अनेक मत त्यांच्यावर थोपवले पाहिजेत समाजावर मत थोपवणारे आपण कोण असतो. आपलं अस्तित्व काय आपलं ज्ञान किती आपला अनुभव किती, समज किती, भविष्यातील वास्तव आणि विद्यमान स्थिती यातील तफावत याची उमज किती हे समजण खुप गरजेचं आहे. त्याचबरोबर काळाची नजर ओळखून अगोदर स्वतःमध्ये परिवर्तन केले पाहिजे स्वतः मध्ये परिवर्तन झालं की लोक नक्कीच योग्य वाटल तर ते आपोआप स्वीकारतील आणि नाही वाटलं तर नाकारतील म्हणून कोणत्याही विषयावर विचारांची पेरणी करताना अर्धसत्य पेरणी होऊ नये. याची दक्षता खबरदारी ही घेतली गेलीच पाहिजे आणि समाजातील प्रत्येक घटकांनी जागरूक होण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून अर्धसत्य बाबी, महिती प्रसारीत होऊन आपलंच नुकसान होणार नाही याची काळजी सगळ्यांनी मिळून घेण्याची आवश्यकता आहे. खोटं अर्धसत्य हे खुप काळ प्रभावी राहत नाही. त्याची चमक काही क्षणात कमी कमी होत जाते आणि शेवटी अर्ध सत्य निष्प्रभ होते. परंतु अर्धसत्याच्या नादी लागून आपला रस्ता मार्ग चुकला तर मग आपल्याला पुन्हा रस्त्यावर योग्य मार्गावर येण कठिण जात. म्हणून आपण स्वतः दक्ष सावध राहिले पाहिजे आणि अर्ध सत्य प्रसरण थांबवलं पाहिजे. अर्धसत्य निर्मिती केंद्राकडे पण आपण दुर्लक्ष केले पाहिजे. सनसनाटीकडे आपण दुर्लक्ष केले तर नक्कीच बदल जाणवेल आणि सनसनाटी युगाच आपोआप प्रमाण कमी होईल व सत्य स्वीकारणं क्रमप्राप्त ठरेल. म्हणून सगळ काही हे आपल्या सगळ्यांच्या भूमिकेवर अंवलबुन आहे. आपण जागरूक दक्ष सचेत असलं पाहिजे जेणेकरून ज्ञान नसल तर हरकत नाही पण अज्ञानात प्रचंड भर पडणार नाही याची काळजी दक्षता आपण घेतली पाहिजे.

# आज पुन्हा एकदा...



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**दुपारच्या वामकुक्षी नंतर थोडा वेळ मोबाईल हातात घेतला. मोबाईलमधील ठराविक वाचन वगैरे झाल्यानंतर संध्याकाळची तयारी म्हणून उठले. काही कामाची आवरा आवर करता करता, सहज गैलरीत गेले. मावळतीला झुकलेला तो सूर्य आणि दुपारच्या निवांतपणा चा साज आजूबाजूच्या विसावलेल्या वातावरणावर सहज जाणवत होता आणि त्याच निवांतपणात गैलरीतील भिंतीवर पडलेले ते ऊन त्यात खूप काहीतरी समावल्यासारखे वाटले. जे की अगदी खूप जवळचे वाटले.अन् त्या भारावलेल्या क्षणी मनाच्या त्या अत्युच्च शिखरावर जाऊन पोहचले.**

इतर वेळी तर उन्हाचे कौतुक असतेच.पण आज त्यात काहीतरी जाणवत होते का! ऊन सावल्यात रमणारी मी त्यामुळे असेल कदाचित तसे तर उन्हाचे नि माझे नाते म्हणण्यापेक्षा सर्वांचेच असते. पण तरीही असे कितीतरी जुने जुने म्हणण्यापेक्षा अगदी मनापासून मनापर्यंत भिडलेली अशी कित्ती उन्हे आजही मनात घर करून आहेत. त्या उन्हाची आणि सावलीची ती जवळीक कित्येकदा खूप काही देऊन जाते. तसेच काहीसे झाले आज, एखादी स्मरणवाट अवचित पुढे येते. माझ्यासाठी खर तर ऊन सावली आणि त्यांची ती निराळी भाषा कित्येकदा त्यात हरवायला होते. उन्हामुळेच तर लेखणी कडे हात वळला.असो! अशी खूप उन्हे आणि त्याच्या प्रत्येक वेळेच्या अशा असंख्य आठवणी आहेत.त्याही खूप सुंदर तर काही..! त्यामुळे साहजिकच भिंतीवर पडलेले ते ऊन आणि वाऱ्या सोबत हलणाऱ्या त्या कपड्यांची सावली आणि अपार्टमेंट मधील कडेच्या प्रांगणात दूरवर विसावलेल्या सावल्या निवांतपणात खूप काही सांगू पहात होत्या का? एक विलक्षण ओढ जाणवली. कुठल्याशा अनोळखी पणात हरवली. त्याचे ते कौतुक, व्याकुळ मन दूरवरच्या त्या वाटेवर हरवले. का कोण जाणे! पण सहज मनात एक प्रश्न निर्माण झाला. विचारावे का? सहज एक प्रश्न मनात डोकवून गेला. अन् पुन्हा त्या उन्हाकडे नजर वळली. आज ही अनेक व्याकुळणारी उन्हे किती सहज डोळ्यासमोर येतात.कधी आठवणींच्या जीवंत पणात घेऊन जातात. तर कधी लळा लावतात तर कधी मोरपीस फिरवल्यासारखी कुरावळतात. नि मग अवचित एका हळव्या कोपऱ्यात घेऊन जातात.

पण मग पुन्हा एकदा तोच प्रश्न कसे असेल त्या दिवशीचे ऊन, ज्या उन्हाचा तो कोवळा किरण म्हणा किंवा मग त्या किरणच्या प्रकाशाने दिपलेले डोळे आपोआप मिटले असतील. तेव्हाच ऊन कसं असेल. आज ते आठवत नाही. आठवत नाही पेक्षा

त्या दिवशीचा तो सूर्य आज नीटसा नीट सां म्हणण्यापेक्षा कसलाच आठवत नाही. पण त्या सूर्य किरनाच्या प्रकाशाने पहिल्यांदा उघडू पाहणारे डोळे त्या सूर्य किरणच्या प्रकाशानी दिपले त्यावेळी डोक्यावरून धरलेला तो पदर आणि त्याच पदराआडून सगळयात पहिल्यांदा पाहिलेलं नव्हे नव्हे तर अनुभवलेल ते उबीच्या वलयात सामावलेल विश्व म्हणजे जग असेल नाही. बाहेरच्या जगाची पुसटशी ही कल्पना नसलेलं. उद्देश एवढाच की पहिल्यांदा डोळे उघडले आणि त्या पहिल्या उबीचा तो अनुभव माहित नाही कसा होता. आठवत ही नाही. आठवत नाही म्हनण्यापेक्षा चेहऱ्यावर एक प्रश्नचिन्ह उमटले. पण असाच असेल का ? काहीसा! आजही कधीतरी अशा हरवलेल्या निवांत वेळी खूप थकलेल्या एखाद्या संध्याकाळी हुरहूर लावतो. अन् विसावलेल्या वेळेला ओठावर येते अन् वाटत राहते... आज पुन्हा एकदा वाटते कुशीत तुझ्या शिरावे आई. वास्तल्याच्या पदराखाली विसवण्यास जीव कासावीस होई.



# हरिनें कामा घातला चिरा । वित्तवरा मुकविलें ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**शंभर वेळा बडबड करण्यापेक्षा एक छोटीशी कृती श्रेष्ठ ठरते! तुकोबांचे श्रेष्ठत्व त्यांच्या अभंगांपेक्षा त्यांच्या चरित्रात दृगोचर होतांना दिसते. कमी वयात माणसाला कृतियुक्त आलेला शहाणपणा बरंच काही विधायक काम करायला उद्युक्त करतो. तुकोबांना अवघ्या सतरा-अठराव्या वर्षी संसाराने सगळेच देव दाखविले. दुःखाशिवाय आणि दहा-पाच घणाघाती आघात झाल्याशिवाय संसारात माणसाचे डोळे उघडत नाहीत. तुकोबांच्या जीवनात तर नुसते आघातच होते. अनेकवेळा आत्महत्येचे विचार त्यांच्याही मनात रुंजी घालून गेले असतील, परंतु आव्हानेच एवढी होती की; त्यांना जीव द्यायला सुद्धा वेळ मिळाली नाही! युवक असलेले तुकोबा दोन दोन बायका सांभाळत होते.**

त्यातूनच त्यांना दोन बायकांचा जाच काय असतो( ?) हे वेगळे सांगण्याची गरज पडली नाही. पहिली कितीही आजारी असली तरी तिची कुरकुर थांबली असेल काय? नक्कीच दोन्ही बायका घरात गुण्या-गोविंदाने नांदत नसतील यात तिळमात्र शंका नाही कारण "दोन आवा, दोन बुवा आणि दोन जावा" एकत्र आनंदाने राहणे अशक्यच! याला तुकोबांचे घर ते अपवाद असेल काय? एकीकडे संसाराचा असा देव्हारा आणि दुसरीकडे वडिलोपार्जित विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात जाऊन पूजा करणे भागच होते. अशा द्वंद्वात तुकोबा आपली कामे मोठ्या जबादारीने करत होती. याशिवाय बऱ्याच बाबी तुकोबांना अचानकपणे कराव्या लागल्या. यातूनच त्यांना नवीन काहीतरी सुचले असले पाहिजे. हीच अवस्था त्यांना अभंग लिहायला कारणीभूत ठरली असावी. तुकोबा काही एकदमच अभंग लिहिते झाले नाहीत. त्यांनाही संसारातील अनेक संकटांनी घेरले होते. त्यातच त्यांना भजनाचा छंद जडला. घरातील नियमित एकादशी आणि त्या दिवशी होणारे भजन तुकोबांना संसारिक जाचातून थोडीशी उसंत देत असले पाहिजे. त्यांचे दुःख हलके व्हायला लागले आणि त्यांना भजनाचा नादच लागला. हळू हळू ते भजन म्हणतांना आपणही एखादा अभंग देवासंबंधी लिहून पहावा म्हणून लिहायला लागले. त्यातूनच त्यांना अभंग सुचू लागले. हळूहळू भजनाचे रुपांतर

**तुकाराममनीती**
**भाग -70**

शेतातील मंदिरात देवाशी संवाद करायला सुरुवात झाली आणि त्यातूनच तुकोबांच्या कीर्तनाचा उदय झाला! तुकोबा देवाशी संवादी झाले. आपले सुख आणि दुःख देवासोबत वाटू लागले. त्यातूनच वेगवेगळे अभंग आपल्या समोर येतात. संसारातील व्यथांनी उद्विग्न झालेले युवक तुकोबा तासंतास देवाशी संवाद करू लागले. त्या दरम्यान दर्शनाला आलेले लोक तुकोबांचे हे रूप पाहून बाहेर चर्चा करू लागले. तुकोबांना स्वतःचे भान रहायचे नाही. सर्व विसरून तुकोबा देवाच्या समोर नाचत नाचत भजन-कीर्तन करायला लागले. त्यांचे कीर्तन म्हणजे केवळ आणि केवळ देवाशी संवाद असायचा! असा स्वसंवाद सुरु असतांनाच तुकोबा

**आत हरि बाहेर हरि । हरिनें घरीं कोंडिले ॥१॥**
**हरिनें कामा घातला चिरा । वित्तवरा मुकविलें ॥ध्रु.॥**
**हरिने जीवें केली साटी । पाडिली तुटी सकळांसी ॥२॥**
**तुका म्हणे वेगळा नव्हे । हरि भोवे भोंवताला ॥३॥**

(१२५०) असे अनेक अभंग बोलायचे. त्यातील काही लक्षात रहायचे तर अनेक अभंग विसरून जायचे. प्रस्तुत अभंगात तुकोबाराय श्री विठ्ठलासी सरळ संवादी होतांना आपण अंतर्बाह्य केवळ आणि केवळ हरीच झालो आहोत. आत्ममग्न असलेले तुकोबाराय देवाकडे पाहून सर्वस्व विसरून जातात. एवढेच काय ईश्वराच्या सानिध्याने त्यांच्यातील षडविकारसुद्धा मर्यादित झाले आहेत. त्यामुळेच ते 'हरीने कामा घातला चिरा' असे बोलताहेत. एवढेच काय, ईश्वराच्या सानिध्याने ते आपला संसार सुद्धा विसरले आहेत. आता देव आणि तुकोबा एकच झाले आहेत. त्यांना एकमेकांपासून वेगळे करणे शक्यच नाही. असे जीवैक्य, एकरूप झालेले तुकोबाराय लोकव्यवहार विसरून इथे बोलत, नाचत आणि प्रत्यक्ष पांडुरंगासी संवाद साधत आहेत.

तुकोबा लेखणीच्या पलीकडे पोहोचले आहेत. त्यांना आपण काय बोलाताहोत आणि आपण कुठे आहोत( ?) याचा सुद्धा विसर पडला आहे. अशी भावविभोर झालेली तुकोबांची अवस्था आपल्याला म्हणजेच गाथा वाचकांना विचारमग्न करते. एखादा लेखक-कवी जागृती अवस्थेत लिहिणे वेगळे आणि एखादा कवी आपले सर्वस्व विसरून लिहिणे हा दैवदुर्मिळ योग म्हणावा लागेल! तुकोबांच्या वाणीला आलेली धार अनन्यसाधारण आहे. त्यातील तेज आणि ओज हे सर्वांनाच दिपवून टाकते, याचे कारण म्हणजे तुकोबांचे सखोल चिंतन आणि भक्ती! आपल्या शेतातील आपल्या पूर्वजांनी उभे केलेले श्री विठ्ठलाचे मंदिर त्यांना एकमेव आसरा होते. तेथे जाणे आणि वेळ मिळेल तेवढे भजन करणे हा एकमेव कार्यक्रम तुकोबांच्या ठाई होता. एवढ्यावर काही त्यांचे काम थांबले नाही आणि मग तुकोबा गाव सोडून जंगलात जायला लागले. हे करत असतांना त्यांनी आपल्या अगोदरच्या संतांच्या ग्रंथांचे नक्की वाचन केले असावे. याचे कारण म्हणजे सातत्याने त्यांच्या लेखनात संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत सावता महाराज, संत चोखोबा महाराज आणि अन्य वारकरी संतांच्या अभंगांचा वारंवार उल्लेख येतांना दिसतो. यावरून त्यांनी आपल्या घरातील किंवा इतर ठिकाणी जिथे कुठे संतांच्या ग्रंथांचे चिंतन चालले असेल तिथे जाऊन ते श्रवण, त्यावर चिंतन आणि मनन केले असावे. या सगळ्या गोष्टींचा परिणाम असा झाला की; त्यांना श्री विठ्ठल भक्तीची आणखीनच ओढ लागली. त्यांना अन्य काही सुचत नसावे.

एक सामान्य माणूस अशा अवस्थेला पोहोचणे मोठे दुर्मिळ आहे! तुकोबांना परिस्थितीने तसे व्हायला भाग पाडले. त्यांच्या जीवनातील एकेका अनुभवाने ते समृद्ध झाले. श्री विठ्ठलाची भक्ती कशी करावी? याचे एकमेव उदाहरण म्हणजे संत



तुकोबाराय! ईश्वराच्या नामाचा लागलेला छंद इथे आपल्याला लक्षात येतो. "मग गोविंद ते काया" या त्यांच्याच अनुभूतीने आपल्याला त्यांच्या आंत आणि बाहेर केवळ हरीच दिसायला लागतो. श्रीकृष्णाच्या सौंदर्याने भूललेल्या गौळणीसारखी भावविभोर अवस्था तुकोबांची झालेली दिसते. अनेक अभंगातून तुकोबा ती प्रकट करतांना, "हरीने माझे हरिले चित्त" असे लिहून आता मी घरी जाण्याच्या योग्यतेची राहिले नाही असा अत्युच्च प्रेमभाव प्रकट करतांना ते आत्मभान विसरून जातात. ही भक्तीची उच्चावस्था पाहून अभंग वाचन करणाराला सुद्धा कधी कधी दिशाभूल झाल्यासारखे होते! नेमकी ही अवस्था तुकोबांची झालेली असतांना तुकोबा अनेक अभंग किंवा गवळणी म्हणत असले पाहिजे, परंतु त्यावेळी कुणीच जवळ नसल्यामुळे तो अनमोल खजाना कागदावर शिल्लक राहू शकला नाही. मराठी वाङ्मयाची ही फार मोठी हानी झाली असे म्हटल्यास वावगे ठरू नये!

तुकोबांचे अभंग वर्तमान परिपेक्षात आपल्या सर्वांनाच कसे पथदर्शी आहेत? या अनुषंगाने आपण सार्वांनीच सर्वकाळ चिंतन-मंथन करायला हवे. बदल हा काळाचा नियम आहे. तो कुणासाठीच थांबत नाही. काळ आपल्या उदरात अनेक स्थित्यंतरे साठवत अखंड पुढे चालत असतो. अनेक खाच-खळगे आणि आनंदी क्षणांनी काळ ओतप्रोत असतो. तो कुणाचीही गय करत नाही आणि कुणाची वाट देखील पाहत नाही. अशा बदलत्या काळात आपल्याला तुकोबांचे एकेक अभंग आणि शब्द सांगाती करून घ्यावे लागतील. तुकोबांची भावविभोर भक्ती आणि त्यातून वाहणारे निर्मळ अमृतमय शब्द आपल्यासाठी नित्य नित्य मार्गदर्शक आहेत. प्रस्तुत अभंगातील शब्दांचा अन्वयार्थ लावतांना भक्ती कशी असावी? तिचे परिणाम काय? याचे चिंतन होणे आवश्यक आहे. आपल्या जीवनात अनेक प्रकारचे लोक आणि त्याच्या जोडीने विविध ग्रंथ सुद्धा यावेत. यांच्या संगतीने आपण आपले दैनंदिन जगणे समृद्ध कसे होईल? यासाठी सकारात्मक चिंतन करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी आपल्या सर्वांगीण जीवनावर खोलवर प्रभाव पडण्यासाठी या संतांच्या चिंतनासोबत अखंड रहावे. हल्ली भोवताल बोलणारे आणि माझ्यासारखे लिहिणारे भरपूर लोक सापडतील, परंतु त्यानुसार वर्तन करणारे लाखात एक असतील. त्यासाठी ज्यांनी कृती आणि वर्तनाच्या माध्यमातून लोकप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला अशा माणसांच्या सानिध्यात राहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी तुकोबांच्या जीवनाचा आणि त्यांच्या अभंगांचा सहारा मी घेतला आहे. मी हे चिंतन मांडतांना माझा कुणालाही काहीही आग्रह नाही, परंतु ज्यांनी आपल्या उत्तुंग कार्याने काळावर मोहर लावली अशा महान लोकांच्या शब्दांनी आपण आपले जीवन थोडेफार सिंचित करण्याचा प्रयत्न करूया. त्यासाठी श्री पांडुरंगाची किंवा अन्य धर्मातील कोणत्याही दैवताची आराधना करतांना त्या दैवताला आपल्या दैनंदिन जीवनाशी एकनिष्ठ करण्याचा प्रयत्न झाल्यास नक्कीच माणसामाणसाचे हृदय परिवर्तन होईल! हृदय परिवर्तन झाले की सर्वत्र प्रेम, दया, जिव्हाळा, आपुलकी, शांती, निरहंकार वृत्ती वृद्धिंगत होईल! असे हृदय परिवर्तन म्हणजेच खरी भक्ती होय! तेंव्हा चला, माय-बाप वाचकहो, आपल्या हृदयात अशी अत्युच्च भक्तीचे बीजारोपण करून आपला भोवताल शांत, आनंदी, सुगंधी करूयात! असे झाल्यास माणसामाणसातील दुरावा, भेद संपून जाईल! आणि मग सर्वत्र आनंदच आनंद! जय तुकोबाराय!

# हात स्वच्छ धुण्याचे जीवनात मोठेच महत्त्व!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**माणसाला जगण्यासाठी अन्नाची गरज असते. बहुतांश वेळेला माणूस आपल्या हाताने अन्नाचे सेवन करतो. अशावेळी हात स्वच्छ नसतील तर माणूस स्वतःच अनेक आजारांना निमंत्रण देत असतो. परिसरात, आजूबाजूला अनेक ठिकाणी असंख्य जिवाणू असतात. आपण विविध काम करत असताना ते आपल्याही हाताला नकळत चिटकलेले असतात. अन्न खाण्यापूर्वी आपण हात स्वच्छ धुतले नाही तर हेच जिवाणू आपल्या पोटात जातात. आपण आजारी पडतो. यावरून आपल्या लक्षात येते, की हात धुणे ही मानवी जीवनातील अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. युनिसेफने विविध गरीब आणि विकसनशील देशात यावर काम करण्यास सुरुवात केली. सन २००८ साली स्वीडनमधील स्टॉकहोम येथे पहिला जागतिक जल सप्ताह आयोजित करण्यात आला होता. याच ठिकाणी संयुक्त राष्ट्र महासभेने १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुवा दिन साजरा करण्याचे ठरवले. x**

युनिसेफने विविध गरीब आणि विकसनशील देशात यावर काम करण्यास सुरुवात केली. सन २००८ साली स्वीडनमधील स्टॉकहोम येथे पहिला जागतिक जल सप्ताह आयोजित करण्यात आला होता. याच ठिकाणी संयुक्त राष्ट्र महासभेने १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुवा दिन साजरा करण्याचे ठरवले. सन २००८ साली साजऱ्या झालेल्या या पहिल्या जागतिक हात धुवा दिनामध्ये जगभरातील ७० पेक्षा जास्त देश सहभागी झाले होते.

सुमारे दोनशे दशलक्ष लोकांनी या दिवशी साबणाने हात धुतले. कोरोनाची साथ पसरत असताना याला प्रतिबंध घालण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना आणि सरकारी आरोग्य विभागाकडून मुख्य उपाय सांगितला जात आहे. तो म्हणजे वारंवार हात धुवा, तेही शास्त्रशुद्ध पद्धतीने. हात धुण्याबाबत काही महत्वाच्या गोष्टी जागतिक सर्वेक्षणातून लक्षात आल्या आहेत. रिस्क ॲनॅलिसिस या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नियत कालिकाच्या दि.२३ डिसेंबर २०१९च्या अंकात त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यानुसार ३० टक्के व्यक्ती शौचास जाऊन आल्यावर अजिबात हात धुत नाहीत. ज्या ७० टक्के व्यक्ती हात धुतात, त्यातले निम्मे लोक केवळ पाण्याने हात ओले करतात आणि पुसतात. केवळ २ टक्के व्यक्तीच शास्त्रशुध्द पद्धतीने हात धुतात. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ जगभरात हात कसे धुवावेत, याचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देण्यावर भर देत आहेत. या बाबतच्या जनजागृतीसाठी दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुवा दिवस साजरा केला जातो. सुरुवातीला केवळ विद्यार्थ्यांपर्यंत मर्यादित असणाऱ्या या विषयाला कोविड-१९ मुळे एवढे महत्व आले, कि आता जीव वाचवण्यासाठी हात धुवा, असे म्हणण्याची वेळ जागतिक आरोग्य संघटनेवर आली आहे. या माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करणाऱ्यांची तक्रार करावी. अंगणवाडी व शाळेतील लहान मुलांमध्ये हात धुण्याचे संस्कार रुजविण्यासाठी गावातील अंगणवाडीताई व आशा वर्कर यांनी गीताच्या माध्यमातून मुलांमध्ये हात धुण्याच्या प्रक्रियेत एक गोडी निर्माण केली पाहिजे. सकाळी प्रार्थनेच्या वेळी लहान मुले हे गीत गाऊन स्टेप बाय स्टेप सामुहिक हात धुण्याचा उपक्रम घेतील. तेव्हा घराघरात हात धुण्याचा संदेश पोहोचवावा. हात धुण्याची महत्वाची कृती ही कायम व्यवस्थित व्हावी. हात कधी धुवावे? स्वयंपाकापूर्वी, जेवण्यापूर्वी व जेवल्यावरसुद्धा, कोणत्याही आजारी व्यक्तीला भेटण्यापूर्वी, त्यांना स्पर्श करण्यापूर्वी व नंतरही, कुठल्याही जखमेला हात लावण्यापूर्वी आणि नंतरही, शौचाला व लघुशंकेला जाऊन आल्यानंतर, लहान बाळाची शी धुतल्यानंतर, बाळाचे डायपर, लंगोट बदलल्यानंतर, नाक शिंकरल्यावर, शिंक आल्यानंतर, प्राण्यांना खाऊ घातल्यावर, त्यांची विष्ठा साफ केल्यावर, प्राण्यांना कुरवाळल्यावर किंवा हाताळल्यानंतर. घर झाडून-पुसून घेतल्यावर, कचरा टाकल्यानंतर किमान चाळीस सेकंद हात साबणाने स्वच्छ धुवावे. हातांची नियमित स्वच्छता राखल्यास कोरोना किंवा इतर संसर्गजन्य रोग पसरणारच नाहीत का? अशी शंका अनेकांच्या मनात असेल. खरेतर कुठल्याही रोगाचा १०० टक्के प्रतिबंध शक्य नाही. परंतु काही मूलभूत स्वच्छता पाळल्यास रोगाचा प्रसार नक्की रोखला जातो. म्हणूनच सामाजिक व वैयक्तिक आरोग्याच्या दृष्टीकोणातून हातांची स्वच्छता हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. व्यवस्थित हात धुण्याची सवय ही खरे तर कायमस्वरूपीच हवी. परंतु तसे होत नसल्याने दरवर्षी १५ ऑक्टोबर हा जागतिक हात धुवा दिवस म्हणून पाळला जातो. जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ व स्वच्छ भारत अभियान याबाबत मोठ्या प्रमाणात जाणीव जागृती करीत आहेत. हात धुण्याची सवय लोकांच्या अंगवळणी पडावी, हाच हेतू आहे.

हात धुण्याचा महत्वाचा शोध व इतिहास असा- इ.स.१८४०मध्ये डॉ.ईगनाज, सेमेलवाईस यांनी हात धुण्याचा महत्वाचा शोध लावला. युरोपमध्ये एका शैक्षणीक इस्पितळात ते डॉक्टर होते. दवाखाण्यात बाळांतपणासाठी येणाऱ्या महिलांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असे. एका प्रयोगामध्ये त्यांनी सर्व वैद्यकीय विद्यार्थ्यांना व इतर डॉक्टरांना गरोदरमातेस हात लावण्यापूर्वी स्वच्छ हात धुण्यास सांगितले. केवळ या हात धुण्यामुळे प्रसूती विभागातील मृत्यू जवळजवळ ५० टक्क्यांनी कमी झाले. अशा रितीने हात धुण्याचा महत्वाचा शोध लागला. जे लोक नियमित हात स्वच्छ ठेवतात, त्यांचे आरोग्य नेहमीच चांगले राहते. शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या मोठी असल्यामुळे त्यांच्यामार्फत घराघरात हात धुण्याचा व स्वच्छतेतेच्या संदेश देण्यात येत आहे. स्वच्छतेतेच्या सवयी शाळेतून लागाव्यात यासाठी मुलां-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय करण्यात आली आहे. ते स्वच्छ व वापरात राहण्यासाठी शाळेसह गावकऱ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. हात धुण्यासाठी शाळा व गावपातळीवर मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात यावी. पुष्कळ लोकांना हात कसे धुवावे हे माहितीच नाही. हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे पाच टप्पे- १) सुरुवातीला पाण्याने हात ओले करावे व त्यानंतर हाताला साबण लावावी. २) हाताचे तळवे एकमेकांवर घासावे. ३) बोटे एकमेकांत अडकवून ती एकमेकांवर घासावी. ४) उजव्या हाताच्या बोटांची टोके डाव्या हाताच्या तळव्यावर गोल फिरवून घासावी आणि त्यानंतर तीच क्रिया दुसऱ्या हाताने करावी म्हणजे नखे स्वच्छ होतील. ५) पाणी वापरून हात खळवळून घ्यावेत. या पाच टप्प्याद्वारे हाताची स्वच्छता करणे गरजेचे आहे. याचे प्रात्यक्षिक प्रत्येक शाळेतून दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी करण्यात आले पाहिजेत. जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायती, शाळा, महाविद्यालय, अंगणवाड्या यांमधून कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले पाहिजेत. हात धुण्याच्या प्रात्यक्षीकातून लोकांना हात धुण्याची सवय लागेल. शालेय विद्यार्थ्यांमार्फत घरातील सर्व सदस्यापर्यंत हा संदेश जाणार आहे. या संदेशाचा सर्वस्तरातून वापर झाला तर सर्वांचे हात स्वच्छ राहतील. परिणामी रोगराईस आळा बसेल, यात शंकाच नाही!





डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# भारतात उपासमारीची स्थिती पाकपेक्षाही चिंताजनक!

आधुनिक केसरी

**देशात एकीकडे एकीकडे गरिबी कमी होत असल्याचा दावा केला जात असतानाच दुसरीकडे उपास मारीची समस्या समोर आल्याने गरिबी दूर होत असल्याचा सरकारच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह लागला आहे. भूक आणि गरिबी याचा अन्योन्य संबंध आहे.. गरिबी कमी झाल्याचा दावा केला जात असताना भारतात उपासमारीची स्थिती पाकिस्तानपेक्षाही कमीअसल्याची चिंताजनक आकडेवारी समोर आली आहे. नुकताच भूक निर्देशांक अहवाल २०२३ जाहीर झाला असून, १२५ देशांच्या यादीत भारताची १०७वरून १११व्या स्थानी घसरण झाली आहे.**

एखाद्या देशातील अन्नधान्याची उपलब्धता, पोषण-कुपोषण स्थिती आदी निकषांच्या आधारे नोंदवली जाणारा सन २०२३साठीचा जागतिक भूक निर्देशांक अहवाल जाहीर झाला असून, १२५ देशांच्या यादीत भारताची १०७वरून १११व्या स्थानी घसरण झाली आहे. केंद्र सरकारने हा निर्देशांक फेटाळत, त्याच्या मापनातच चुका, त्रुटी आहेत, अशी बाजू मांडली आहे. प्रत्येक देशातील कुपोषितांचे प्रमाण, पाच वर्षांवरील मुलांमधील कमी वजनाच्या मुलांचे प्रमाण, पाच वर्षांखालील मुलांमधील मृत्यूचे प्रमाण असे काही निकष भूक निर्देशांक मोजताना वापरले जातात. मुलांची उंची व वजन यांच्या गुणोत्तरावर आधारित असलेल्या मापदंडात भारताची कामगिरी सर्वांत खराब ठरली आहे. भारतातील १८.७ टक्के मुले ही कृश आहेत, असे या अहवालात म्हटले आहे. हे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. भारतातील कुपोषित मुलांचे प्रमाण १६.६ टक्के असून, पाच वर्षांखालील मुलांमधील मृत्यूचे प्रमाण ३.१ टक्के आहे, अशी आकडेवारी या अहवालात मांडण्यात आली आहे. विशेष म्हणजे रक्तातील तांबड्या पेशींच्या कमतरतेमुळे उद्‌भवणाऱ्या पांडुरोगाचा सामना करणाऱ्या भारतीय महिलांचे प्रमाणही या अहवालात देण्यात आले आहे. भारतातील १५ ते २४ वर्षे वयोगटातील ५८.१ टक्के महिला पांडुरोगाचा सामना करीत असल्याचे त्यात म्हटले आहे. भारता शेजारी शेजारी देशांच्या खाली आला आहे. पाकिस्तान १०२, बांगलादेश ८१, नेपाळ ६९, श्रीलंका ६० अशा शेजारी देशांची या सूचीतील क्रमवारी आहे. हे सारेच देश यादीत भारताच्या वर आहेत. केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाने या अहवालातील निष्कर्ष ठामपणे फेटाळले आहेत. संबंधित निष्कर्ष काढणारे मापनच चुकीचे, त्रुटीपूर्ण आहे. यातील निकषांवरून थेट देशाचा भूक निर्देशांक मोजणे चुकीचे आहे. असल्या अहवालामागील हेतूच संशयास्पद आहे, असे मंत्रालय म्हंटले आहे. केंद्र सरकारने हा अहवाल फेटाळला असला तरी भारतात गरिबी व भुकेची व निवासाची समस्या अतिशय तीव्र आहे.साधारणतः सन २०३० पर्यंत जगातील दारिद्र्य जवळजवळ संपुष्टात येईल असा जगभरातील तज्ज्ञांकडून अंदाज व्यक्त केला जात आहे; परंतु दुसरीकडे भयावह गरिबीमुळे कुटुंबाची पुरती वाताहत झालेल्या



एकामागून एक येणाऱ्या हृदय पिळवटून टाकणाऱ्या बातम्या दारिद्र्याची भयावहता दर्शविणाऱ्या आहेत. विशेष म्हणजे २०२२ मध्ये जागतिक असमानता अहवाल प्रसिध्द झाला होता त्या अहवालानुसार भारत हा जगातील सर्वात गरीब आणि असमानता असलेल्या देशांच्या यादीत सामील झाल्याचे नमूद करण्यात आले होते. जागतिक असमानता अहवाल २०२२ नुसार, भारतातील अव्वल १० टक्के लोकसंख्येकडे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५७ टक्के वाटा आहे, तर लोकसंख्येच्या खालच्या स्तरातील (५० टक्के) लोकसंख्येचा वाटा फक्त १३ टक्के आहे. टीचभर पोटाचा खड्डा भरण्यासाठी कोणाला पोटच्या गोळ्यांना विकावा लागते तर कोणाला वेटबिगारीत उभे आयुष्य काढावे लागते. हा दैवदुर्विलासच म्हणावा लागेल. अशा घटनांनी गरिबीने माणसांना कुठे नेऊन ठेवले आहे हे पुन्हा अधोरेखित होत आहे. केवळ घोषणा ,आकडेवारी. समोर करून गरिबी संपणार नाही तर त्यासाठी जबर राजकीय इच्छाशक्ती आणि प्रामाणिक कृतीची गरज आहे. गरिबी हटणार आहे हे सर्वांनाच ठाऊक आहे. पण कधी ? आणि कशी ? याचे उत्तर कोण देणार ? स्वातंत्र्यापासून आजपर्यंत गरीबी हटावचा जयघोष सुरू आहे; परंतु दुर्दैवाने स्वातंत्र्याच्या साडेसात दशकानंतर देखील ही गरिबी हटली नाही. त्यामुळे गरिबी हटणार पण कशी हा प्रश्न मात्र कायम अनुत्तरितच राहिलेला आहे.

भूक निर्देशांक अहवाल नाकारून वस्तुस्थितीची तीव्रता कमी होणार नाही. कुपोषण, बालमृत्यू यासारख्या समस्यांकडे मानवतेच्या भूमिकेतून गांभीर्याने पाहावे. त्यावर मात करण्यासाठी आर्थिक तरतूद करून त्याचा काटेकोर विनियोग करावा. अन्यथा, साऱ्या देशाला त्याची किंमत मोजावी लागेल.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# वाचन : अनभिज्ञ कलेचा महासागर

आधुनिक केसरी

**वाचन ही अनभिज्ञ कलेचा महासागर आहे हे अब्दुल कलाम यांनी पटवून दिले. देशात अनेक उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व थाटामाटात साजरे केले जातात.परंतु आजच्या अत्याधुनिक व मोबाईलच्या युगात करोडो लोक दिवसेंदिवस वाचनापासुन दुरावतांना दिसत आहे. त्यामुळे देशाच्या प्रत्येक नागरिकांच्या मनात वाचनाची प्रेरणा जागृत व्हावी या उद्देशाने महान वैज्ञानिक (सायंटिस्ट),भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅन,(पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न) पुरस्कार प्राप्त, देशाचे अनेक उच्च पद भुषविनारे महाज्ञानी व महान विचारवंत आणि सर्वांच्या काळजात घर करून बसणारे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन दिवस साजरा केला जातो.**

ए.पी.जे.अब्दुल कलाम याचा जन्म १५ आक्टोंबर १९३१ ला तामिळनाडू येथे झाला ते भारताचे अकरावे राष्ट्रपती होते. त्यांच संपूर्ण जीवन अभ्यासु वृत्तीचे असल्याने देशाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या हृदयात एक वेगळीच छाप सोडली आहे. त्यामुळे युवावर्गाचे लाडके पुरूष म्हणून सुध्दा ख्याती आहे. ए.पी.जे.अब्दुल कलाम शिक्षणाच्या दृष्टीकोणातुन सर्वांचेच मसीहा (देवता) बनले.त्यामुळे वाचन किती महत्त्वाचे आहे हे अब्दुल कलाम यांच्या व्यक्तिमत्त्वावरून दिसून येते. वाचन दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या संपूर्ण पुस्तकांचे वाचन केलेच पाहिजे.यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल व वाचकांमध्ये खरी सकारात्मकता,जागृगता व उत्साहाचे वातावरण दिसून येईल आणि नवीन ऊर्जा निर्माण होवून सर्वांना चांगला मार्ग मिळेल. आजची युवा पिढी ज्या जलद गतीने मोबाईलचा वापर करीत आहेत त्याच गतीने वाचन व्हायला हवे.वाचनामुळे बरंच काही अवगत करता येते हे आपल्या पुर्वजांनी दाखवून दिले आहे. वाचनामधुन मिळालेले ज्ञान आजच्या युवकांना अवश्य शिखरावर पोहचवेल यात तिळमात्र शंका नाही.आपण आज ज्याप्रमाणे मोबाईला घट्ट धरून बसतो तेही घातकच आहे.मोबाईल खेळावा, मोबाईलवर काम करावे.परंतु वाजवीपेक्षा जास्त मोबाईलचा वापर केला तर ते अवश्य नुकसानदायक आणि घातक ठरेल यातही शंका नाही. परंतु वाचनाच्या बाबतीत तसे नाही आपण वाचनाला जितका जास्त वेळ द्याल त्यांच्या दुप्पट ज्ञानामध्ये भर पडेल आणि वाचनातील ज्ञान हे अनंत काळापर्यंत आपल्या हृदयात राहील.त्यामुळे आपण जे काही वाचन केले आहे ते ज्ञान समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण सहज मदत करू शकतो. आज मोबाईल फोनचा विचार केला तर त्याची रेकॉर्ड ब्रेक निर्यात झाल्याचे सांगितले जाते.भारताच्या चालू वित्तीय वर्षात ऑगस्ट पर्यंत मोबाईल फोनची निर्यात ५.५ अरब डॉलरच्या जवळपास निर्यात झाली आहे. म्हणजेच ४५७०० करोड रूपयांची निर्यात. याच्या तुलनेत पुस्तकांची निर्यात अल्पशी दिसून येते.म्हणजेच मोबाईलच्या तुलनेत देशातील लोकांचे वाचन दिवसेंदिवस कमी कमी होत असल्याचे स्पष्ट दिसून येते.देशाचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा १५ आक्टोंबर हा जन्म दिवस देशातील शाळा, महाविद्यालयांमध्ये "वाचन प्रेरणा दिन" म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.परंतु वाचनाची प्रेरणा ही फक्त शाळा किंवा महाविद्यालयापुर्ती सिमित नसावी तर संपूर्ण १४० कोटी भारतीयांच्या नसानसात जायला हवी.कारण यामुळे मुलांवर चांगले संस्कार होतील व वाचनाची गती वाढेल व त्यांचे फळ आपल्या कुटुंबीयांना अवश्य मिळेल. वाचन काय आहे हे जर कोणाला जानुण घ्यायचेच असेल तर डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या किमान एका पुस्तकाचे तरी



वाचन करावे. भारतील संस्कृती अनभिज्ञ आहे भारतात सर्वंच धर्मांचे लोक रहातात.त्यामुळे प्रत्येक धर्मानुसार वेगवेगळे सण उत्सव साजरा होतांना आपण पहातो अशा उत्सवाच्या निमित्ताने मित्रांना, बहीणीला, भावाला किंवा अन्य कोणाला आपण भेट वस्तू देतोच अशा परिस्थितीत आपणाला काय भेट वस्तू द्यायची ती अवश्य द्यावी याचा विरोध नाही.परंतु यात एका पुस्तकाची भर अवश्य टाकली पाहिजे.यामुळे वाचनाला सर्वच स्तरातून प्रेरणा मिळेल असे मला वाटते.आपण पहातो देशात प्रत्येक घरामध्ये लहान-मोठ्यांचा वाढदिवस साजरा करण्यात येतो अशा परिस्थितीत भेट वस्तू म्हणून पुस्तक अवश्य भेट द्यायला हवी यामुळे बुध्दीचा विकास अवश्य होईल.कारण डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी वाचन आणि लेखन यातुनच उंच भरारीमारून मोठे शिखर गाठले आहे हे सर्वांनाच ग्यात आहे.आपण त्यांच्या प्रत्येक कार्याचे अणुकरन करने गरजेचे आहे ही त्यांच्या जयंती निमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.देशातील विद्यार्थी व युवा वर्गाने सोशल मीडियाचा अवश्य वापर करावा. परंतु वाचनामध्ये कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याचीही दक्षता घ्यावी व वाचन नियमित ठेवावे. आपण वाचनाचा विचार केला तर देशात ऋषी-मुनी, ज्ञानी, विचारवंत,थोरपुरूष, क्रांतिकारक, वैज्ञानिक, डॉक्टर, शास्त्रज्ञ हे संपूर्ण पुस्तकी वाचनातुनच निर्माण झालेले वृक्ष आहेत.त्यामुळे वाचनाची परंपरा अनंत काळापासून आहे आणि आताही साबुत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी युवा वर्गावर ही जबाबदारी युवा पिढी व विद्यार्थी अवश्य पार पाडेल याची मला खात्री आहे.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन अवश्य व्हायला हवे सोबतच याच दिवशी शाळा,महाविद्यालयांतील शिक्षक-विद्यार्थींनी वृक्ष लागवड करून एक आगळा वेगळा संदेश संपूर्ण भारतात कलाम यांच्या जयंती निमित्त गेला पाहिजे असे मला वाटते.माजी राष्ट्रपती एक.पी. जे.अब्दुल कलाम यांना जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# वाचन प्रेरणा दिन

आधुनिक केसरी

**आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे.**

डॉ. अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.

आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे.

मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन.

# पॅलेस्टाइन-इस्राइल संघर्ष: जग महायुद्धाच्या उंबरठ्यावर



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**जगाची दहशतवादी राष्ट्रे आणि लोकशाही राष्ट्रे अशी विभागणी होत आहे, अशा वेळी लोकशाही राष्ट्रांनी जगाच्या मानवी कल्याणासाठी एकत्र येण्याची हीच वेळ आहे. रशिया आणि युक्रेन मधील युद्ध दोन वर्षापासून धुमसत आहे. अजून त्याच्यावर तोडगा निघालेला नाही. आणि मागील रविवारी हामास या दहशदवादी संघटनेने अचानक इस्त्राईल मध्ये अचानक घुसखोरी करून मध्यरात्री 1100 लोकांना ठार मारले त्या दिवशी ऐहूदी धर्माचा उत्सव असल्याने तरूण वर्ग जल्लोषात होता अशा वेळी काटेरी कुंपनाच्या सिमा तोडून, खंडी सिमा तोडून हे दहशतवादी इझ्राईल मध्ये घुसले. आणि त्यांनी अनेक महिला वृद्ध अपंग यांना पकडून ओलिस ठेवले. अनेक महिलांवर पाशवी अत्याचार करण्यात आले. इस्त्राईल केलेल्या प्रतिहल्यात एक हजार लोक मारले गेले. सतत 4 – 5 दिवस हल्ले आणि प्रतिहल्ले चालू आहेत.**

**प्रखर अस्मीतेची कहानी :** लिग ऑफ लेशन या संघटनेने ब्रिटनला जूनचे स्वतंत्र राष्ट्र स्थापन करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार जगभरातील सर्व ज्यू लोक इस्त्राईल येथे एकत्र आले व 1948 मध्ये स्वतंत्र राष्ट्र स्थापन झाले. हिटलरने जर्मनीमध्ये ज्यू लोकांचा छळ केला होता. शूर व लढवया ज्यू लोकांनी स्वतंत्र लष्कर स्थापन केले. शेती, उद्योग व शिक्षण या क्षेत्रात इस्त्राईलने राष्ट्राचा उत्तम प्रकारे पाया घातला. प्रा. राय ओलतीकर यांनी "इझ्रायल छळाकडून बळाकडे'' हा ग्रंथ लिहून यामध्ये त्यांनी प्रखर देशभक्ती भारावलेल्या युवकांनी हा देश कसा उभा केला त्याची रोमाचंक कथा दिली आहे. मा. पंतप्रधान गोल्डा मायर आणि संरक्षण मंत्री मोशिद आयाण यांच्या काळात इस्त्राईलने चौफेर प्रगती केली. चारी बाजूनी शत्रूंचा वेढा असतांनाही हे राष्ट्र आपले स्वातंत्र टिकवू शकले आता हामास-हिजबुल सारख्या टेरर संघटना इझ्राईलचे अस्तित्त्व नष्ट करत आहेत त्यामुळे इस्त्राईलचे पंतप्रधान बेजांमीन नित्यानेहू आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वंकश लढाईचे रणशिंग फुंकुन सज्ज झाले आहेत. आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्या इझ्रायला भारताने पाठिंबा दिला आहे व पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी आपली ठाम भूमिका मांडली आहे. ब्रिटन, फ्रॉन्स, जर्मनी सह जगातील 84 राष्ट्रांनी इस्त्राईलला पाठिंबा दिला आहे त्यावरून कोणाची बाजू न्यायाची आहे ते स्पष्ट होते.

**गाझा पट्टीतील गलबला :** हमास या दहशदवादी संघटनेने इस्त्राईलवरचे हल्ले सतत चालू ठेवले आहेत. त्याच्या पाठिशी काही दहशवादी संघटना आणि देश आहेत. त्यामुळे हमास सतत डकाळ्या



फोडत आहे. मांजराच्या गळ्यात घंटा कोण बाधणार अशी पश्चिम आशियातील परिस्थीती आहे. जेरूसलेम ही इस्त्राईल आणि पॅलेस्टाईन या दोघांनाही पवित्र भूमी वाटते. त्यामुळे संघर्ष अटळ आहे. जगाच्या राजकारणामध्ये भूराजनैतिक दृष्टिने गाझा पट्टीला महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे या प्रदेशावर आपले वर्चस्व गाजविण्याचा दोनही तटांचा प्रयत्न आहे. अमेरिकेने इस्त्राईलची बाजू घेऊन त्याच्या मदतीला पाठविले आहे. युक्रेन व नाटो देश इझ्राईलच्या बाजूने उभे राहत आहेत. तर रशियाने आपले पत्ते खुले केलेले नाहीत. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पणे दशहतवादी राष्ट्रे आणि लोकशाही राष्ट्रे अशी विभागणी होत आहे. हे विभागजन जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे नेऊ शकते. हा धोका वेळीच ओळखला पाहिजे. संयुक्त राष्ट्र संघाचे महासचिव गुटेरस यांनी हामास इझ्रायल संघर्षाबाबत चिंता व्यक्त करून उभय बाजूंनी युद्ध थांबवावे असा आग्रह धरला आहे. खरे तर सुरक्षा समितीने या बाबत ठाम भूमिका घेऊन युद्ध बंदी जाहिर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दररोज होत असलेल्या चकमकी, हल्ले आणि प्रति हल्ले गरीब लोकांचे निष्पाप बळी जात आहेत. दोनही बाजूने जिवित आणि वित्त हणी मोठ्या प्रमाणावर होत आहे. या युद्धामध्ये होत असलेले नुकसार दोन देशांचे नाही तर मानव जातीचे आहे. खरे तर या युद्धाला धार्मिक रंग देता कामा नये विवादीत भूमिबद्दल अंतरराष्ट्रीय लवाद नेमून हा प्रश्न शांततेने सोडवावा या संदर्भात भारतासारख्या तटस्थ राष्ट्राच्या नेत्याने पुढाकार घेतला पाहिजे. आजचा काळ हा कसोटीचा आहे कठीण संकटाचा आहे. यावेळी शांतता व सयम राखणे महत्वाचे आहे. संयुक्त राष्ट्र संघाने हा तण तणाव वाढू नये म्हणून तेथे शांती सैन्य पाठवावे. आपण घालून दिलेल्या सिमा ओलांडून शेजारी राष्ट्रात घुसण्याची हिमत दहशदवादी कसे करतात हा खरा प्रश्न आहे. नजिकच्या भविष्य काळात इस्त्राईल व पॅलिस स्टाईल यांचे डोक शांत कसे करता येईल हा खरा प्रश्न आहे. दोनही गटा तटाणी अततायी अविवेकी कृती थांबविली पाहिजे आणि शांततेचा टप्पा गाटला पाहिजे, युद्ध बंदी जाहिर केली पाहिजे ओलीतांची सुटका करून एकमेकांचे उट्टे काढण्याची भाषा करता कामा नये. या बाबतीत अमेरिका, रशिया, भारत यांनी पुढाकार घेतला पाहिजे.

**युद्ध नको शांतता हवी :** युद्धामुळे प्रश्न सुटत नाहीत, ते अधिक बिकट होतात. तसेच युद्ध व ताण तणाव यामुळे लोकांचे जिवन उधवस्त होते पर्यावरणाचा विनाश होतो. सामाजिक, आर्थिक प्रगतीला लगाम बसतो हजारो कुटुंबे उधवस्थ होतात, लोक बेघर होतात, महिला व बालकांना दुःखी जिवन जगावे लागते हे सारे थाबावयाचे असेल तर युद्धाला कसा पूर्ण विराम मिळेल आणि सामोपचाराने प्रश्न कसे सुटतील हा खरा प्रश्न आहे. युक्रेन युद्धामुळे महागाईचा कळस झाला, जागतिक पुरवठा साखळी तुटली आता हमास इस्त्राईल संघर्षामुळे जागतिक महागाईमध्ये तेल तापले जाईल. दहशतवादाला जात, धर्म काहीही नसतो त्यांना राजकारण करून स्वार्थाची पोळी भाजावयाची असते. खरे तर या निमित्ताने जगातील सर्व लोकशाही राष्ट्रांनी एकत्र येऊन दहशतवाद आणि मुलतत्त्व वाद या विरोधात एल्गार अभिव्यक्त केला पाहिजे. त्यामुळे जगाच्या इतिहासात ऐऊ घातलेले तिसरे महायुद्ध कसे टाळावयाचे हा खरा प्रश्न आहे.

**समारोप :** या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की, हमास आणि इस्त्राईल यांच्यामध्ये पडलेली थिनगी ही युद्धाचा आग-डोंब पेटवू शकते. हा धोका लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने हस्तक्षेप केला पाहिजे आणि जागतिक शांतेच्या दृष्टीने ठाम व निर्णायक पाऊले टाकली पाहिजेत. पॅलेसस्टाईन मधील दहशतवादी संघटना रोज नवे रूप घेऊन थायदोष करत आहेत. त्यांच्या वाढत्या कारवाया केवळ इझ्राईला नव्हे तर संबंध लोकशाही जगाला धोका निर्माण करणारे आहेत. नव्या जगापुढे लोकशाहीचे रक्षण कसे करायचे हा खरा प्रश्न आहे नाही तर दहशतवादाचा भस्मासुर तिसरे महायुद्ध जवळ आणत आहे असे दुर्दैवाने म्हणावे लागते. जगातील सर्व लोकशाही राष्ट्रांनी मानवतेच्या कल्याणासाठी एकत्र येण्याची हीच वेळ आहे.

# बालपण समृद्ध करणारा कवितासंग्रह - आई मी पुस्तक होईन

आधुनिक केसरी

**बालकविता आणि बालकथांच्या माध्यमातून बालसाहित्यामध्ये आपल्या वेगळी ओळख निर्माण केलेले साहित्यिक डॉ. कैलास दौंड हे मुलांसाठी सतत नाविण्यपूर्ण साहित्य निर्मिती करत आहेत. आतापर्यंत त्यांनी मुलांसाठी 'माझे गाणे आनंदाचे' आणि 'जाणिवांची फुले' अशी दोन पुस्तके लिहिलेली आहेत. नुकताच त्यांचा 'आई, मी पुस्तक होईन' हा बालकविता संग्रह प्रकाशित झाला आहे. कवी डॉ. कैलास दौंड हे ग्रामीण साहित्यिक असल्यामुळे साहजिकच त्यांच्या बालसाहित्यातही ग्रामिण जीवनाचे, अनुभवांचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते.**

हाच धागा पकडून त्यांनी आपल्या कवितांतून समृद्ध अशा ग्रामीण जीवनाशी बालकुमारांची नाळ जोडण्याचाही प्रयत्न केलेला दिसून येतो.

डॉ. दौड यांच्या या कवितासंग्रहाची सुरुवात 'आहे माझे रान'
कवितेने झालेली आहे.

**'डोंगराच्या पुढे आहे माझे रान**
**हिरव्या रंगांत हरपते भान'**

या कवितेच्या ओळी वाचकाला निसर्गाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. कवीचे मन गावात रमणारे आहे. गावाकडे निसर्गाच्या सानिध्यात जगण्याचा एक वेगळा आनंद असतो. तो कवीने आपल्या कवितांतून शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशाच आशयाच्या 'गावकुशी सांजवेळ', 'गावाकडची मुले' इ. कविता या संग्रहात वाचायला मिळतात. बालमनाला सतत नवनवीन जाणून घेण्याची इच्छा असते. हे असेच का? ते तसेच का? असे प्रश्न त्यांच्या मनात सतत निर्माण होत असतात. अशीच 'खरचं सांगा, सांगा मजला' या कवितेत कवीने बालमनातील विविध प्रश्न काव्यस्वरुपात मांडले आहेत. मुलांच्या मनातील प्रश्न मांडताना कवी लिहितात,

'वारा येतो, झोके देतो.
**साजरी फांदी लागते झुलू**
**खरच सांगा, सागा मजला**
**कसे हो फूल लागते फूल?'**

लहानथोरांना सदैव प्रेरणा देणारे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, त्यांच्या आई राजमाता जिजाऊ, संपूर्ण जगाला सत्याग्रहाचे अस्त्र देऊन शांतीचा संदेश देणारे महात्मा गांधी, मुलांचे लाडके चाचा पंडित जवाहरलाल नेहरू, 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दूंगा' अशी घोषणा देत भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या जिवाची बाजी लावणारे नेताजी सुभाषचंद्र बोस, शेण, चिखल, दगड गोटे झेलत स्वतः शिकून मुलींना शिकवणारी आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले या थोर महामानवांची ओळख बालकांना कवीने या कविता संग्रहामधील कवितांतून करून दिलेली आहे. 'भारत माझा देश' या कवितेतून पवित्र भारतमातेविषयी मनामनात स्वाभिमान जागवला जातो. तर निसर्गाच्या सोबतीशिवाय मानवी जीवनाला अर्थ नाही. आपल्या अवतीभवतीचा निसर्ग संवर्धन करण्याचा संस्कार 'वृक्षारोपण' या कवितेतून मिळतो. 'जेव्हा', 'तळ्याचं पाणी', 'तीर्थरूप ढगास', 'समजा', 'पोपट', 'सकाळचे हायकू', 'जंगलातले तळे', 'आवडता ऋतू', 'शांतसे दृश्य', 'रम्य संध्याकाळ' या कविता वाचकाच्या मनात निसर्ग प्रेमाचे अंकुर फुलवतात. या कविता बालमनात निसर्ग प्रेम फुलवून सहजच निसर्गाचा आदर करायला शिकवतात.

'आई, मी पुस्तक होईन' ही कविता संग्रहाची शीर्षक कविता बालमनावर पुस्तकाची उदात्त भावना बिंबवण्याचा प्रयास करते. पुस्तक माणसाला शहाणपण शिकवते. भित्र्याला हिम्मत देते. पुस्तक होऊन निरागसता निर्मळता जगात वाटत जाण्याचा उदात्त विचार मांडताना कवी म्हणतात,

**'आई ,मी पुस्तक होईन**
**लहान मुलांना**



**गाणी देईन**
**अभ्यास ज्यांना आवडत नाही**
**त्यांच्यासाठी मी सोपे होईल.'**

कवी कैलास दौंड यांचा हा कवितासंग्रह विविधतेने नटलेला कवितासंग्रह आहे. या कवितासंग्रहामध्ये कवीने वाचकाला वैविध्यपूर्ण अनुभव देण्याचा केलेला प्रयत्न अत्यंत प्रेरणादायी आहे. आजचा बालक हा केवळ काऊ-चिऊच्या गाणी गोष्टीपुरता विचार करत नाही, तर तो चौफेर विचार करतो, चौरस अनुभव घेतो आहे. अशा एकविसाव्या शतकातील बालमनाला पोषक असे वाचनामृत देण्यात कवी यशस्वी झाले आहेत. 'जगण्यामध्ये आणूया' या कवितेत कवी म्हणतात,

**'वर्गामध्ये गणित शिकतो**
**आकडेमोडही करतो फार**
**जीवनामध्ये वापर करता**
**शिल्लक राहतील पैसे चार !'**

भारतीय संविधानाने दिलेला शिक्षणाचा अधिकार सर्वसामा- न्यांपर्यंत पोचवण्याचे कार्य गावागावांतील जिल्हा परिषदेच्या शाळा करत आहेत. या शाळांतून ज्ञानदानाचे कार्य अविरत सुरू आहे. या शाळेंविषयी 'माझी झेडपीची शाळा' कवितेत लिहिताना कवी लिहितात,

**'विविध त्या स्पर्धा । जयंत्या उत्सव**
**जीवना देतात । सुंदर विचार ।।**
**गावातले सर । होतात काळजी**
**हवे नको तेही। पाहतात गडे ।।'**

शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील आत्मिय नाते या ओळीतून दिसते.

'पक्ष्यांचा लॉलीपॉप' या कवितेत वडाची फळे खायला आलेले पोपट, चिमण्या, कावळे, कोकीळ इ. पक्षी वडाची लालचुटुक पिकलेली फळे खातात. त्याला कवीने लॉलीपॉपची दिलेली उपमा वाचकाला भन्नाट वाटावी अशीच आहे. 'निमंत्रीत कवी' ही कविता बाबुची कवी म्हणून मजेशीर ओळख करून देते तर 'नाव' या कवितेतून कवीने विविध नावांच्या गुणविशेषांची फारच मजेशीर ओळख करून दिली आहे.

**'ढगांसारखा गर्जत होता**
**त्याचे नाव मेघराज**
**हत्तीसारखा डुलत चाले**
**नाव त्याचे गजराज'**

डॉ. कैलास दौंड यांच्या लेखनीतून सिद्ध झालेला हा कवितासंग्रह कल्पनारम्य जगात गुंतवून न ठेवता वास्तवाचे भान देतो. विविधांगी कवितांतून अनुभवांची समृद्धी देतो. प्रसिद्ध कवी दासू वैद्य यांनी या कवितासंग्रहाची पाठराखण केली आहे. सौरव प्रकाशनने या कवितासंग्रहाची अत्यंत दर्जेदार आणि बालसुलभ निर्मिती केली आहे. या सचित्र काव्य संग्रहाचे आकर्षक मुखपृष्ठ आणि अंतर्गत चित्रे रेखाटने बुधभूषण लोंढे यांनी कल्पकतेने केलेले आहे. हा कविता संग्रह बालपण समृद्ध करणारा ठरेल हे नक्की!

**पुस्तकाचे नाव - आई, मी पुस्तक होईन**
**(बालकवितासंग्रह)**
**कवी - डॉ. कैलास दौंड**
**प्रकाशक - सौरव प्रकाशन**
**किंमत - 120 रु.**

गुलाब बिसेन
9404235191

# युवकांनो नेत्यांच्या मागे फिरणे सोडा..

आधुनिक केसरी

आपला भारत देश युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. सर्वात जास्त तरुण वर्ग हा भारतात आहे.आणि हा तरुण वर्ग शैक्षणिक क्षेत्रात कमी व राजकीय क्षेत्रात जास्त झळकत असतो.हे आपण पहात आहोत. आपल्या देशाची वा राष्ट्राची उन्नती ही जर साधायची असेल तर ती तरुणांच्या हातात आहे.आणि हे काम युवापिढीच करु शकते. हे आपण चांगले जाणून आहोत.पण हीच युवा पिढी जर शिक्षण शिकायचे सोडून ,शाळा शिकायची सोडून कोणत्या तरी राजकीय नेत्याचा चेला बनून त्यांच्या मागे पुढे मिरवत असेल तर ही लोकशाही प्रधान देशासाठी धोक्याची घंटा आहे.हे मान्य करावेच लागेल.कोणता तरी नेता निवडनूकीला थांबतो.आणि त्याच्या प्रचारासाठी आमची युवा पिढी घरचं खाऊन व स्वखर्चाने गाडीत तेल भरुन व हातात झेंडे घेऊन गावोगावी फिरत राहतात.त्यांना घरच्या अर्थिक परिस्थितीचे भान नसते. मायबापाचे कष्ट दिसत नाहीत.आईवडील त्यांना शिक्षणासाठी परगावी ठेवतात आणि आमचे युवक शिक्षण शिकायचे सोडून नेतेगिरी करत फिरतात.जिकडे खायला भेटते तिकडे पळतात.पण कोणता पक्ष ना कोणता नेता त्यांना काहीच देत नाही.हे अगोदर आमच्या तरुणांना कळायला हवे. या देशाचा डोलाराच तरुणांच्या हातात आहे.म्हणजे या देशाची खरी ताकतच आजचे युवक आहेत. हे वेळीच ओळखून आमच्या तरुणांनी शिक्षणाची कास धरावी व खूप खूप शिक्षण शिकावे.व आदी आपली परिस्थिती भक्कम करुन घ्यावी.आपण स्वतःच्या पायावर हिंमतीने उभे राहावे.व राजकारणात पदार्पण करावे.उच्चशिक्षित राजकीय वलय असलेला नेता राजकारणात येणे गरजेचे आहे.तोच समाजासाठी देशासाठी काहीतरी करु शकतो.कारण उपाशी पोटी तयार झालेला कार्येकर्ता लाचार बनतो.हे महान विचारवंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.म्हणून युवकांनो आपल्याला कळकळीची नम्र विनंती की नेत्यांच्या मागे मागे फिरणे सोडा....

बुध्दभूषण कांबळे
7498715661

# भाजपला टक्कर देण्यासाठी काँग्रेस सज्ज

## डॉ. अभय पाटील यांचा झंझावाती जनसंवाद दौरा

आधुनिक केसरी

**ख्वाब टुटे है मगर हौसले जिंदा है, हम वो है जहाँ मुश्किले शर्मिंदा है! मंजील कि तलाश है,नजर ने देखा ख्वाब है, शुरुआत करने की देर है, हाथो में जित का ताज हैं..!! या शायरीतील चार ओळीतच सुप्रसिद्ध अस्थीरोग तज्ञ तथा अकोला लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस पक्षाचे प्रबळ उमेदवार डॉ.अभय पाटील यांचा राजकीय जीवनप्रवास आणि त्यात आलेल्या विविध अडचणीवर मात करत क्षितिजापल्याड झेप घेण्याची तांची जिद्द दिसून येते. तद्वतच, त्यांच्या राजकीय प्रवासात मुख्य अडथळा ठरलेला प्रसंगही उपरोक्त शायरीत अगदी चपखल बसतो. कारण गेल्या लोकसभा निवडणुकीत डॉ.अभय पाटील यांची अकोला मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे प्रभावी व प्रबळ उमेदवार म्हणून नाव निश्चित झाले होते.**

त्याअनुषंगाने डॉ.पाटील यांनी देखील दोन महिने अगोदर पासून तत्कालीन शासकीय रुग्णालयातील आपल्या शासकीय पदाचा राजीनामा दिला होता. परंतु दुर्दैवाने तेंव्हाही राज्यात भाजपचेच सरकार सत्तेवर होते. परिणामी डॉ.अभय पाटील यांची लोकप्रियता



वसंत खडसे
9373578429

व वैद्यकीय व्यवसायातून त्यांनी केलेली जनसेवा आणि त्यांचा तगडा असलेला जनसंपर्क पाहून भाजप नेत्यांच्या पायाखालची वाळू सरकू लागली होती. त्यावर अंतिम उपाय म्हणून तत्कालीन भाजप सरकारने राजकीय आकस बुद्धीतून डॉ.पाटील यांचा शासकीय सेवेतील पदाचा राजीनामा जाणीवपूर्वक मंजूर केला नव्हता.परिणामी निवडणूक सहीतेचा भंग नको म्हणून, अखेर डॉ. पाटील यांना आपली उमेदवारी मागे घ्यावी लागली होती. अन्यथा, आज अकोला लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार म्हणून डॉ.अभय पाटील हेच असते हे निर्विवाद सत्य भाजपाला आजही मान्य करावेच लागेल..!

ख्वाब टुटे है, मगर हौसले जिंदा है..! या उद्देशाने काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस डॉ.अभय पाटील यांनी पुन्हा भाजपशी टक्कर देण्यासाठी कंबर कसली असून, त्यानिमित्ताने काँग्रेस पक्षाची विचारधारा आणि आगामी काळातील ध्येयधोरणे समाजातील अखेरच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी झंजावाती जनसंवाद दौरा सुरू केला आहे. अकोला, तेल्हारा, बाळापुर, पातुर आदी तालुक्यातील गाव, खेडे, वाडी, वस्त्या, तांडे अगदी पिंजून काढत त्यांनी सर्वसामान्यातील सामान्य व्यक्ती सोबत प्रत्यक्ष संवाद साधला आहे. काल दि.१३ ऑक्टोबर रोजी त्यांच्या झंजावाती जनसंवाद दौऱ्याचे वाशिम जिल्ह्यात आगमन झाले. यावेळी रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित झनक व काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी डॉ.अभय पाटील यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत केले. रिसोड, मालेगाव तालुक्यातील काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष, विविध पदाधिकारी, युवक काँग्रेसचे आजी-माजी पदाधिकारी, तसेच काँग्रेस पक्षाचे जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, बाजार समितीचे सभापती, उपसभापती, संचालक मंडळ आणि स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून आलेल्या विविध लोकप्रतिनिधींनी उत्स्फूर्तपणे या संवाद दौऱ्यात सहभाग घेतला होता. काल रिसोड तालुक्यातील मोप येथे कुमारेश्वर मंदिराच्या भव्य प्रांगणात डॉ.अभय पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलतांना ते म्हणाले, " काँग्रेस पक्षाला ७० वर्षाचा हिशोब मागणाऱ्यांनी अवघ्या सात वर्षात देशाचे वाटोळे केले आहे..!" असा भाजपवर हल्ला करत बेरोजगारी, महागाई, खाजगीकरण आदी मुद्दे उपस्थित करून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी केंद्रातील व राज्यातील सरकार सपशेल अपयशी ठरल्याचा हल्लाबोल डॉ. पाटील यांनी केला. पुढे बोलतांना डॉक्टर



म्हणाले,या देशातील लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर मनुवादी भाजपाचा सफाया करून, काँग्रेस पक्षाला सत्तेत आणने हाच देशासमोर ऐकमेव पर्याय आहे..! दरम्यान, दैनिक आधुनिक केसरीचे उपस्थित असलेले प्रस्तुत प्रतिनिधी यांनी " रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा " असताना आपण राजकारणाकडे कसे वळलात..? असा प्रश्न उपस्थित केला असता, डॉ.अभय पाटील म्हणाले, " रुग्णसेवा करत असताना रुग्णांशी, मी आपुलकीने संवाद साधत असतो. तेव्हा त्यांच्याशी बोलताना अनेक गोष्टी लक्षात आल्या. रुग्णांना फक्त शारीरिक समस्या नसून, मानसिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध समस्या देखील आहेत. आणि यासर्व समस्या केवळ वैद्यकीय क्षेत्रातून सोडविणे अशक्य आहे. त्यासाठी एक प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ लोकप्रतिनिधी होणे खूप गरजेचे आहे. म्हणूनच, जनकल्याणासाठी व सर्वसामान्यांच्या हितासाठी मी राजकारणात प्रवेश केला असल्याचे डॉ.अभय पाटील यांनी उत्तर दिले. त्यांच्या या झंजावाती जनसंवाद दौऱ्याचे प्रत्येक गावात उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले आहे. उच्चविद्याविभूषित असताना सुद्धा तळागाळातील सर्व सामान्य सोबत निर्गर्विष्ठपणे संवाद साधण्याची त्यांची वृत्ती, वैद्यकीय व्यवसायातून केलेली जनसेवा, आणि त्यातून असंख्य गोरगरिबांचा मिळालेला आशीर्वाद ही डॉ.अभय पाटील यांची सर्वात मोठी ताकद असल्याचे त्यांच्या संवाद दौऱ्याच्या निमित्ताने सर्वांना प्रकर्षाने जाणवत होते. त्यांचे जागोजागी होणारे आदरतिथ्य पाहून संपूर्ण मतदारसंघात काँग्रेसमय वातावरण निर्माण झाले असून, भाजपाशी टक्कर देण्यास काँग्रेस सज्ज झाली असल्याचे स्पष्ट चित्र या निमित्ताने समोर येत आहे.




उद्धव भयवाळ
संपर्क क्र. ८८८८९२५४८८

# पुस्तके हाच माझा खजिना

आधुनिक केसरी

**दर वर्षी माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो. ज्ञानसंपन्न समाजाची घडण, व्यक्तिमत्त्व विकास, साहित्य विकास आणि भाषा विकास यासाठी वाचन संस्कृतीचा विस्तार आवश्यक आहे. या वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने सर्वांना वाचनाची प्रेरणा मिळावी या हेतूने माझ्या पुस्तक प्रेमाविषयी इथे माहिती देणे मी आवश्यक समजतो. मला एक व्यसन आहे. ते म्हणजे पुस्तक विकत घेऊन वाचण्याचे व्यसन. वाचनाचे वेड तर लहानपणापासूनच आहे. लहानपणी मी वाचलेले पहिले पुस्तक म्हणजे चांदोबा. त्या वयात चांदोबामुळेच मला वाचनाची गोडी लागली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.**

बदनापूरला शाळेमध्ये शिकत असतांना त्या शाळेच्या वाचनालयातील एकूणएक पुस्तके मी वाचून काढली होती. नोकरीला लागल्यापासून कुठल्याही दुकानात किंवा पुस्तक प्रदर्शनात एखादे पुस्तक आवडले की तत्काळ ते पुस्तक विकत घेऊन टाकण्याची मला सवयच लागली. जर एखाद्या मित्राकडे किंवा नातेवाईकाकडे एखादे पुस्तक बघितले आणि कदाचित ते दुकानात विकत मिळण्याची शक्यता नाही असे वाटले तर लगेच त्या मित्राकडील पुस्तकाची झेरॉक्स करून ते झेरॉक्स केलेले पुस्तक संग्रही ठेवतो. आजमितीला माझ्या पुस्तकांच्या खजिन्यामध्ये वेगवेगळ्या विषयांवरील जवळजवळ सहा-सातशे पुस्तके आहेत. मुख्य म्हणजे माझ्या खजिन्यात दासबोध, ज्ञानेश्वरी आणि भगवद्‌गीता हे अध्यात्मावरील ग्रंथ आहेत.
साधारणपणे तीस वर्षांपूर्वी मला ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करण्याचा छंद जडला. त्यामुळे ज्योतिषशास्त्रावरील पुस्तकेही मजकडे भरपूर आहेत. स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या नोकरीतील स्वेच्छानिवृत्तीनंतर तर आता माझा ज्योतिषशास्त्राचा अभ्यास जोरात चालू आहे. मी स्वतः जन्मकुंडली तयार करून त्या कुंडलीचे फलित सांगतो. त्यामुळे स्वतःचे भविष्य जाणून घेऊ इच्छिणारे अनेक लोक मजकडे येतात. निवृत्तीनंतर, छंद म्हणून मी खाद्यपदार्थांच्या वेगवेगळ्या रेसिपी शिकलो. त्यामुळे पाककलेवरीलही अनेक पुस्तके विकत घेतली. त्यातील अनेक रेसिपी मी स्वतः करून बघितल्या असून कुटुंबियांना, नातेवाईकांना आणि मित्रांना आग्रहाने मी माझ्या हातचा एखादा पदार्थ तरी करून खाऊ घालतो. माझ्या पुस्तकांच्या खजिन्यात मराठी साहित्यातील नामवंत लेखकांची आणि कवींची पुस्तके तर अग्रक्रमाने आहेत. कारण मागील पन्नास वर्षांपेक्षा जास्त काळापासून मी विविध साहित्यप्रकारांद्वारे साहित्यशारदेची सेवा करीत आहे. त्यामुळे अर्थातच नामवंत लेखक आणि कवी यांच्या साहित्याचे वाचन हे ओघाने आलेच.
शिवाय आरोग्याशी संबंधीतही बरीच पुस्तके मजकडे आहेत. आरोग्यावरची पुस्तके आणण्याचे



कारणही तसेच घडले. साधारणतः सतरा वर्षांपूर्वी मला ह्दयविकाराची समस्या निर्माण झाली. त्यानंतर माझी अंजिओप्लास्टीसुद्धा झाली. त्यामुळे ह्दयविकाराशी संबंधित मराठी तसेच इंग्रजी पुस्तके मी विकत आणली. त्यामध्ये डॉ. अभय बंग यांचे माझा साक्षात्कारी हृदयरोग हे पुस्तक अग्रक्रमाने विकत आणले असून अधून मधून मी पुनःपुन्हा ते वाचीत असतो. उतरत्या वयामध्ये प्रकृती ठणठणीत ठेवायची असेल तर काय खावे आणि काय खाऊ नये हे सांगणारी तसेच व्यायाम आणि योगाविषयीची अनेक पुस्तके मी मुद्दाम आणली आहेत. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषा आणि त्यांचे व्याकरण याचा अभ्यास करण्यात मला विशेष रुची असल्यामुळे भाषाविषयक पुस्तकेही माझ्या कपाटात दिसतील. व्यक्तिमत्व विकास हा माझा आवडता विषय आहे. त्यामुळे व्यक्तिमत्व विकास या विषयावरीलसुद्धा अनेक इंग्रजी आणि मराठी पुस्तके मजकडे आहेत. अशाप्रकारे माझा पुस्तकांचा खजिना मी दिवसेदिवस समृद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे.
दिसामाजी काहीतरी ते लिहावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे या उक्तीप्रमाणे माझी दिनचर्या आजही चालू आहे.

# आधी चंद्रपुरात छत्रपती शिवरायांचा पुतळा उभारा मग भारत-पाक सीमेवर : राजू झोडे

## राजू झोडे यांची पालकमंत्री मुनगंटीवार यांच्यावर टीका

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सर्वात आधी आपल्या चंद्रपूर शहरात छत्रपती



शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारा मग भारत पाकिस्तान सीमेवर शिवरायांचा पुतळा उभारण्याची घोषणा करा अशी टीका उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी सांस्कृतिक कार्य मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यावर केली आहे.
छत्रपती शिवाजी महाराजांची वापरलेली वाघनखं लंडनहून भारतात आणण्याच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून सुधीर मुनगंटीवार चंद्रपुरात पोहोचले यावेळी त्यांनी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली.आम्ही पुणेकर या संस्थेने श्रीनगरातील कुपवारा जिल्ह्यात भारत-पाकिस्तान सिमेजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याचा प्रस्ताव दिला आहे. महाराष्ट्र शासन त्यांना यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार आहे. सिमेवर हा पुतळा उभारण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पाकिस्तानला हा पुतळा पाहुनच धडकी भरेल, सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद केले.
भारत-पाक सीमेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारा पण सर्वात आधी आपले शहर असलेल्या विशेष म्हणजे आपल्या घरासमोर असलेल्या शिवाजी चौकात महाराजांचा पुतळा आधी उभारा अशी मागणी सुद्धा उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी केली आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

## लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



**एचआयव्ही एड्सचा प्रसार कसा होतो?**

आता एच. आय. व्ही. एड्सचा प्रसार कसा होतो ते लक्षात घेऊ. पहिलं आणि महत्त्वाचं कारण म्हणने सेक्स. म्हणजेच यौनसंबंध, दुसरं एच. आय. व्ही. बाधित रक्त चढवल्यामुळे, दूषित नीडल्स आणि तिसरं मुख्य कारण म्हणजे एच. आय. व्ही. बाधित आईकडून बाळाला. एच. आय. व्ही. एड्स होण्याबाबत समाजात अनेक भ्रामक समजूती देखील आहेत. आपण त्याही जाणून घेऊ. एक म्हणजे एच. आय. व्ही. एड्स स्पर्शाने, डास चावल्याने, माशीमुळे, सोबत काम करणे, जेवण, कपडे, टॉयलेटचा वापर यामुळे होत नाही ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. **एच. आय. व्ही. एड्स संदर्भात कायदा काय सांगतो ? :** एच. आय. व्ही. एड्सबाबत कायद्यानुसार आपल्याला एच. आय. व्ही. एड्स आहे हे माहीत असताना, एखाद्या पुरुषाने बाधित नसणाऱ्या स्त्रीसोबत किंवा एखाद्या बाधित स्त्रीने बाधित नसणाऱ्या पुरुषासोबत संबंध ठेवले तर तो गंभीर गुन्हा ठरतो. कायद्यानुसार एका पार्टनरने आपल्या पार्टनरला सांगणे हे बंधनकारक आहे आणि मग त्या दोघांनी सेक्स न करणे किंवा सेफ सेक्स करणे आवश्यक आहे. एस.टी.आय. म्हणजे सेक्स्यूअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन, व्हीडी म्हणजे- व्हेनेरल डिसीजेस आणि एसटीडी म्हणजे सेक्स्युअली ट्रान्समिटेड डिसीजेस - याची प्रमुख कारणे यौन संबंध (व्हजायनल इंटरकोर्स) ॲनल आणि ओरल सेक्स ही सांगता येतात. लक्षण न दिसल्यामुळे या आजारांचा प्रसार होतो, जी लक्षणे दिसतात त्यात योनीतून पू स्राव होणे, लिंगातून स्राव येणे, लिंग, योनी अंगावर किंवा आजूबाजूला जखमा होणे, ओटीपोटात दुखणे यांचा समावेश होतो. स्त्री गरोदर असताना असे आजार झाले तर त्याचा परिणाम निश्चितपणे बाळावर होतो. मूल होण्यासाठी सुद्धा अडथळा निर्माण होऊ शकतो. तीसपेक्षा जास्त प्रकारचे बॅक्टेरिया, व्हायरस व पॅरासाईट यामुळे हे होतं. बॅक्टेरियामुळे होणाऱ्या एच.टी.आय. मध्ये (सेक्स्युअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन) क्लेमायडिया, गनोरिया आणि सीफीलीस यांचा समावेश होतो. तर व्हायरल एस. टी. आय. मध्ये (सेक्स्युअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन) एच.आय.व्ही. एड्स जेनायटल हरपीस आणि जेनायटल वार्ट्स यांचा समावेश होतो. पॅरासायटिक एस. टी. आय. (सेक्स्युअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन) मध्ये ट्रायको मोनियासिसचा समावेश होतो.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248




संसर्ग हा नेहमी सेक्स, दूषित रक्त आणि पेशी, स्तनपान आणि प्रसूती यांच्यामुळे होतो. आता यावर प्रतिबंध घालायचा असेल तर काय करावं ते पाहूया. सर्वप्रथम म्हणजे सेक्स न करणे हा उपाय पण तो केवळ अशक्य आहे आणि निसर्गाच्या विरुद्ध देखील. पण घाबरून जाण्याचं कारण नाही. कारण यावर लसीकरणासारखा उपाय उपलब्ध आहे. उदा. हिपॅटायटीस बी लस, एच.पी.व्ही. लस, जसं मी आता म्हटलं की सेक्स न करणे हा उपाय नाही. पण सेफ सेक्स करणे हा उपाय मात्र नक्कीच आहे. म्हणजेच सेक्स करताना कंडोमचा वापर करणे, सेक्स पार्टनर्स कमी असणे, असे उपाय यावर सांगता येतात. खरं तर बॅक्टेरियल इन्फेक्शन हे बरे करता येणारे असतात. व्हायरल इन्फेक्शन हे उपचारयोग्य असतात. पण सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा असतो की बऱ्याच वेळा याची लक्षणे दिसत नाहीत.

**एच. आय. व्ही. एड्स होण्यासंदर्भातील रिस्क फॅक्टर्स कोणते ?** मागच्या तीस वर्षांमध्ये २५ मिलियनपेक्षा अधिक लोक एच. आय. व्ही. एड्सग्रस्त होऊन मृत्यू पावले आहेत. एच. आय. व्ही. एड्स होण्यासाठी, ड्रग्ज ॲडिक्ट असणे, टॅटू काढणे, निष्काळजीपणे कान, नाक व इतर ठिकाणी टोचणे, मेडिकल प्रॅक्टिस करत असताना सावधानता न बाळगणे तसेच प्रसूती, गरोदरपणा आणि स्तनपान यामध्ये होणारा निष्काळजीपणा या गोष्टी एच. आय. व्ही. एड्स होण्यासाठी रिस्क फॅक्टर्स ठरल्या आहेत.

एच. आय. व्ही. एड्सचा व्हायरस शरीराबाहेर जास्त काळ जगू शकत नाही. रक्त किंवा स्राव वाळतो तेव्हा तो मरतो आणि म्हणूनच तो डास, माशी, खोकला किंवा शिंक यामुळे पसरत नाही.

**एच. आय. व्ही. एड्सवर उपलब्ध उपचार कोणते ?** एच. आय. व्ही. एड्सवर जे उपचार आहेत त्यामध्ये प्रामुख्याने या व्हायरसमुळे बाधीत व्यक्तीची इम्यून सिस्टिम खराब होऊ नये याकरिता आहेत. तसेच त्या उपचारांचा उद्देश हा एच. आय. व्ही. एड्सचा प्रादुर्भाव कमी करणे, डिले करणे हा असतो. यामध्ये मुख्यत्वे ए. आर. व्ही. (अँटी रिट्रो वायरल ड्रग्ज ) वापरतात. हा उपाय एच. आय. व्ही. ची वाढ थांबवतो. पण आजार पूर्ण बरा होत नाही. एच. आय. व्ही. एड्स झालेल्या रुग्णांना अतिशय नियमित आणि वेळेवर औषध घ्यावे लागते. जेणेकरून मेडिसिनला रेझिस्टन्स येणार नाही. त्याचबरोबर अशा रुग्णांना मानसिक आधार, समुपदेशन, उत्तम आरोग्य, आहार, शुद्ध पाणी अशा गोष्टीनी सहकार्य करणे आवश्यक असते. एच. आय. व्ही. एड्स बाधित व्यक्तींना टी.बी., हरपीज, न्युमोनिया असे आजारही होतात. त्यामुळे योग्य असे औषधोपचार घेणे अत्यावश्यक ठरते.

# माझ्याशी निकाह कर नाहीतर मुलीच्या तोंडावर ॲसिड फेकेन

## पहूर पोलिसात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील एका गावात १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी आपल्या परिवारासह वास्तव्याला आहे. गेल्या काही दिवसांपासून हुसेन शहा नाशिर सहा हा तिचा पाठलाग करत आहे. दरम्यान, २८ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर च्या कालावधीपासून हुसेन हा पिडीत मुलीचा पाठलाग करत आहे. एवढेच नाही तर तिचा पाठलाग करून रस्त्यावर थांबवून "माझ्याशी निकाह कर, तु मला बाजारात भेटत जा, तु जर नाही भेटली तर तोंडावर ॲसीड मारेल, तु जर माझी झाली नाही तर तुला दुसऱ्याचीही होवू देणार नाही" अशी धमकी देत तिचा विनयभंग केला. हा प्रकार घडल्यानंतर पिडीत मुलीने नातेवाईकांना सांगितला. त्यानुसार पिडीत मुलीने पोलीस ठाण्यात धाव घेवून तक्रार दिली. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून संशयित आरोपी हुसेन शहा नाशिर शहा याच्या विरोधात पहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल गर्जे करीत आहे.

## डोंबिवलीजवळील खोणी गावात २१ लाखांची वीज चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** गेल्या पाच महिन्यापूर्वी डोंबिवली जवळील खोणी गावात वीज चोरी तपासणीसाठी आलेल्या महावितरणच्या मलंगगड कार्यालयातील विशेष पथकावर ग्रामस्थांनी हल्ला केला होता. या हल्ल्यात महावितरण कर्मचाऱ्यांसह पोलीस गंभीर जखमी झाले होते. महावितरणने या गावातील वीज चोरीचे मुल्यांकन करून १० ग्रामस्थांनी ७७ हजार युनिटसची वीज चोरी करून महावितरणचे २० लाख ८० हजार रूपयांचे नुकसान केले आहे, असा अहवाल तयार केला आहे. वीज चोर ग्रामस्थांविरुध्द गुहा दाखल करण्यात आला आहे.

## कार्यकारी अभियंता म्हणून अविनाश राऊत रुजू

आधुनिक केसरी न्यूज



**सिल्लोड :** वीज कामगार महासंघ सिल्लोड विभागाकडून केला सत्कार सिल्लोड येथील महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता म्हणून अविनाश राऊत रुजू झाले असून त्यांचा सिल्लोड कामगार महासंघाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन नुकताच सत्कार करण्यात आला आहे.

कार्यकारी अभियंता अविनाश राऊत हे पुणे येथून पदोन्नतीवर आले असून एक उत्तम प्रशासक होते म्हणून त्यांचा कार्यकाळ राहिलेला आहे

त्यामुळेच त्यांची सिल्लोड येथे कार्यकारी अभियंता म्हणून बदली करण्यात आली असून त्यांनी नुकताच पदभार घेतला आहे यावेळी वीज कामगार महासंघाचे विभागीय अध्यक्ष अनिल खैरनार,सोयगाव उप विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर घोडके सिल्लोड उपविभागीय उपाध्यक्ष दिनेश कुदळ सिल्लोड उपविभागीय सचिव अविनाश निकम, उपकार्यकारी अभियंता निरज बिदे सोयगाव,सचीन अगलावे सहाय्यक अभियंता,सिल्लोड उपविभागीय2चे अध्यक्ष सुभान तडवी गजानन वाढेकर रईस पठाण , मुरहरी ताठे, अंकुश सहाणे , मुकीद भाई, मुळे, किरण पारीसकर. काकडे इत्यादी पदाधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खुलताबाद राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्षपदी फुलारे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथे खुलताबाद राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्षपदाची निवडणूक पार पडली. यात गजानन फुलारे यांची निवड झाली. वेरूळ येथे गुरुवारी एका आरोग्य शिबिरादरम्यान पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार कैलास पाटील यांनी गजानन फुलारे यांना खुलताबाद शहराध्यक्षपदी निवड झाल्याचे लेखी पत्र दिले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष अनिल चव्हाण, महेश उबाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य अजीम मणियार, प्रकाश मते, विनोद जाधव, मिठू माहलकर, आदिनाथ काळे, संतोष लाटे, टाकळी गावाचे सरपंच पटेल, रावसाहेब फुलारे, नईम पटेल व राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# बहुजन समाज जोडो अभियानाची सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (सचिन खरात गट) वतीने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात हे छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर आले असता त्यांच्या मार्गदर्शनाखाली बहुजन समाज जोडो अभियानाची सुरुवात करण्यात आली.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भडकल येथील पुतळ्यास राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात आणि जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी पुष्पहार अर्पण करून या अभियानाचा प्रारंभ केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार तळागळातील सर्व स्तरांपर्यंत जाती धर्मापर्यंत पोचविण्यासाठी, सर्व जातीधर्मांना बाबासाहेबांच्या विचारांमध्ये म्हणजे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) मध्ये सामावून घेण्यासाठी पक्षाच्या वतीने हे अभियान राबविण्यात येत असल्याचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी सांगितले. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृह किल्लेअर्क येथील वस्तीगृहाला भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांच्या जेवणाच्या व इतर समस्या जाऊन घेतल्या. त्याचप्रमाणे शहरातील अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. हा पक्ष प्रवेश सोहळा शासकीय विश्रामगृह येथे पार पडला. यावेळी जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे महाराष्ट्र सचिव गणेश साळवे, शहर अध्यक्ष आदित्य वाहुळ, मराठवाडा अध्यक्ष मनोज शेजवळ, महिला जिल्हाध्यक्षा कांताताई अहिरे, करण ठोंबरे पुणे शहर अध्यक्ष राजाभाऊ कांबळे, भरत कांबळे, आदि उपस्थित होते.



## सोन्याचे दर ६० हजारांवर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गणेशोत्सवानंतर सोन्याचे दर सातत्याने कमी होऊन ९ ऑक्टोबरला ५७ हजार ७०० रुपये प्रति दहा ग्राम असे खाली गेले होते. परंतु नवरात्र सुरू होणार असतांनाच दर वाढून १४ ऑक्टोबरच्या दुपारी २ वाजता ६० हजार रुपये प्रति दहा ग्राम नोंदवले गेले. नागपुरातील सराफा बाजारात १४ ऑक्टोबरच्या दुपारी २ वाजता प्रती दहा ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचे दर ६० हजार रुपये, २२ कॅरेटचे दर ५७ हजार रुपये, १८ कॅरेटचा दर ४८ हजार रुपये, १४ कॅरेटचा दर ३९ हजार रुपये होते. तर चांदीचे दर प्रति किलो ७२ हजार १०० रुपये होते. हे दर ९ ऑक्टोबरला प्रती दहा ग्राम २४ कॅरेट सोन्याचे दर ५७ हजार ७०० रुपये, २२ कॅरेटचे दर ५४ हजार ८०० रुपये, १८ कॅरेटचा दर ४६ हजार २०० रुपये, १४ कॅरेटचा दर ३७ हजार ५०० रुपये होते.

# बेरळी राशनवरील गोरगरिबांचा घास जातोय काळ्या बाजारात ?

## सामान्य जनतेचा संतापजनक सवाल ? जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** गरीबांना त्यांच्या प्रवाहातून बाहेर काढून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन आपल्या दारी ही योजना शासनाने अमलात आणली असली तरी आजही काही शासनाच्या योजनेचा लाभ गरिबांच्या झोपडीपर्यंत धडकलाच नाही. शासनाकडून वितरित होणारे राशन हे गोरगरिबांच्या घरी मिळत नसल्यामुळे बेरळी ( खुर्द ) येथे सणासुदीच्या तोंडावर सामान्य नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

लोहा शहरा पासून जवळच असलेल्या बेरळी( खुर्द ) हे गाव असुन गेल्या अनेक महिन्यांपासून येथील राशन दुकानदार याची मनमानी चालू असून शासना कडून गरिबांच्या नावावर असलेले राशन वितरीत होत नसल्याच्या या अगोदरही तक्रारी होत्या.परंतु आता या राशन दुकानदाराने मनमानीचा कळस गाठला आहे. बेरळी तेथील लाभार्थी राशन ग्राहक



बाळासाहेब बुद्धे हे येथील स्वस्तधान्य दुकानदार रमेश ढेंबरे यांच्या दुकाणावर राशन घेण्याकरिता गेले असता.त्यांना नेहमी प्रमाणे पाच किलो राशन कमी देण्यात आले.या बद्दल लाभार्थी राशन ग्राहक बाळासाहेब बुद्धे यांनी विचारणा केली असता दुकानदार रमेश ढेंबरे यांनी सांगितले की,मी गावातील प्रत्यक लाभार्थी कुटुंबाला पाच किलो राशन हे कमीच देत असतो. मला शासकीय गोदामातून प्रत्येक कट्ट्यामध्ये पाच ते दहा किलो राशन कमी येते मी तर काय करू ? माझी कुठेही तक्रार करा मला काही फरक पडणार नाही.कारण मी वरप्रर्यंत सर्व म्यानेज केले आहे.अशी बेताल वक्तव्य केले.दमदाटी करून अनेक गरीब जनतेला खुलेआम लुटत असलेल्या या राशन दुकानदाराने गरिबांच्या घासाला लुटण्याचा सपाटा लावला आहे.राशन दुकानावर किती प्रकारचा माल येतो ? याची कुठलीच नोंद वही नाही.ना नाम फलक ना व्यवस्थित तराजू. उघडण्याची वेळ व बंद होण्याची वेळ ही दुकानदारालाच माहीत आहे. मस्तवलेल्या दुकानदाराच्या पाठीमागे एक राशन दलालाचे मोठे रॅकेट असल्याची जोरदार चर्चा आहे.हा विषय बेरळी पुरता मर्यादीत नसून संपूर्ण लोहा तालुक्यात हीच बोंब आहे.या संदर्भात पत्रकार राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब बुद्धे यांनी लोहा तहसीलदार यांच्याशी प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली असता. तहसीलदार यांनी सांगितले की आपण याबाबतची रीतसर तक्रार देण्यात यावी आम्ही योग्य ती कारवाई करू. त्यावरून राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे लोहा तालुका अध्यक्ष बाळासाहेब बुद्धे यांनी दर महिन्याला पाच किलो कमी राशन मिळाल्याची तक्रार जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड, यांच्या कडे निवेदनाद्वारे केली असून या निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी नांदेड, अन्न नागरी अन्नपुरवठा मंत्री महाराष्ट्र शासन, विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद, खासदार नांदेड व लातूर, आमदार लोहा कंधार यांच्याकडे दाखल करण्यात आली असून या तक्रारीवर शासन काय करेल याकडे आता लक्ष लागून आहे.



# ताबा सुटल्याने छोटा हत्ती रोडखाली घसरला

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सिल्लोड - फुलंब्री राष्ट्रीय महामार्गावर वडोद फाट्या जवळ आद्रक काढून शेताकडून - गावी जातांना चालकाला स्टेरिंगवर अचानक फिट आल्याने वाहानावरील ताबा सुटल्याने छोटा हत्ती वाहन रोड खाली गेल्याने दोन जण गंभीर तर एक जण किरकोळ जखमी झाले. छत्रपती संभाजीनगर ते सिल्लोड या राष्ट्रीय महामार्गावर वडोद फाट्या जवळ खामगांव येथील आद्रक व्यापार्याकडे आद्रक काढण्यासाठी ( दरेगाव ) दरी ता फुलंब्री येथील काही पुरुष व महिला मजुर शेतातील काम आटोपून १३ ऑक्टोबर संध्याकाळी ५ वाजेच्या सुमारास एम एच - २० डी टि ०१२७ क्रमांकाचा छोटा हत्ती जित्तो) हे ६ महिला व ५ पुरुष व काही बाळासह परत जात असतांना संतोष भावराव मालोदे यास वाहन चालवत असताना वडोद फाट्या जवळ अचानक चालू वाहन असतानाच वाहनावरील ताबा सुटुन वाहन सरळ रोड खाली २५ फुटापर्यंत खाली उतरून वाल्मीक मोरे, केशवराव सोनवणे, हे जखमी झाले. यात संतोष भावराव मालोदे व वाल्मीक मोरे हे गंभीर जखमी झाले तर केशवराव सोनवणे हे किरकोळ जखमी झाले. जखमींना जगद्गुरू स्वामी नरेंद्रचार्य भक्त मंडळ यांच्या पाल फाटा येथील रुग्ण वाहिकेद्वारे उपचारासाठी फुलंब्री उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून पुढे घाटी रुग्णालयात पाठवण्यात आले. यावेळी वडोद पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी, जागरूक नागरिक यांनी जखमीना मदत केली हा अपघात घडल्यानंतर रूग्ण वाहीका येण्यापूर्वी अनेक वाहनांना जखमीना मदती साठी थांबवण्याचा प्रयत्न केला पण कुणीही प्रतिसाद दिला नाही. हा वाहन चालक तात्पुरता आला होता असे समजते.

# मानवी तस्करी या विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी चंद्रपूर वॉक फॉर फ्रीडम

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर व व्हिजन रेस्क्यू यांचा संयुक्त उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मानवी तस्करी हा संपूर्ण जगामधे अतिशय गंभीर विषय होत चालला आहे. या विषयाकडे सामान्य नागरिकांच लक्ष जावं , त्यांनीही सजग व्हावं या दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर व व्हिजन रेस्क्यू यांचा संयुक्त विद्यमाने वॉक फॉर फ्रीडमचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती समृद्धी एस. भिष्म, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव सुमित जोशी , जिल्हा व सत्र न्यायाधीश प्रशांत काळे, प्रभारी मुख्य न्याय दंडाधिकारी प्रविण कुळकर्णी, चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशन अध्यक्ष ॲड. अभय पाचपोर, व्हिजन रेस्क्यू चे भुषण तोंडरे, वॉक फॉर फ्रिडम चंद्रपूर जिल्हा समन्वयक शाम हेडाऊ आदिंची उपस्थिती होती.

या वॉक फॉर फ्रिडममधे चंद्रपूर शहरातील सर्व महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक वृंद, चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य, ईको प्रो चे बंडू धोतरे, विद्यार्थी संघटना आदिंचा समावेश होता.

यावेळी बोलतांना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती समृद्धी एस. भिष्म यांनी मानवी तस्करी हा अतिशय गंभीर विषय असून याबाबत आपण सगळ्यांनी जागरुक रहायला हवं, सजग रहायला हवं , व आवश्यक तिथे लगेच समोर येत संबंधित विभागाला तक्रार करायला हवी यासाठीच हा वॉक फॉर फ्रिडम आपण घेत आहोत असे मत व्यक्त केले. तर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव सुमित जोशी यांनी प्रास्ताविकातून मानवी तस्करी या गंभीर विषयाची सविस्तर माहीती देत या कार्यक्रमाच्या आयोजनामागची भुमिका विषद केली.

जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती समृद्धी एस. भिष्म यांनी हिरवी झेंडा दाखवून वॉक फॉर फ्रिडम ला स्थानिक गांधी चौक येथून सुरुवात केली. गांधी चौक येथून निघालेला वॉक फॉर फ्रिडम जटपूरा गेट ला वळसा घालून कस्तुरबा रोड मार्गे परत गांधी चौक येथे वॉक फॉर फ्रिडम ची सांगता करण्यात




आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वॉक फॉर फ्रिडम चंद्रपूर जिल्हा समन्वयक शाम हेडाऊ यांनी तर आभार व्हिजन रेस्क्यू चे भुषण तोंडरे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी धनंजय साखरकर, देवानंद साखरकर, शैलेश दिंडवार, चिन्मय भागवत, पियुष बनकर, आदित्य गचकेश्वर, ओंकार सायंकार, तन्मय बनकर, ओंकार बक्षी आदिंनी अथक परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जिंतूर व सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मा.आ.विजयराव भांबळे व त्यांचे शिष्ट मंडळ यांनी आजरोजी जिल्हाधिकारी परभणी यांना त्यांच्या दालनात प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर केले.त्यात जिंतूर व सेलू तालुक्यात चालू वर्षात कमी पाऊस झाल्या मुळे शेतकरी राजा आडचणीत आला आहे. सद्य परिस्थितीत चालू वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे सोयाबीन व कापूस उत्पन्नाचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा या करिता शासनाने सोयाबीनला ८,०००/- रु व कापूस पिकास १०,०००/- रु दराने खरेदी करण्यासाठी आदेश काढावे किंवा शासकीय खरेदीकेंद्र चालू करण्यात यावेत. सन २०२१-२२ च्या ऑगष्ट महिन्यामधील सततच्या पावसाने नुकसान झाल्यामुळे शासनाकडून १३,६००/- रु एवढी प्रति हे. अशी मदत जाहीर करण्यात आली होती. परंतु, जिंतूर-सेलू तालुक्यात अजून हि रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर अदा करण्यात आलेली नाही ती तात्काळ जमा करण्यात यावी.मागील वर्षीचा पिक विमा शेतकऱ्यांना देण्यात आलेला नाही तो तात्काळ मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करण्यात यावा.जिंतूर व सेलू तालुक्यात सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मुग, हळद, फळबाग ई. पिक मोठ्या प्रमाणात घेण्यात येते. चालू वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे शेतकरी आडचणीत आलेला आहे. त्यामुळे जिंतूर- सेलू तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा व तसेच पिक विमा कंपनीला पंचनामे करून रक्कम अदा करण्यासाठी आदेशित करण्यात यावे तसेच शासनाकडून सुद्धा शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी. या निवेदनावर मा.आ.विजयराव भांबळे यांच्यासह रामराव उबाळे, प्रसादराव बुधवंत, बाळासाहेब घुगे, विठ्ठल घोगरे, ॲड. बाळासाहेब रोडगे, मनोज थिटे, माऊली राऊत, पुरुषोत्तम पावडे, चंद्रकांत गाडेकर, विजय खिस्ते, किरणराव दाभाडे, आनंदराव डोईफोडे, दिलीप डोईफोडे, दिलीप आकांत, आनंतराव देशमुख, बालाजी नव्हाट, किशन मानवते, विशाल देशमुख, प्रकाश मुळे, सुधाकर रोकडे, जगदीश शेंद्रे, शंकर जाधव, शिवराम कदम, परवेश सौदागर, शैलेस घुगे, रहेमान शेख, करून नागरे, विशाल देशमुख, शिवराम कदम, ईरफान लाला, सुभाषराव चव्हाण, तुकाराम रोडगे, भागवत बालटकर ई. च्या स्वाक्षऱ्या आहेत.



# नियमित अभ्यासक्रमाबरोबर कौशल्य आधारित शिक्षण गरजेचे

## कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांची विद्यापीठाच्या बल्लारपूर आवाराला भेट आणि संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शिक्षणातून नोकरी सोबतच उद्योजकता वाढीस लागणे हे खरे यश आहे. बदलत्या काळात पारंपारिक शिक्षणासोबतच कौशल्यावर आधारित शिक्षणही गरजेचे आहे. नियमित अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे असल्याचे मत एस.एन. डी.टी.महिला विद्यापीठ मुंबईच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांनी व्यक्त केले. बल्लारपूर येथील विद्यापीठाच्या महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल येथे आयोजित "संवाद" कार्यक्रमात त्या बोलत होत्या. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबईच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांनी नव्यानेच सुरू झालेल्या बल्लारपूर येथील आवाराला नुकतीच भेट दिली. महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुलाचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी कुलगुरू यांचे बल्लारपूर आवारात पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कुलगुरू यांच्या स्वागतासाठी आवारातील विद्यार्थीनींनी चंद्रपूर जिल्ह्याची ओळख सांगणारी वनसंपदा आणि वाघ यांचे चित्र रांगोळीद्वारे साकारले होते. भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या प्रतिमेला वंदन करून 'संवाद' या कार्यक्रमाची सुरुवात झाली. संवाद कार्यक्रमाच्या मंचावर कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव, संचालक डॉ. राजेश इंगोले, सहायक कुलसचिव डॉ. बाळू दत्तात्रय राठोड, समन्वयक वेदानंद अलमस्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश इंगोले यांनी केले. यावेळी त्यांनी बल्लारपूर आवारातील वेगवेगळ्या उपक्रमाची माहिती दिली. कुलगुरू यांनी बल्लारपूर आवारात नव्याने प्रवेशीत झालेल्या विद्यार्थीनींशी 'संवाद' साधून त्यांचे मनोगत जानून घेतले सोबतच विविध विषयांवर चर्चा केली. संवाद कार्यक्रमात बोलताना त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० चे महत्व सांगितले. बल्लारपूर कॅम्पस खऱ्या अर्थाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित वाटचाल करीत असल्याचे मत त्यांनी व्यक्त करीत याठिकाणी क्लासरूम शिक्षणासोबतच फिल्ड वरील शिक्षणाला महत्त्व द्या, विद्यार्थिनींना इंडस्ट्रीज मध्ये नेऊन प्रत्यक्ष शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्या अश्या सूचना त्यांनी येथे दिल्या. यावेळी बीसीएमधील पुनम यादव हिने कुलगुरू यांच्या छायाचित्रांचे रेखांकन करून भेट म्हणून दिले. संवाद कार्यक्रमाचे संचालन प्रा. नेहा गिरडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. खुशबू जोसेफ यांनी मानले.



# पाण्याची टाकी परिसरातील झाडांची कत्तल

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील नगरपालिका कार्यकक्षेत असणाऱ्या व शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वसंतराव नाईक पुतळा परिसरातील पाण्याच्या टाकीजवळील जवळपास चार ते पाच झाडांची कत्तल नगरपालिका कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली आहे. सदरील झाडे तोडण्याच्या ठरावाबाबत पत्रकारांनी नगरपरिषद कार्यालयाच्या कर्मचारी मनीषा कोंडेकर यांच्याशी फोनवरून विचारणा केली असता त्यांनी पत्रकारांसोबत उद्धटपणे बोलून त्याविषयी माहिती देण्याचे टाळले त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाच्या मनमानी कारभाराचा अंदाज येतो. अधिक माहिती अशी की शहरातील पिण्याच्या पाण्याच्या टाकी परिसरात जवळपास बारा ते पंधरा वर्षांपासून असणारी परिपक्व अवस्थेतील झाडे आज दिनांक 13 रोजी नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये रोजंदारीने कर्मचारी लावून तोडण्यात आली आहे. सदरील झाडे तोडण्यासंदर्भात नगरपरिषद कर्मचारी श्रीमती मनीषा कोंडेकर यांना पत्रकारांनी झाडे तोडण्याबाबतचा प्रश्न विचारला असता सदरील झाडे ही नगरपालिका प्रशासनाच्या कार्यालयीन हद्दीतील असून ती तोडण्यासाठी आम्हाला कुणाचीही परवानगी घेण्याची आवश्यकता नाही, असे सांगितले त्यावर तुम्ही पत्रकार मला फोन करू नका तुम्हाला मला फोन करण्याचा आणि विचारण्याचा अधिकार नाही असे सांगून पत्रकारांशी उद्धटपणे वर्तणूक केली आहे सदरील सर्व प्रकारामुळे नगरपरिषद प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा अनुभव येतो परिसरातील स्वच्छता करण्याच्या नावाखाली झाडांची कत्तल का केली व त्यासाठी कोणाची पूर्वपरवानगी घेतली असा सवाल आता पर्यावरण प्रेमी नागरिकांकडून विचारण्यात येत आहे. सदरील प्रकरणाची वरिष्ठान मार्फत चौकशी होऊन झाडांची कत्तल करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाणार का असा सवाल आता उपस्थित होत आहे.





# महिला आरक्षणात सर्व जातीच्या महिलांसाठी जागा निश्चित करा : गजानन खरात

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** नुकतीच मोदी सरकारने देशातील महिलांसाठी संसदेत व विधानसभेमध्ये 33 टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला परंतु यामध्ये त्यांनी ओबीसी एससी एसटी व इतर जातींच्या महिलांसाठी राखीव जागा किती याबाबत स्पष्ट निर्णय घेतला नाही. हा एक प्रकारे ओबीसी, मागासवर्गीय व अल्पसंख्यांक महिलावर अन्याय आहे तरी याबाबत मोदी सरकारने फेरविचार करून ओबीसी मागासवर्गीय अल्पसंख्यांक महिलांसाठी जातीनिहाय किती जागा ह्या निश्चित कराव्यात या मागणीचे निवेदन काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष प्राध्यापक गजानन खरात व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हाधिकारी मार्फत राष्ट्रपती यांना सादर केले आहे. मोदी सरकारने नुकतेच संसद व विधानसभेमध्ये देशातील महिलांसाठी 33 टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे व संबंधित बिल बहुमताने मंजूर करण्यात आले आहे. परंतु या बिलामध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी असून यामध्ये स्पष्टता नाही आरक्षण बिलामध्ये पहिले जातीनिहाय गणना व त्यानंतर आरक्षण लागू असा निर्णय घेतलेला आहे परंतु जातीय जनगणना कधी होणार याबाबत कुठलाही निर्णय घेतला नाही महिलांचे ३३ टक्के आरक्षण येणाऱ्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकी पासून लागू करण्यात यावे व ओबीसी, एससी एसटी मागासवर्गीय, अल्पसंख्यांक महिलांसाठी या आरक्षणामध्ये किती जागा याची निश्चिती करण्यात यावी जेणेकरून या समाजावर अन्याय होणार नाही अशा मागणीची निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. यावेळी राजू घुट्टे विभागीय अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी,राम डहाके काँग्रेस ओबीसी कमिटी प्रदेश उपाध्यक्ष राजू गुटे ,अशोक इंगळे, विष्णुपंत पाखरे महेंद्र बोडखे, एजाज शहा, भानुदास अजगर, ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, युवक काँग्रेस शहराध्यक्ष विकास मोरे, अध्यक्ष गोविंद अंबुलकर, भागवत वानेरे, वसंत मोरे, मुस्ताक अहमद, निसार चौधरी, प्रमोद टेकाळे सह काँग्रेसचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# वाचनच खऱ्या अर्थाने जीवनाला आकार देण्याचे काम करते

## 'वाचन प्रेरणा दिन'निमित्त प्रा. डॉ. राजा दीक्षित यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** वाचनाने आपल्या जीवनात सोनियाचे दिन येऊ शकतात. साहित्य संस्कृतीतून वाचन संस्कृती जोपासली जाते. पुस्तक माणसाचे मस्तक संपन्न करत असतात. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांनी नवयुगात कॉम्प्युटर, मोबाईल आले असले तरी वाचनाकडे दुर्लक्ष करता कामा नये. वाचनच खऱ्या अर्थाने जीवनाला आकार देण्याचे काम करत असते. असे मत'वाचन संस्कृतीची जोपासना'या विषयावर बोलताना विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ.राजा दीक्षित यांनी मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आर.एन.शिंदे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून विश्वकोश निर्मिती मंडळाचे सचिव डॉ.शामकांत देवरे, कॉलेज कमिटी चेअरमन धनराज जैन,महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.के.डी. कदम उपस्थित होते. त्याचबरोबर विचार मंचावर रसायनशास्त्राचे माजी विभाग प्रमुख डॉ.डब्ल्यू बी.शिरसाठ शिरसाठ, डॉ.भूपाल देशमुख, प्रा. डॉ.सतीश मस्के,प्रा.एल.जे.गवळी, संतोष गेडाम व रविंद्र घोडराज आदी उपस्थित होते.
मराठी भाषा विभाग महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई व कर्म.आ.मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन.के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय,पिंपळनेर मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिना'निमित्त 'वाचन संस्कृतीची जोपासना'या विषयावर प्रा. डॉ. राजा दीक्षित यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पुढे बोलताना डॉ. दीक्षित म्हणाले की, पुस्तकावर प्रेम करा. पुस्तकाची हिंसा करू नका. हिंदू मुस्लिम समाजातील ऐक्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. संत शेख मोहम्मद यांनीही त्याकाळी मराठीचा अभ्यास केला. त्यामुळे प्रत्येकाचा जीव आपल्या पुस्तकात असला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही पुस्तकावर फार प्रेम केले. ज्ञान हीच शक्ती आहे ती मिळवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत. पुस्तकाची अहिंसा करता कामा नये. पुस्तकातील पाने फाडणे हा राष्ट्रीय गुन्हा आहे. तुम्हाला प्रश्न पडले पाहिजेत प्रश्न पडल्याशिवाय आपण पुस्तके वाचत नाहीत, असे सांगून जगातील सर्व ज्ञान विश्वकोश देते असे ते म्हणाले. यानंतर प्रमुख अतिथी डॉ.शामकांत देवरे यांनीही विद्यार्थ्यांनी अभ्यास करून विविध स्पर्धा परीक्षा देऊन आपले आयुष्य



घडवले पाहिजे. खान्देशातील विद्यार्थी मागे न राहता तो पुढे पुढे जात आहे. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांनीही ज्ञान मिळवून पुढे जायला हवे. अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष व पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आर.एन. शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी भाषा कौशल्य आत्मसात करून विकास करायला हवा. लेखनाची सवय लावून लेखन कौशल्य विकसित केले पाहिजे. चांगले लिहिता आले पाहिजे. विश्वकोश वाचून जो चांगला लिहील त्याला पुढच्या कार्यक्रमात बक्षीस दिले जाईल. असे सांगून विद्यार्थ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन दिले. यावेळी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजा दीक्षित यांनी महाविद्यालयाला विश्वकोशाचे तीन खंड व तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांची प्रतिमा भेट दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्राचार्य के.डी. कदम यांनी कार्यक्रमाविषयीची भूमिका विशद करून सर्व मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्रा.एल.जे.गवळी यांनी केले.आभार प्रा. डॉ.वाय.एम. नांद्रे यांनी मानले. चेतना निकुम, डिंपल गांगुर्डे, क्षमा पांडे आदींनी प्रमुख मान्यवरांचे स्वागतगीताने स्वागत केले. कार्यक्रमाला डॉ. संजय खोडके, डॉ.एन. बी.सोनवणे, डॉ.व्ही.जी. उगलमुगले, प्रा.सी.एन. घरटे, डॉ.बी.सी.मोरे प्रा.एम.व्ही.बळसाने,प्रा. के.आर.राऊत,प्रा.डी.बी.जाधव, प्रा.एस.एन. तोरवणे,प्रा.के.एन.वसावे, प्रा.वाघ,प्रा.तोरवणे,प्रा. वानखेडे,,प्रा.सोनवणे,प्रा.सुर्यवंशी, पत्रकार व इतर शाळा महाविद्यालयातून आलेले काही शिक्षक, महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थीने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.




# धान उत्पादक शेतकऱ्यांच्या खरेदीचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचा वडेट्टीवार यांनी दिला शेतकऱ्यांना विश्वास

## विदर्भातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार धान खरेदी व्हावी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** खरीप पणन हंगामातील धान खरेदीसाठी 'अ' वर्ग संस्थांना दिलेल्या अधिकारामुळे विदर्भातील सर्व धान उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील सर्व बाजार समिती, खरेदी विक्री संस्था तसेच सहकारी भात गिरणी यांच्याकडे सर्व व्यवस्था असल्याने त्यांना खरेदी केंद्र मंजूर करावे. ही शेतकरी बांधवांची आग्रही मागणी आहे. त्यामुळे धानाची खरेदी शेतकरी बांधवांच्या मागणीनुसार व्हावी, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारकडे केली आहे. त्याचबरोबर शेतकरी बांधवांचा धान खरेदीचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचा विश्वास त्यांनी शेतकरी बांधवांना दिला आहे.
पणन महासंघाने घेतलेला निर्णय चुकीचा आहे. हमीभावाने धान



खरेदी करत असताना 'अ' वर्गातील संस्थांना अधिकार दिला होता. पण विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया धान उत्पादक क्षेत्रामध्ये गोदाम नाही, बसण्यासाठी व्यवस्था नाही ,ऑनलाईन रजिस्ट्रेशन करायला व्यवस्था नाही. त्यामुळे खरेदी कशी होणार असा प्रश्न आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मागणीनुसारच खरेदी करावी. जेणेकरून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले आहे.
श्री. वडेट्टीवार म्हणाले, धान उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केली त्यांचे म्हणणे ऐकून नंतर आयुक्तांशी चर्चा केली. मार्केट कमिटी, बाजार समिती, खरेदी विक्री संस्थांनाच सुधारित आदेश काढून धान खरेदी करण्यासाठी काम द्यावे, अशी सूचना आयुक्तांना केली आहे. आज ज्या बाजार समिती तयार आहेत त्या संस्थांना धान खरेदी करायला परवानगी दिली जाईल, असे मार्केटिंग फेडरेशनच्या आयुक्तांनी सांगितले आहे. यामुळे लाखो शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणार आहे.
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणतात आपण शेतमालाला दुप्पट भाव देऊ. पण मूळ प्रश्न असा आहे की राज्यात कापूस आणि सोयाबीन खरेदी हमीभावापेक्षा कमी भावाने खरेदी सुरू झाली आहे. यामुळे शेतकरी जिवंत राहणारा नाही. सरकारने झोपेचे सोंग घेतले आहे. हमी भावापेक्षा सोयाबीन, कापूस, धान खरेदी होऊ नये, अशी आमची भूमीका असून शासनाने शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लावून त्यांना न्याय देण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

# कृषिराज लॉन्स येथे दांडियाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** महिलांनी बाहेर पडून त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा.यासाठी गरबा व दांडिया या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.
यासाठी महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिलेला आहे. पण कुणाला काही अडचणी आल्यास आम्हांला सांगावे. महिलांना आता ५० टक्के आरक्षण मिळाले आहे. भरपूर प्रमाणात महिलांनी व मुलींनी बाहेर पडून या कार्यक्रमात सहभागी व्हावे व या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे नगरसेविका तृप्ती घाडगे यांनी म्हटले. नवरात्र उत्सवानिमित्त कृषिराज लॉन्स, लोणंद (ता.खंडाळा) येथे नगरसेविका तृप्ती राहुल घाडगे, सरगम प्लॅनेट डान्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य गरबा व दांडियाचे आयोजन करण्यात आलेले आहे.
याबाबतची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद घेण्यात आली होती. या कार्यक्रमाच्या आयोजना बाबत संपूर्ण माहिती सांगत असताना यात सहभागी होण्यासाठी प्रवेश नोंदणी मोफत आहे. फ्री पास दिले जाणार आहेत.प्रवेश पास खेळाचा व पाहण्याचा वेगळा असणार आहे. तसेच या कार्यक्रमातून विविध बक्षिसे दिली जाणार असल्याचे नगरसेविका तृप्ती घाडगे यांनी सांगितले. यावेळी पुनम शहा, श्वेता दोशी, सुरेखा घाडगे, कोमल शहा,कल्याणी हिंगमिरे, प्रणती शहा, विद्या गायकवाड,अर्चना सोनावळे, नीलम घाडगे, स्मिता घाडगे, ज्योती माने,साधना घाडगे, विमल घाडगे आदी महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचा शुभारंभ सोमवार दि.१६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता लोणंद नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सीमा खरात, विरोधी पक्षनेत्या दिपाली निलेश शेळके, सर्व नगरसेविका यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

# मिनी बसस्थानकाच्या कामात कुचराई..!

## भोकर तालुक्यात प्रकार; अधिकाऱ्याचा कानाडोळा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** विधानसभा मतदार संघातील भोकर तालुका हा विकासाच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर आहे.तालूक्यातील सहा गावांतील प्रवाशांना थांबण्यासाठी "मीनी बसस्थानक "नव्याने बांधले जात आहेत.या कामात कंत्राटदार आणि अधिकारी यांची "मीलीभगत" असल्याने कामात कमालीची कूचराई केली जात आहे.अंदाजपत्रकास बंगल देऊन होत असलेल्या कामाची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्यात यावी अशी या परिसरातील ग्रामस्थांची मागणी जोर धरत आहे.
तालुक्यात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी विविध विकिस कामासाठी कोट्यवधी रूपयाचा निधी बहाल करून चेहरामोहरा बदलला आहे.भविष्यात विकासकामांसाठी लागणारा निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही दिली आहे.प्रारंभी विकासाच्या बाबतीत मागासलेला असलेला तालुका "विकिसाच मॉडल" बनल आहे. विकासातून तालुक्यातील जनतेच्या भौतिक गरजा पुर्ण होत आहेत.तालूक्यातील अंतर्गत रस्त्यांवरून येथील आगाराच्या बसेस धावतात पण लोकसंख्या जास्त असलेल्या गावातील प्रवाशांना थांबण्याची सूवीधा नसल्याने ग्रामस्थांना



झाडाचा आसरा घ्यावा लागतो. पावसाळ्यात तर आणखी दयनीय अवस्था आहे.याची दखल घेऊन तालुक्यातील जागरूक यूवकानी मीनी बसस्थानकाची मागणी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्याकडे केली असता दिवशी, महागाव, किनी, सोमठाणा, देवठाणा गावातील प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन आमदार निधीतून बांधकामासाठी सुमारे तीस लाख रूपयाचा निधी उपलब्ध करून दिला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत सदरील कामे केली जात आहेत.स्थानिकच्या एका कंत्राटदारानी राजकीय वजन खर्च करून नातीगोती सांभाळून कामाची जबाबदारी घेतली आहे. अधिकारी व कंत्राटदारात मीलीभगत असल्याने सदरील कामे अंदाज पत्रकाला बगल देऊन ऊरकली जात आहेत. हलक्याप्रतीचे साहित्य वापरल्याने ते काम कीतीकाळ तग धरू शकेल याची शाश्वती नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करावी अशी मागणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केली आहे.वरिष्ठ काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.